सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २८२ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि व्यक्ती समाजाचे अंग आहे. तिचे शरीर, मन आणि बुद्धीची जी काही क्षमता आहे, ती समाजामुळेच आहे. गंगेचे पाणी गंगेला समर्पित. यात देवाणदेवाण हा मुद्दाच नाही. या दृष्टिकोनातून पाहता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार म्हणाले होते- संपूर्ण समाज हा आपला परिवार आहे.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

## महत्त्वाचे

### विजेचा शॉक लागून कंत्राटी कामगाराचा मृत्यू

**सोलापूर :** शहरातील डी मार्ट जवळील पाण्याच्या टाकी येथील घंटागाडी विभाग कार्यालया जवळ विजेचा शॉक लागून एका कंत्राटी कामगाराचा मृत्यू झाला आहे. बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार गुरुसिद्धया सोमनाथ हिरेमठ (वय- ४८, रा. स्वागत नगर सोलापूर) असे विजेच्या धक्क्याने मृत्यूमुखी पडलेल्या आरसी कॉम्पॅक्टर चालकाचे नाव आहे. महापालिकेने कचरा संकलनासाठी नेमलेल्या मक्तेदारांकडे ते काम करत होते. दिवसभरातील कचरा संकलनाचे काम आटोपल्यानंतर झोन क्रमांक पाच मधील घंटागाडी कर्मचाऱ्यांचे हेडक्वॉर्टर असलेल्या जुळे सोलापूर पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या कार्यालयाजवळ त्यांनी आपल्या ताब्यातील घंटागाडी आणून लावली. मात्र, त्याच्याआधी त्यांनी परिसरातीलच पाण्याच्या मोटरवर वाहन धुण्याच्या रॅम्पवर घंटागाडी उभी करून गाडी धुत असताना अचानक विजेचा धक्का लागल्याने त्यात ते गंभीर जखमी झाले होते. घटनेनंतर त्यांना तेथील काहींनी रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई-वडील असा परिवार आहे.



# भीमा नदीला पूरसदृश स्थिती



## पंढरपुरात पाणी शिरण्याच्या शक्यतेने ३० कुटुंबाचे रायगड भवन येथे स्थलांतर

## उजनी धरणातून विसर्ग वाढला; पालिका, पोलिस आणि महसूल प्रशासन अलर्ट मोडवर

## नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## उजनी व वीर धरणातून १ लाख ४६ हजार ३६० क्युसेकचा विसर्ग

## सखल भागातील सुमारे पाचशे नागरिकांच्या निवासाची नगरपालिकेकडून तयारी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० ऑगस्ट-**

पुणे जिल्हा आणि उजनी धरण लाभक्षेत्रात सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणीपातळीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी धरणातून ९१ हजार ६०० क्युसेक तर वीर धरणातून ५४ हजार ७६० क्युसेक असा एकूण १ लाख ४६ हजार ३६० क्युसेक इतका विसर्ग सोडण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा भीमा नदी दुथडी भरली आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

उजनी धरणातून भीमा नदी मध्ये मोठ्या प्रमाणावर विसर्ग वाढविण्यात आल्यामुळे येथील चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरुन वाहत आहे. विसर्गात आणखीन वाढ झाल्यास शहरातील सखलभागात पूरस्थिती निर्माण होवू शकते हे लक्षात घेऊन येथील पालिका,पोलिस तसेच महसूल यंत्रणा सतर्क झालेली दिसत आहे. सखल भागातील लोकांना त्यांच्या घरातून बाहेर काढून त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहचविण्यासाठी येथील पालिकेचे अधिकारी, कर्मचारी वाहनांच्या ताफ्यासह सज्ज झालेले दिसत आहेत.

उजनी धरणातून भीमा नदी मध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु आहे. त्यामुळे येथील चंद्रभागा नदी दुथडी भरुन वाहू लागली आहे. यंदाच्या हंगामा मध्ये चंद्रभागेला पूरसदृश्य स्थिती निर्माण होण्याची ही चौथी वेळ आहे. येथील ब्रिटीशकालीन जुना दगडी पूल पाण्याखाली गेलेला आहे.चंद्रभागेच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत असल्याने येथील नगरपालिका,पोलिस कर्मचारी तसेच महसूल कर्मचारी सध्या अलर्ट झाले असून सखल भागात पालिकेचे कर्मचारी तैनात करण्यात आलेले आहेत. या बरोबरच चंद्रभागा नदीकडे जाणाऱ्या प्रत्येक घाटांवर देखील पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आलेले आहे. या शिवाय चंद्रभागा नदीपात्राकडे कोणीही जावू नये यासाठी पोलिस,पालिका तसेच महसूल विभागा मार्फत स्पीकर वरुन वारंवार आवाहन केले जात आहे.

दरम्यान व्यासनारायण झोपडपट्टी, अंबाबाई पटांगण परिसर, लखुबाई मंदिर परिसर आदी भागात पालिकेचे आधिकारी तसेच कर्मचारी नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी आवाहन करीत असल्याचे दिसत आहे. व्यासनारायण तसेच अंबाबाई पटांगण परिसरातील झोपडपट्टी मधील अनेक घरांमधून नागरिकांनी आपल्या संसारोपयोगी सामानांची बांधाबाधी करुन कोणत्याही क्षणी घरे सोडण्याची वेळ आली तर अनेक कुटुंबांची तयारी झालेली एकिकडे दिसत असली तरी झोपडपट्टी मध्ये पाणी शिरेपर्यंत सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी त्यांची मानसिक नसल्याचे दिसत आहे.



### या सुरक्षित ठिकाणी करण्यात आली व्यवस्था

पुरस्थितीचा धोका होवू नये यासाठी पालिकेच्या वतीने शहरातील सखल भागातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्याची तयारी झालेली आहे. शहरातील व्यासनारायण झोपडपट्टी, अंबाबाई पटांगण तसेच लखुबाई पटांगण परिसरातील झोपडपट्टी मधील वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना शहरातील लोकमान्य विद्यालय (जुन्या कोर्टा समोर), रायगड भवन आदी सुरक्षीत ठिकाणी स्थलांतरित करुन त्या ठिकाणी त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे चारशे ते पाचशे नागरिकांची या ठिकाणी व्यवस्था केल्याची माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सोलापूर तरुण भारतच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

### ऐवढ्या क्युसेक्स विसर्गास हा भाग जातो पाण्याखील

शहरातील सोलापूर- पंढरपूर रस्त्यावरील जुना दगडी (२६ हजार क्युसेक्स), नगरपालिका बंधारा (३५ हजार क्युसेक्स), भीमा नदीवरील को.प.बंधारा (४० हजार क्युसेक्स), पंढरपूर मंगळवेढा रस्त्यावरील जुना गोपाळपूर पूल (१लाख ७ हजार क्युसेक्स), व्यासनारायण झोपडपट्टी (१ लाख १५ हजार ), पंढरपूर -मंगळवेढा रस्त्यावरील नवीन गोपाळपूर पूल (१ लाख ६० हजार क्युसेक्स) आणि संतपेठ झोपडपट्टी ( १ लाख ८० हजार क्युसेक्स) मात्र या विसर्गाच्या अगोदरच शासकीय यंत्रणेकडून या भागातील वाहतूक पुर्णपणे बंद करुन नागरिकांचे सुरक्षीत ठिकाणी स्थलांतर केले जात असते.

### उजनी धरणातील पाण्याच्या विसर्गाची आकडेवारी

उजनी धरणात बुधवारी सकाळी सहा वाजता २७ हजार ४५६ क्युसेक्सने पाण्याची आवक होत होती. तर धरणातून ७६ हजार ६०० क्युसेक्सन भीमा नदीत विसर्ग केला जात होता. त्या नंतर सकाळी साडेनऊच्या सुमारास ९० हजार क्युसेक्स ऐवढा विसर्ग करण्यात आला. दरम्यान सायंकाळी साडेपाचच्या सुमारास उजनी धरणातून तब्बल १ लाख १० हजार क्युसेक्स ऐवढा विसर्ग भीमा नदी मध्ये करण्यात आला.

# 'आरोपी' मंत्री-मुख्यमंत्र्यांना हटविणारे विधेयक 'जेपीसी'कडे

## लोकसभेत विरोधकांचा अभूतपूर्व गदारोळ | विधेयकाचे कागद फाडत तुकडे भिरकावले | अमित शाह यांच्यासमोरचा माईक हिसकण्याचा प्रयत्न | भाजपा सदस्यांनी केले शाहांभोवती सुरक्षाकडे



**◆ नवी दिल्ली, २० ऑगस्ट**

**विरोधकांच्या प्रचंड गदारोळात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी राजकारणाची गुन्हेगारीकरणापासून मुक्तता करणारी तीन महत्त्वपूर्ण विधेयके लोकसभेत सादर केली. नंतर ही तिन्ही विधेयके व्यापक चर्चेसाठी संसदेच्या संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवण्यात आली.**

### मी नैतिकतेच्या मुद्यावर राजीनामा दिला

वेणुगोपाल यांनी विधेयकावर घेतलेले आक्षेप फेटाळताना अमित शाह म्हणाले की, ज्यावेळी मला खोट्या प्रकरणात तुरुंगात पाठवण्यात आले होते, तेव्हा मी नैतिकेच्या मुद्यावरून राजीनामा दिला होता. न्यायालयाने माझी निर्दोष सुटका केली नाही, तेपार्यंत मी एकही संवैधानिक पद घेतले नाही. आरोप असतानाही पदावर कायम राहण्याएवढे आम्ही बेशरम नाही. विरोधी पक्षांचे नेते आम्हाला नैतिकतेचे धडे शिकवू शकत नाही.

भ्रष्टाचाराच्या तसेच गंभीर गुन्हेगारी स्वरूपाच्या आरोपाखाली सलग ३० दिवस तुरुंगात राहिल्यानंतर पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि राज्यांच्या मंत्र्यांना पदावरून हटवण्याची महत्वपूर्ण आणि देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी तरतूद या विधेयकात आहे. अमित शाह यांनी १३० व्या दुरुस्ती विधेयकासह तीन विधेयके आज लोकसभेत सादर केली.

अमित शाह ही तीन विधेयके सादर करीत असताना लोकसभेत अभूतपूर्व असा गदारोळ झाला. विरोधी पक्षांनी अध्यक्षांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत धाव घेत घोषणाबाजी केली. त्यामुळे सभागृहात प्रचंड गदारोळाचे वातावरण निर्माण झाले. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या विधेयकाच्या प्रती फाडत कागदाचे तुकडे अमित शाह यांच्या अंगावर भिरकावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासमोरील माईकही हिसकण्याचा प्रयत्न झाला. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अमित शाह यांना घेरण्याचाही प्रयत्न केला. त्यांना रोखण्यासाठी तसेच शाह यांच्या बचावासाठी भाजपाचे सदस्य समोर सरसावले. त्यांनी शाह यांच्या भोवती सुरक्षा कडे करण्याचा प्रयत्न केला. यामुळे सभागृहात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. विरोधी पक्षांचे सदस्य अमित शाह यांच्या आसनाजवळ येत घोषणाबाजी करीत होते, तर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, रवनीतसिंह बिट्टु, कमलेश पासवान, सतीश गौतम आदी भाजपा सदस्य शाह यांच्या आसनाजवळ येत विरोधकांचा हल्ला रोखण्याचा प्रयत्न करीत होते.

विरोधकांच्या सर्व आक्षेपांचे निराकरण करीत अमित शाह यांनी ही तिन्ही विधेयक व्यापक आणि सर्वंकष चर्चेसाठी २१ सदस्यीय संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडला. सभागृहाने आवाजी मतदानाने हा प्रस्ताव मान्य केला.

**काही विधेयके शूचिता, नैतिकतेसाठी**

काही विधेयके राजकारणात शूचिता आणि नैतिकतेसाठी आणली जातात, कारण राजकारणात शूचिता आणि नैतिकतेची आवश्यकता आहे, असे स्पष्ट करीत ओम बिर्ला म्हणाले की, ही विधेयके आता संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवण्यात आली आहेत.

### चर्चेविना ऑनलाईन गेमिंग विधेयक संसदेत मंजूर

ऑनलाईन गेम आणि त्याच्या प्रचारावर बंदी घालणारे ऑनलाईन गेमिंग प्रमोशन ॲण्ड रेग्युलेशन बिल-२०२५ विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत बुधवारी गदारोळातच चर्चेविना आवाजी मतदानाने मंजूर झाले. ऑनलाईन सट्टेबाजी, त्याचे व्यसन, मनी लॉण्ड्रिंग आणि आर्थिक फसवणुकीच्या घटनांना आळा घालणे शक्य होणार असल्याचे विधेयक सादर करताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.



**...म्हणून विरोधकांना भीती**

या विधेयकामुळे केंद्रात सत्तारूढ पक्षाला विरोधी पक्षाची सत्ता असलेल्या कोणत्याही राज्याच्या मुख्यमंत्र्याला वा मंत्र्यांना हटवण्याचा अनिर्बंध अधिकार मिळेल, असा विरोधकांचा मुख्य आक्षेप होता. पाच वर्षांची शिक्षा होऊ शकेल, अशा कोणत्याही गुन्ह्यात अटक झालेल्या मुख्यमंत्र्याने वा मंत्र्याने ३१ दिवसां त राजीनामा दिला नाही तर त्याला पदावरून आपोआप हटवण्याची तरतूद या प्रस्तावित विधेयकात आहे.

*(तभा वृत्तसेवा)*



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### कल्याणशेट्टी महाविद्यालयात भित्तिपत्रकांचे प्रकाशन

**अक्कलकोट, दि.२० ऑगस्ट-**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान विद्या शाखेच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. याावेळी त्यांनी भित्तिपत्रके विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी उपयुक्त असल्याने शिक्षकांनी शाळा महाविद्यालयातून भित्तिपत्रके प्रकाशित करून विद्यार्थ्यांना लेखन करण्याची संधी द्यावी असे प्रतिपादन केले. यावेळी जेष्ठ संचालक मुकुंद पत्की, महावीर शहा, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, संचालक अशोक येणगुरे, महेश कापसे, जुनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, बापूजी निंबाळकर, खंडेराव घाटगे, शिवानंद पुजारी उपस्थित होते. प्रा. भीम सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा शितल फुटाणे यांनी सूत्रसंचलन केले. प्रा मनीषा शिंदे यांनी आभार मानले.



### जागतिक डास दिनानिमित्त जनजागृती उपक्रम

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी २० ऑगस्ट हा जागतिक डास दिन म्हणून साजरा केला जातो. महानगरपालिका हिवताप विभाग आणि युगंधर फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील विविध भागात जनजागृती मोहीम राबविण्यात आली. सोलापूर रेल्वे स्थानक परिसरासह शहरातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये माहितीपर कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होऊ नये यासाठी गप्पी मासे सोडण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच विजापूर रोडवरील ज्ञानसंपदा माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात युगंधर फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने, सोलापूर महानगरपालिकेच्या जीवशास्त्रज्ञ स्वाती अनपट यांनी मार्गदर्शन केले. तसेच हिवताप विभागातील कर्मचारी व अधिकारी यामध्ये आरोग्य निरीक्षक घंटे, कर्मचारी हुडेवाले, कोलते, भोपळे, रासुरे, वाघमारे, पटवेगर ज्ञानसंपदा शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत नागरिकांना घराभोवती पाणी साचू न देणे, स्वच्छता राखणे, डास प्रतिबंधक उपाय वापरणे, तसेच ताप आल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले.



### माजी आमदार बबनराव शिंदे यांच्यावर अमेरिकेत हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

**कुर्डूवाडी, दि. २० ऑगस्ट-**

माढ्याचे माजी आमदार बबनराव शिंदे यांच्यावर अमेरिकेत हृदय प्रत्यारोपण ही शस्त्रक्रिया करण्यात आली. सोमवारी रात्री दहा ते मंगळवारी पहाटे चार वाजेपर्यंत करण्यात आली. शस्त्रक्रिया संपूर्णपणे यशस्वी झाली असल्याची माहिती चिरंजीव व जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी अमेरिकेतून दूरध्वनीवरून दिली. ही शस्त्रक्रिया अमेरिकेतील प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ. अमित पावले यांनी केली. मागील २० वर्षांपासून माजी आमदार बबनराव शिंदे यांना हृदयविकाराचा त्रास होत होता. सोलापूरचे डॉ. गुरुनाथ परळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू होते. हृदय प्रत्यारोपणासाठी १३ जून रोजी अमेरिकेतील सेंट लुईस येथील बीजेसी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉ. अमित पावले हे टेंभुर्णी येथील डॉ. ए.एस. पावले व हेमलता पावले यांचे चिरंजीव आहेत. अनेक दिवसांपासून कार्यकर्ते शिंदे यांच्या आरोग्याबाबत प्रार्थना करत होते.

### छोटुभाई उर्फ गोकुळदास लोहे यांचे निधन

**बार्शी, दि.२० ऑगस्ट-**

बार्शीतील ज्येष्ठ भाजपा कार्यकर्ते छोटुभाई उर्फ गोकुळदास मदनलाल लोहे (वय-८८) यांचे बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी दुपारी खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दि. २२ रोजी सकाळी ११ वा. राहत्या घरापासून, एलआयसी बिल्डिंग मागे, सुभाषनगर, बार्शी येथून निघणार आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन विवाहित मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जनसंघाचे ते प्रथमपासून कार्यकर्ते होते. भारतीय जनता पक्षाला शहर व तालुक्यात रुजविण्याचे काम केले. बार्शी नगरपरिषदेचे नगरसेवक होते. भारतीय मजदूर संघाचेही काम करीत होते. भाजपाचे ज्येष्ठ व कामगारांचे लढवय्या नेते म्हणून ते परिचित होते. श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्थेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. सध्या ते पतसंस्थेचे संचालक होते. अनेक संस्थांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. राजकीय आणि कामगार क्षेत्रातील तळमळीचा जेष्ठ नेता हरवल्याची खंत बार्शीकरांनी व्यक्त केली.



# विमा न मिळाल्यास वाळूजच्या शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा ,**
**वाळूज, दि २० ऑगस्ट -**

मोहोळ तालुक्यातील वाळूज येथील शेतकऱ्यांना मागील खरीप हंगाम २०२४ मध्ये घेतलेल्या सामायिक क्षेत्राच्या पिकविम्याची रक्कम अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, सोलापूर येथे २५ ऑगस्ट २०२५ रोजी सामूहिक आत्मदहनाचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

तालुक्यातील वाळूज येथील मागील वर्षीच्या खरीप हंगाम २०२४ मध्ये मोहोळ पीक विमा उतरवलेल्या ३० शेतकऱ्यांना अद्यापही सामायिक क्षेत्राचा विमा मिळाला नाही. या संबधीत मे महिन्यात निवेदन दिले होते मात्र त्याची दखल घेतली नाही. शेतकरी पीक विम्यापासून अद्यापही वंचितच आहेत शेतकऱ्यांना विम्याचा त्वरित लाभ मिळावा यासाठी जिल्हाधिकारी, कृषी अधीक्षक सोलापूर, तहसीलदार मोहोळ,विमा कंपनी यांना निवेदन देऊन विम्याची रक्कम मिळवून द्यावी अशी, मागणी केली. या प्रसंगी रवींद्र कादे, शरद कादे,यशवंत घाडगे, राजेंद्र मोटे, सुहास दास, मच्छिन्द्र राक्षे, रामचंद्र गुंड, विनोद खपाले आदी शेतकरी उपस्थित होते.



> सामायिक शेती असलेल्या जिल्यातील २२०० शेतकऱ्यांना विमा मिळणास तांत्रिक कारणामुळे अडचणी येत आहेत आहेत.सामायिक क्षेत्र शेतकऱ्यांनी स्वयंघोषणापत्र विमा भरताना देने आवश्यक होते मात्र ते नसल्यामुळे विमा मिळाला नाही. ही तांत्रिक अडचण दूर करून यावर काय उपाय योजना करता येतील याबाबत विमा कंपनीशी चर्चा करून शेतकऱ्यांना विमा रक्कम देण्याचा प्रयत्न करू.
> **- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,सोलापूर**

> विमा भरताना कंपनीने अर्ज करतेवेळी संमती पत्रकाविना अर्ज भरून घेतले पंचनामे केले. आता मात्र स्वयंघोषणापत्र नाही म्हणून आमचा विमा नाकारला आहे. काही शेतकऱ्यांना संमतीपत्रकाशिवाय विमा मिळाला तर काही संमतीपत्रक असूनही विमा मिळत नाही. कृषी विभाग व कंपनी यांच्यात समन्वयाचा अभाव असून प्रशासनाच्या गोंधळामुळे विमा मिळत नाही. त्यामुळे विम्याची भरपाई न मिळाल्यास २५ऑगस्ट रोजी आम्ही कृषी कार्यालय येथे सामूहिक आत्मदहन करू. **- विनोद खपाले, वंचित शेतकरी वाळूज.**


# मविआच्या माध्यमातून माकपचा सोलापूर मनपावर सत्ता आणण्याचा संकल्प

### माकपचे माजी आ. नरसय्या आडम यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

भाजप महायुती सरकारने साऱ्या देशाला संकटात घातले आहे. अशा महायुतीचा राज्यातील आगामी विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पराभव करण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीकडून

आम आदमी पार्टी, प्रहार आदी छोट्या पक्षांना सोबत घेऊन महाविकास आघाडीसमवेत समझोता करण्याचा प्रयत्न आहे. या आघाडीच्या बळावर सोलापूर महापालिकेचे महापौरपद माकपला मिळवून देण्याचा संकल्प आहे, असे माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. सन १९८५ मध्ये सोलापूर महापालिकेवर पुरोगामी लोकशाही दलाची सत्ता आली होती. त्यावेळी पुलोद आघाडीच्या माध्यमातून जनता दलाचे चार नगरसेवक निवडून आले होते. या नगरसेवकांना उपमहापौर, परिवहन समितीचे सभापती होण्याची संधी लाभली होती. याच धर्तीवर महाविकास आघाडीची सत्ता आल्यास एका वर्षाकरिता महापौरपद माकपला मिळवून देण्याचा प्रयत्न राहणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत एमआयएम, काँग्रेस समवेत प्राथमिकस्तरावर चर्चा सुरू आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सोलापूर महापालिकेसह अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकराज आहे. सोलापूर शहरात पाणी, खड्डे आदी प्रश्न भेडसावत आहेत, मात्र त्याची सोडवणूक प्रशासक राजवटीकडून झाली नाही.



रे नगरात २४ तास पाणी देण्याची योजना आम्ही यशस्वी केली आहे. मग सोलापूर शहरात २४ तास पाणी देणे का शक्य नाही? सोलापूरचे पालक सचिव तथा स्मार्ट सिटी कंपनीचे चेअरमन असीम गुप्ता यांनी आगामी २० वर्षे तरी सोलापूरला दररोज पाणीपुरवठा होणार नाही, असे स्पष्ट सांगितले आहे. शहराला दररोज पाणीपुरवठा करण्याचे अभिवचन भाजपने सन २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत दिले होते.मात्र सत्ता येऊन देखील त्याची पूर्तता झाली नाही. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत पाण्याबाबत आम्ही भाजपचा पोलखोल करणार आहोत, तत्पूर्वी पाणीप्रश्नी माकपतर्फे आगामी काळात आंदोलन करण्यात येणार आहे, असे आडम यांनी सांगितले.

महाराष्ट्रात नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतांची मोठी चोरी झाली होती. मतदानाची वेळ संपल्यावर महाराष्ट्रात झालेले ७० लाख एवढे मतदान शंकास्पद आहे. सोलापूर शहर मध्य मतदारसंघात काही केंद्रांवर मतांची चोरी झाल्याचा आम्हाला संशय आहे. त्यामुळे या मतदारसंघाची निवडणूक रद्द करावी अशी याचिका आम्ही न्यायालयात केली आहे. ईव्हीएमचे निकाल शंकास्पद असल्याने यापुढे देशातील सर्व निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर करावी, अशी माकपची मागणी आहे. या अनुषंगाने माकपने 'ईव्हीएम हटाव'चा नारा दिला आहे, असेही आडम म्हणाले.

# एसटी चालकाला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

बार्शी शहरात मंगळवारी १९ ऑगस्ट रोजी दुपारी एका एस.टी. बसचालकाला रस्त्यावरील खड्ड्यातील पाणी उडाल्याच्या कारणावरुन मारहाण केली आणि धमकी देण्याचा प्रकार घडला. याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी सचिन सुभाष शिंदे (रा. नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड, बार्शी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी मारुती महादेव काटकर (वय ३७, रा. जामगाव (प.) ता. बार्शी) गेल्या १३ वर्षांपासून एस.टी. महामंडळात चालक म्हणून कार्यरत आहेत. १९ ऑगस्ट रोजी दुपारी सव्वाबारा वाजता ते बस (एमएच-१४-बीटी-३७७५) घेऊन बार्शी ते उपळाई (ठों) मार्गावर प्रवासी घेऊन जात होते. त्यांच्यासोबत वाहक नितीन नवनाथ नलवडे होते. कुर्डूवाडी रोडवरील श्रीप्रसाद हॉटेलजवळील टाटा शोरुमसमोर (गिरीश एजन्सी) दुपारी १२-३० वाजता, रस्त्यावरील खड्ड्यातील पाणी मोटारसायकलस्वार सचिन सुभाष शिंदे (रा.नाईकवाडी प्लॉट,बार्शी) (एमएच-१३ डीएक्स-९३८५) याच्या अंगावर उडाले. संतप्त झालेल्या शिंदे याने बस थांबवून काटकर यांना केबिनमधून खाली ओढले. त्यांच्या सरकारी गणवेशाचा खिसा फाडला आणि हाताने व लाथांनी मारहाण केली. प्रवासी आणि वाहकासमोर शिवीगाळ करत तू इथून एस.टी. कशी घेऊन जाणार? अशी धमकी दिली. यानंतर शिंदे तिथून निघून गेला. काटकर यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी सचिन शिंदे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी नागरिकांना संयम राखण्याचे आणि शांततेने तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे.

### पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

बार्शी शहर व तालुक्यात सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई दयावी, अशी मागणी माधवबनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. खुशाल मुंढे यांनी केली आहे. बार्शी तालुक्यात १२ ऑगस्टपासून सततच्या पावसाने चुंब, कोरेगाव, खडकोणी, धामणगाव, काटेगाव, वालवडसह विविध गावातील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये उभ्या सोयाबीन, उडीद, मुग, तूर यासारख्या पिकामध्ये गुडघाभर पाणी साठले आहे. काही ठिकाणी तर पिकेच वाहून गेलेली आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचा पंचनामे तात्काळ शासनाकडून करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळावी, अशी मागणी डॉ मुंढे यांनी केली आहे.

# बार्शीत ब्रह्माकुमारीद्वारे रविवारी रक्तदान महाअभियान


### एक लाख युनिट रक्तदानाचा देशव्यापी संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

ब्रह्माकुमारीज सेवाकेंद्र, बार्शीच्यावतीने रविवार दि. २४ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १८ व्या पुण्यस्मृतीनिमित्त आणि विश्व बंधुत्व दिनाच्या औचित्याने होत आहे, अशी माहिती ब्रह्माकुमारी विद्यालयाच्या बार्शी सेवाकेंद्र संचालिका ब्र. कु. संगीतादिदी यांनी दिली .

रक्तदानाच्या या देशव्यापी अभियानाबाबत अधिक माहिती देताना दिदी म्हणाल्या, देशभरातील ६,००० हून अधिक सेवाकेंद्रांवर २२ ते २५ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या या रक्तदान महाअभियानाचा एक लाख युनिट रक्तदानाचा संकल्प असून, यामुळे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न आहे. या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ १७ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते झाल्याचे त्यांनी सांगितले. बार्शीत ब्रह्माकुमारीज, राजयोग भवन, ओम शांती कॉलनी, पाटील प्लॉट, शिवाजीनगर, येथे शिबीर सकाळी ९ ते संध्याकाळी ५ पर्यंत आयोजित केले आहे. भगवंत ब्लड बँकेमार्फत रक्तसंकलन केले जाणार आहे. सध्या ९२ रक्तदात्यांनी नोंदणी केली आहे. शिबिरात रक्तदान करणा-यांची संख्या १५१ पेक्षा अधिक होईल. अधिक माहितीसाठी ८७६७५०७७८७, ८९९९५१९१६० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन केले आहे.

### अक्कलकोट बाजार समितीमध्ये उडीद, मुगाची आवक



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि . २० ऑगस्ट -**

कृषी उत्पन्न बाजार समिती, अक्कलकोट. येथे नविन उडीद मुगाची आवक झाली आहे .

बुधवारी उडीद,आवक : ७५. पाकीट होते . उडदाला किमान ६३०० ते कमाल ७६५० असुन सरासरी ७३०० पर्यंत क्विटला भाव आहे . मुगाची १५५ पाकिट आवक आहे . मुग किमान ६३०० रुपए क्विटल तर कमाल : ७६५० भाव मिळत असुन, सरासरी : ७३०० रु आहे हरभरा १०० पाकीट आवक असुन क्विंटल ला किमान ६ ००० भाव आहे.




# चैतन्य पतसंस्थेतर्फे शुक्राचार्य तिर्थक्षेत्राला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २० ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील चैतन्य पतसंस्था व नागरी आघाडी पार्टीच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्ते यांची सांगली जिल्ह्यायातील शुक्राचार्य तिर्थक्षेत्र व ऐतिहासिक अशा बानुरगडावर भेट देण्यात आली.

यामध्ये नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, उपाध्यक्ष डॉ मिलिंद गुळभिले, चैतन्य पतसंस्थेचे चेअरमन नानासाहेब देशमुख, माजी सरपंच अमोल मदने, सुप्रसिद्ध ठेकेदार उमेश सरवदे, संजय रोकडे, कल्याण जावळे, संतोष पडळकर, कुमार भैस, दामोदर लोखंडे, नितीन कपने, पंकज मदने, खंडुनाना माने, विजय पिसे ,दादासाहेब वगरे, सागर शेंडगे, माजी उपसरपंच दत्तात्रय भैस, युवराज मदने,वैभव वगरे,खरात, वैभव पिसे यांनी यावेळी शुक्राचार्य तिर्थक्षेत्राला भेट देत दर्शन घेतले.

# बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल प्रकरणात सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) आणि भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये दाखल गुन्ह्यात माढा पोलीस ठाण्यात आरोपी म्हणून नोंद असलेल्या समाधान लोहार याचा जामीन अर्ज बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी मंजूर केला आहे.



२७एप्रिल २०२५ रोजी फिर्यादीने माढा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, फिर्यादीच्या मुलीस अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवत तपास सुरु केला. तपासादरम्यान मुलगी स्वतःहून पोलीस ठाण्यात हजर राहिल्याने तिचे वय १८ वर्षांखाली असल्याचे समोर आले. यामुळे भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) सोबतच भारतीय न्याय संहिता कलम ६४ (२) व पोक्सो कायद्याच्या कलम ४, ८, व १२ लागू करण्यात आले.

गुन्हा दाखल झाल्यानंतर समाधान लोहार यांनी बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज सादर केला. अर्जदाराच्यावतीने ॲड. आकाश तावडे यांनी बाजू मांडली. त्यांनी केलेल्या युक्तिवादात फिर्यादी तसेच पीडितेच्या जबाबात विसंगती, आरोपीचा तपासात सहकार्याचा दाखला देण्यात आला. तसेच आरोपीच्या सुटकेमुळे तपासावर कोणताही परिणाम होणार नाही, असे सादर करण्यात आले. न्यायालयाने दोन्ही बाजूंनी सादर केलेल्या युक्तिवादांची दखल घेतली आणि समाधान लोहार यांचा जामीन मंजूर केला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी आरोपीला जामीन मंजूर करताना काही अटी घालून दिल्या आहेत. जामीनासाठी ठराविक रक्कम भरणे, तपासात नियमित सहकार्य करणे व साक्षीदारांवर कोणताही दबाव न आणणे या अटींचा समावेश आहे. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. आकाश तावडे आणि ॲड. आकाश मस्के यांनी काम पाहिले.

# सलग सुट्ट्यांमुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटमध्ये भाविकांचा जनसागर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

१५ ऑगस्ट सुट्टी शनिवार गोकुळाष्टमी रविवार सुट्टी या तीन दिवसाच्या सलग सुट्टी कालावधीत स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अक्कलकोट तीर्थक्षेत्री स्वामी दर्शनार्थ भाविकांचा महापुर आल्याचे दिसून आले. या कालावधीत दोन लाखापेक्षा अधिक भाविकांनी समर्थाचे दर्शन घेतले.

वटवृक्ष मंदिर परिसरातील अरुंद रस्ते रस्त्याच्या कडेला उभी पार्किंग वाहने. रहदारीच्या रस्त्यावरच टो रिक्षा भाविकांच्या वाहनातून होणारी चढ उतार मंदिर परिसरातील लॉजमध्ये येणारी यात्रीचे रस्त्यावर उभी वाहने यामुळे परिसरात वाहनांची रांगच रांग वाहतुकीची कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले. पोलीसांची यामुळे मोठी दमछाक झाली. भाविकाचा मंदिर परिसरात सुरक्षित वावर होणे गरजेचे आहे मंदिर परिसरातील वाहने पार्किंग व्यवस्था पुन्हा जटील प्रश्न बनला आहे. भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने निवास व्यवस्था सर्व फुल्ल झाली होती.



तीर्थक्षेत्र अक्कलकोटी स्वामी दर्शनार्थ बारमाही गर्दी होत असल्याच दिसून येत आहे. याकरिता कुठल्याही धार्मीक उत्सवाची आता गरज राहिलेली नाही सलग सुट्या ची पर्वणी लाभली तरी भाविकांची पर्यटक यात्री ची अक्कलकोट तीर्थ क्षेत्री स्वामी दर्शनार्थ प्रचंड गर्दी होत आहे. स्वामीचे वटवृक्ष स्वामी मंदिर मुळ स्थान एकमेव बुधवार पेठ येथील समाधी मंदिर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ भारत गल्ली येथील गुरु मंदिर स्टेशन रस्ता राजेराय मठ शिवपुरी आदि ठिकाणी भाविकांनी दर्शनार्थ गर्दी केली होती भाविकांनी सर्व मंदिराचा परिसर व्यापला होता . वटवृक्ष मंदिर परिसरात टो रिक्षा भाविकांची वाहने रस्त्या वरच उभी वाहने भाविकांची वाहनात होणारी चढ उतार रस्त्यावर वाहने पार्किंग यामुळे वारंवार वाहतुकीची कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले . वटवृक्ष मंदिर परिसरात जिकडे पहावे तिकडे भाविकांची वाहने उभी असल्याचे निदर्शनास आले . रस्त्याच्या दुतर्फा वाहनांनी व्यापल्या होत्या . मोकळ्या जागासह रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्किंग ने व्यापल्याने मंदिर परिसरातुन मैंदर्गी रस्ता कडे राहणाऱ्या ह द्द वाढ भागातील नागरि का नां परिसरातुन मार्गक्रमण करणे अंत्यत धोकादायक बनले आहे. सरळ जाणाऱ्या वाहनानां रस्त्याच्या दुतर्फावर पार्क केलेली वाहनाची वाहने मागे घेताना कधी धडक बसेल याची धास्ती दुचाकी वाहन चालकाना लागली आहे यामुळे मंदिर परिसरातील दुतर्फा थांबणारी वाहने टो रिक्षा भाविकांची होणारी चढ उतार याकरिता वाहनाची थांबे निश्चिती ही मंदिराच्या जवळ न ठेवता सुरक्षित काही अंतरावर निश्चित करावे .रस्यावर उभी वाहनानां प्रतिबंध करावा अशी मागणी स्वामी भक्त नरेश अहिर हेमंत गंवडे पुणे व लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे यांनी व्यक्त केली आहे.

# राधाकृष्णन् यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## पंतप्रधान मोदी यांची उपस्थिती



राधाकृष्णन् यांचा उमेदवारी अर्ज सादर करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

◆ **नवी दिल्ली, २० ऑगस्ट**

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी रालोआचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

संसद भवनात राधाकृष्णन् यांनी निवडणूक निर्णय अधिकारी आणि राज्यसभेचे महासचिव पी. सी. मोदी यांच्या कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज सादर केला. यावेळी संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेचे नेते जे. पी. नड्डा तसेच रालोआतील घटक पक्षांचे नेते उपस्थित होते.

राधाकृष्णन् यांनी उमेदवारी अर्जांचे चार संच सादर केले, प्रत्येक संचावर २० सूचक आणि २० अनुमोदकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. विशेष म्हणजे, राधाकृष्णन् उमेदवारी अर्ज सादर करीत असताना चार संचावरील सूचक आणि अनुमोदक असे १६० खासदार उपस्थित होते. उमेदवारी अर्जाच्या पहिल्या संचावर मुख्य सूचक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वाक्षरी केली आहे. उमेदवारी अर्जांच्या अन्य संचावर केंद्रीय मंत्री आणि रालोआतील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जदयुतर्फे केंद्रीय मंत्री राजीवरंजन उर्फ ललनसिंह आणि संजय झा, लोजपातर्फे केंद्रीय मंत्री चिराग पासवान आणि हिंदुस्थान अवाम मोर्चातर्फे केंद्रीय मंत्री जितनराम मांझी उपस्थित होते. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्राचे राज्यपाल असलेल्या राधाकृष्णन् यांची उमेदवारी भाजपाने जाहीर केली.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी विरोधकांच्या इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्या. बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली आहे. रेड्डी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल करतील. उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक ९ सप्टेंबरला होणार असून, या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करायची उद्याची शेवटची तारीख आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# पालिकेच्या स्वच्छता मोहीम ६.० चा प्रारंभ

▶▶ **१२ पाण्याच्या टाक्यांच्या परिसरात केली साफसफाई**

▶▶ **८ टन कचरा केला संकलित**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

महापालिकेच्या स्वच्छता मोहीम ६.० चा प्रारंभ आज करण्यात आला आहे. या अंतर्गत शहर व हद्दवाढ भागातील विविध ठिकाणच्या पाण्यांच्या टाक्यांचा परिसर स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली आहे. मोहिमेच्या पहिल्या दिवशी आज विविध १२ ठिकाणच्या पाण्याच्या टाक्यांचा परिसरात साफसफाई करण्यात आली.

**या ठिकाणी राबवली स्वच्छता मोहीम**

कोंडी एम बी आर, बी. ग्रुप नवीन विडी घरकुल पाणी टाकी, मेहताब नगर-शेळगी, जोडभावी पेठ पोलीस स्टेशन, दयानंद कॉलेज, कर्णिक नगर-भद्रावती पेठ, एम.आय.डी.सी. अक्कलकोट रोड, शांती नगर, मजरेवाडी भाग १. लोकमत समोर मजरेवाडी, आदित्य नगर आरटीओ ऑफिस जवळ, स्टोअर टाकी, सिव्हील हॉस्पिटल समोर, हायलेव्हल झोन टाकी, सिव्हील हॉस्पिटल पाठीमागे पाणी टाकी येथे स्वच्छता करण्यात आली.

सोलापूर शहर व हद्दवाढ भागात नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी एकूण ३५ ठिकाणी उंचावरील व जमिनीवरील टाक्याच्या असलेल्या पिण्याच्या पाण्याचे टाक्याच्या आजूबाजूला असलेले झाडी झुडपे, गवत, माती- अजोरा, कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असल्याने आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी सोलापूर महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या स्मशानभूमीच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेच्या आज पहिल्या दिवशी असून



या मोहिमेमध्ये एकूण १२ पाणी टाकी परिसर स्वच्छता करण्यात आली. दैनंदिन कचरा संकलना व्यतिरिक्त आज घेण्यात आलेल्या मोहिमेमध्ये एकूण ७-८ टन इतका कचरा संकलित करण्यात आला. ही मोहिम घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे , विभागीय कार्यालयाकडील विभागीय अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व अवेक्षक यांच्या नियंत्रणाखाली सर्व झाडूवाला/झाडूवाली, बिगारी, सफाई कामगार, मजूर यांचे समन्वयाने राबविण्यात आली.या मोहिमेमध्ये एकूण १४८ सेवक ३ जेसेबी व २ डम्पर यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# जीएसटी भवनच्या इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करा : उपमुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २० ऑगस्ट-**

वडाळा येथे उभारण्यात येत असलेल्या जीएसटी भवनच्या चार पैकी पहिल्या इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे. राज्य शासनाच्या कार्यालयासाठी असलेल्या या इमारतीमध्ये मुंबईमधील भाड्याच्या जागेमध्ये असलेली शासकीय कार्यालये स्थलांतरित करावीत,अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी दिल्या.



त्यांच्या कार्यालयातील समिती कक्षामध्ये जीएसटी भवन येथे विविध शासकीय कार्यालयांना जागा वाटपाबाबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, जीएसटी आयुक्त आशिष शर्मा आदी उपस्थित होते.

जीएसटी भवनची इमारत कार्पोरेट धर्तीवर तयार करावी असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, या इमारतीमध्ये शासकीय कार्यालयांना जागा देताना नियमा प्रमाणे जागेचे वाटप करण्यात यावे. सध्या भाड्याच्या जागेमध्ये आलेल्या कार्यालयांच्या जागेची माहिती घेण्यात यावी.

त्याप्रमाणे वाटप करण्यात आल्यानंतर शिल्लक राहणारी जागा खासगी कंपन्यांना भाड्याने देण्याबाबत प्रस्ताव करावा. शासकीय कार्यालयांना जागा वाटपासाठी अपर मुख्य सचिव वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जीएसटी आयुक्त यांची संयुक्त समिती स्थापन करावी,अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

वडाळा येथील जीएसटी भवन या इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या ४ लाख ३० हजार चौ. फूट जागेमध्ये शासनाची कार्यालये असणार आहेत. तसेच या ठिकाणी मेट्रो स्टेशन, उपनगरीय स्टेशन, पूर्व मुक्त मार्ग व अटल सेतू या रस्ते मार्गांची जोडणी असणार आहे.

# एसबीआय, एशियन डेव्हलपमेंट बँकेतर्फे सोलार सखी अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

सौर ऊर्जेच्या वापरा संबंधी देशात मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे गरजेचे आहे. सौर ऊर्जेचा खरोखरच विकास करायचा असेल तर या योजना शाश्वत पद्धतीने राबवल्या गेल्या पाहिजेत. असे मत राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १० चे समादेशक डॉ. दिपाली काळे यांनी व्यक्त केले. तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

स्टेट बँक ऑफ इंडिया व एशियन डेव्हलपमेंट बँक यांच्या संयुक्त विद्यमाने सोलार सखी नारी सौर ऊर्जा अनुरक्षण अभियान या उपक्रमाचे शहरातील सेंटर पॉईंट या हॉटेलमध्ये आयोजन करण्यात आले होते. यावेळी सोलार सखीना मार्गदर्शन करताना डॉ. काळे या बोलत होत्या.

यावेळी स्टेट बँक ऑफ इंडियाचे महाप्रबंधक रवींद्र हिंताली, यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित केले. वरिष्ठ



प्रकल्प अधिकारी जिगर भट्ट व संचालक आदित्य प्रतापसिंह यांनी उपस्थितांना ऑनलाईन मार्गदर्शन केले. तर क्षेत्रीय व्यवसाय कार्यालय सोलापूरचे आनंदकुमार पाटकर ,उप प्रबंधक अभिजीत जुननकर, यांनी बँकेच्या अस्मिता योजनेबद्दल माहिती दिली.

एशियन डेव्हलपमेंट बँकेचे सौरऊर्जा तज्ञ अरविंद करंदीकर छतावरील सौर ऊर्जा प्रणाली वापरण्याबाबत आणि देखभाली संबंधित माहिती सांगितली.

यावेळी मिटकॉनचे मुख्य प्रशिक्षक चंद्रकांत लोंढे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे सहाय्यक महाप्रबंधक अंजली प्रकाश, आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन वर्धराज मिर्जी यांनी केले .तर उपस्थितांचे आभार स्टेट बँक ऑफ इंडिया ,जुळे सोलापूर शाखेचे व्यवस्थापक विशाल गायकवाड यांनी मानले.

प्रशिक्षणात दीडशे महिलांचा सहभाग. सोलार सखी, नारी सौर ऊर्जा अनुरक्षण अभियानाकरिता सोलापूर शहर व जिल्ह्यामधून एकूण दीडशे महिलांना निमंत्रित करण्यात आले होते. एसबीआयच्या महिला उद्योजकासाठी एसबीआय अस्मिता कर्ज योजनासंबंधीही मार्गदर्शन करण्यात आले. ज्या महिलांनी सुर्यघर योजने अंतर्गत कर्ज घेतले होते अशा महिलांना या कार्यक्रमात निमंत्रित केले होते.

# ठाकरे बंधूंचा 'बेस्ट' पराभव

## पतपेढीच्या निवडणुकीत भोपळाही फुटला नाही

**शशांक रावच्या पॅनलला बहुमत** | **प्रसाद लाडांच्या पॅनलला ७ जागा**

◆ **मुंबई, २० ऑगस्ट**

'दी बेस्ट एम्प्लॉईज को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी'ची निवडणूक उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंनी एकत्रित लढल्याने, या निवडणुकीची राज्यभरात चर्चा होती. मात्र, या निवडणुकीत ठाकरे बंधुंच्या उत्कर्ष पॅनलचा सुपडा साफ झाला असून, त्यांना भोपळाही फोडता आला नाही. आमदार प्रसाद लाड यांच्या समृद्धी पॅनलने सात जागांवर विजय मिळवला. कुठेही चर्चेत नसलेल्या शशांक राव यांच्या बेस्ट वर्कर्स युनियनने तब्बल १४ जागा जिंकत धक्का दिला आहे.

मराठी-हिंदीच्या मुद्यावर उद्धव आणि राज हे ठाकरे बंधू २० वर्षांनंतर एकत्र आले. आता निवडणुकादेखील एकत्र लढवू या विचारातून, महापालिका निवडणुकीची पहिली रंगीत तालीम म्हणून दोन्ही ठाकरे बंधूनी बेस्ट पतपेढीची निवडणूक एकत्रित लढण्याचा निर्णय घेतला. ◀(तभा वृत्तसेवा)

**लोकांनी नाकारले : फडणवीस**

≫ ही पतपेढीची निवडणूक आहे. परंतु, ठाकरे बंधूंनी या निवडणुकीचे मोठे राजकारण केले. शशांक राव आणि प्रसाद लाड हे आमचेच आहेत. ठाकरे बंधू एकत्र, ब्रॅण्ड ठाकरे निवडून येणार, या वल्गना लोकांना आवडल्या नाही. त्यामुळे एकही जागा त्यांना मिळाली नाही. या निवडणुकीत त्यांना लोकांनी नाकारले, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. ■

# शेतातील पिकांची नुकसान भरपाई द्या : सरपंच वनिता सुरवसे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० ऑगस्ट-**

अति पावसामुळे गोगांव, खैराट, भुरीकवठे, वागदरी सह अनेक गावात मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झालेले असून त्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी गोगांवच्या सरपंच वनिता सुरवसे यांनी तहसीलदार,आमदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

वागदरी मंडलात प्रर्जन्यमापक यंत्रणा नसल्यामुळे सदर माहिती प्रशासनास कळण्यास उशिरा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन देखील त्यांना मदत मिळत नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत. यंदा मे महिन्यात पाऊस

> वागदरी मंडल मध्ये मोठे पाऊस होऊन शेतीचे मोठे नुकसान झाले आहे वागदरी मंडल मध्ये प्रजन मापक यंत्रणा नसल्याने यांची माहिती प्रशासनास मिळणे अवघड आहे त्यासाठी या मंडल मधील सर्व ग्रामपंचायत यांनी ग्रामसभेत शेतीच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत ठराव घेण्यात येणार आहे. **- कमलाकर सोनकांबळे** उपसरपंच, गोगांव

आल्याने पेरणी लवकर करण्यात आली होती. गेल्या वीस पंचवीस दिवसापासून सतत पाऊस चालू असल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उडीद, मूग हे पीक काढणीस येऊन देखील पीक शेतकऱ्यांना काढता आले नाही.

सोयाबीन, तूर, या पिकांना पाणी लागून नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी खाजगी सावकाराकडून पैसे काढून बी बियाणे, खत आणून पेरणी केली आहे. यावर्षी सोलापूर जिल्हाबँक आणि सोसायट्या नी सुद्धा कर्ज पुरवठा केला नाही,त्यामुळे लोकांकडून घेतलेले कर्ज फेडायचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उपस्थित झाला आहे. जर मदत नाही मिळाली तर शेतकऱ्याकडून येत्या निवडणुकीत त्याचे परिणाम भोगावे लागतील हे प्रशासन आणि सरकारने ध्यानात घ्यायला हवे.

यासाठी शासनाने त्वरित शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी मदत द्यावी अशी मागणी सरपंच वनिता सुरवसे यांनी केली आहे.

# दोन वेळा सूचना तरीही 'डीजे'चा आवाज वाढवला

● **जेलरोड पोलिसांची मंडळावर कारवाई**

● **मंडळ अध्यक्ष तसेच डीजे चालकावर गुन्हा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

डीजेमुक्त सोलापूर ही चळवळीने वेग घेत असतानाच निलकंठेश्वर जयंती मिरवणूक व श्री वीरशैव मडिवाळेश्वर रथोत्सव मिरवणुकीत सहभागी मंडळांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. दोन वेळा सूचना देऊनही पुन्हा आवाज वाढविणाऱ्या मंडळांवर जेलरोड पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये मंडळाचे अध्यक्ष तसेच डीजे चालकावर मिरवणूक मार्गावरील रहिवाशांना त्रास होऊन जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले.

शहरात ७ ऑगस्ट रोजी निलकंठेश्वर जयंती निमित्त मिरवूणक काढण्यात आली होती. जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एस.व्ही. मंडळाला अटी व शर्ती घालून परवानगी दिली होती. सायंकाळी सहाच्या सुमारास ट्रॅक्टरवर साऊंड लावून महिंद्रकर ज्वेलर्ससमोर मराठी व हिंदी गाणे वाजविली जात होती. त्यावेळी पोलिसांनी आवाजाची मर्यादा तपासली. तेव्हा ८०.६ डेसिबल इतका आवाज नोंदला गेला. त्यानंतर मिरवणूक मार्गावरील कुचन नगरजवळ मंडळाची मिरवणूक आली असता, डीजेचा आवाज पुन्हा वाढल्याचे लक्षात आल्याने पोलिसांनी तपासणी केली. त्यावेळी ११०.३ डेसिबल इतका आवाज नोंदला गेला. आवाजाची मर्यादा वाढवून सामान्य लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्याविषयी मंडळाच्या पदाधिका-यांना सूचना केली. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून आवाज वाढविल्याचे तपासणीत समोर आले. १८ ऑगस्ट रोजी निघालेल्या श्री वीरशैव मडीवाळेश्वर रथोत्सव मिरवणुकीत भगवे राजे प्रतिष्ठान मंडळाने तीन वेळा आवाजाची मर्यादा ओलांडली. दोनवेळा सूचना देण्यात आली होती. परंतु दाजी पेठ व पद्मशाली चौक येथे आल्यानंतर मंडळांनी आवाज वाढविल्याचे तपासात समोर आले. याप्रकरणी प्रकाश सिद्राम केंचीगुंडी (वय ३०) व डीजे चालक किरण रमेश अन्नलदास (वय २५), विशाल कानकुर्ती (वय ३०, सर्व रा. सोलापूर) व डीजे चालक ओंकार प्रकाश सोनवणे (वय २३, रा. कवठे महाकांळ, जि सांगली) यांच्यविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



# डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनामागील सूत्रधार शोधा

## अंनिस शहर शाखेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनामागील सूत्रधार अद्याप मोकाट आहेत त्यांचा शासनाने शोध घेतला पाहिजे अशा आशयाचे निवेदन आज डॉ नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना देण्यात आले.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, विवेकवादाचा प्रसार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजविण्यासाठी आयुष्य वेचले. समाजाला विचार करण्याची ताकद, प्रश्न विचारण्याचं धैर्य आणि तर्कशुद्धतेचा मार्ग दाखविला जादूटोणा विरोधी कायदा होण्यासाठी डॉ. दाभोलकर यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. अतिशय ओघवत्या भाषेत त्यांनी आयुष्यभर अंधश्रद्धेच्या विरोधात समाजाचे प्रबोधन केले. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येला आज १२ वर्षे पूर्ण झाली. तरीही त्यांच्या खऱ्या मारेकऱ्यांने आजही पोलिस आणि सरकारने पकडलेले नाही. त्यांचा शोध घेतला पाहिजे असे निवेदनात म्हंटले आहे. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना अध्यक्ष शंकर खलसोडे यांनी निवेदन दिले यावेळी राज्य कार्यकारिणी सदस्य निशा भोसले, उषा शहा, अॅड. सरिता मोकाशी, सचिव लालनाथ चव्हाण, व्ही. डी. गायकवाड, मधुरा सलवार, आर. डी. गायकवाड, डॉ. निनाद शहा, डॉ. डी. वाय. पांडगळे, लता ढेरे, शकुंतला सूर्यवंशी, सुनिता गायकवाड, मिलिंद गायकवाड उपस्थित होते.

# तीन तालुक्याच्या आठ मंडलातील ४१ हजार हेक्टरवरील नुकसानीचा प्राथमिक अहवाल तयार

▶▶ **जिल्हाधिकाऱ्यांकडून लवकरच शासनाकडे जाणार अहवाल**

▶▶ **महसूल विभागाकडून पंचनामेही सुरू**

▶▶ **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

गेल्या १५ दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला होता. यामध्ये उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील ८ मंडलात अतिवृष्टी झाल्याने शासनाच्या निकषाप्रमाणे या भागाची पाहणी करून या तालुक्यातील ४१ हजार हेक्टरवरील पीक नुकसानीचा प्राथमिक अहवाल तयार केल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २०) दिली.

यंदा कधी नाही तो मे महिन्यातच अवकाळीचा तब्बल २२० मिलीमीटर इतका पाऊस झाला होता. मे च्या दमदार पावसावरच जूनमध्ये शेतकरी बांधवांनी खरिपाची पेरणी करून घेतली. पेरणी झाल्यावर पिकांची उगवणही चांगली झाली मात्र पुन्हा जून-जुलैच्या ४ नक्षत्रातील पाऊस अत्यल्पच झाल्याने खरिपातील पिकांनी दुपार धरली होती. यामुळे शेतकरीदादा पुन्हा धास्तावला होता. मात्र ऑगस्ट महिना उजाडल्यावर आश्लेषाच्या पावसाचे पुनरागमन झाले आणि आश्लेषा आणि मघा नक्षत्राच्या पावसाने अक्षरश: जिल्ह्याला झोडपून काढले. जिल्ह्याच्या काही भागातील मंडलात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे मोठे नुकसानही झाले आहे. यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंचनामे करण्याचे आदेशही दिले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनीही कृषी कर्मचाऱ्यांकडून जिल्ह्यातील अतिवृष्टीचा आढावा घेतला आणि जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या आदेशानुसार प्राथमिक अहवालही तयार केला आहे. हा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्यामार्फत शासनाकडे लवकरच पाठविला जाणार आहे. यानंतर नुकसानीची भरपाई थेट डिबीडीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणार असल्याचीही माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी दिली. वरील ३ तालुक्यातील ८ मंडलातच सध्या अतिवृष्टीची नोंद झाली असून, पंचनामे समोर आल्यानंतर इतर तालुक्यांचे चित्र समोर येणार आहे.

**उत्तर, दक्षिण अन् अक्लकोट तालुक्यात सर्वाधीक पाऊस**

जून ते आजतागायत उत्तर सोलापूर ४०६.७ मिमी इतका पाऊस नोंदला आहे तर दक्षिण सोलापूर ४४८.१, बार्शी ३३१.९, अक्कलकोट ३८२.४, मोहोळ २७३.६, माढा २५७.१, करमाळा २४७.०, पंढरपूर १९७.०, सांगोला २३४.४, माळशिरस २०५.६, मंगळवेढा २३२.७ असा जिल्हाभरात सरासरी २७६.२ मिमी इतका पाऊस नोंदला गेला आहे. दरम्यान, उत्तर अन् दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला असून, या भागातील ८ मंडलात अतिवृष्टी झाल्याने त्या भागातील नुकसानीचे पंचनामेही सुरू झाले आहेत.

**जिल्ह्यात १३० टक्के पेरणी**

सोलापूर जिल्ह्यात यंदा मे महिन्यातच चांगला पाऊस बरसल्याने आणि जून महिन्यात पावसाने उघडीप दिल्यानंतर शेतकऱ्यांनी आपल्या खरिपाच्या पेरण्या उरकल्या आहेत. जून-जुलैअखेरपर्यंत १३० टक्के खरिपाची पेरणी झाली असून, आता पिकेही जोमदार आली आहेत. मात्र अतिवृष्टीमुळे या पिकांना बाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास जातो की काय? अशी भीती जाणकार शेतकरी बोलून दाखवित आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# ऑनलाईन गेमिंगचा भस्मासुर रोखण्यासाठी...

आपल्या परंपरेत आणि आपल्या लोकसंस्कृतीत बाटली, बाई आणि जुगार, इंग्रजीत बोलायचे झाले तर रम, रमा आणि रमी यांचा नाद, सवय किंवा व्यसन निषिद्ध मानले आहे. जाणकार अभ्यासक या तीनपैकी जुगार किंवा रमी यांना सर्वाधिक धोकादायक मानतात. पत्ते, जुवा, जुगार, मटका, सट्टा, तीन पत्ती, थ्री कार्ड्स, कॅसिनो, द्यूत, चौसर अशा विविध प्रकारांनी किंवा नावांनी माणसाला आर्थिकदृष्ट्या बरबाद करणारे म्हणून हे खेळ ओळखले जातात. सुरुवातीला यातील काही खेळ हे 'खेळ' म्हणूनच आपण अनुभवू शकतो. जोपर्यंत हे काही प्रकार खेळ म्हणूनच खेळले जातील, तोपर्यंत ते निश्चितच आनंददायी आणि निरुपद्रवी असतील. पण या खेळांमध्ये आर्थिक भाग आला की त्यात रस घेणाऱ्यांची घसरण सुरू होते. ही घसरण प्रामुख्याने आर्थिक असते. त्यात पैसा 'पणा'ला लावण्यापासून सुरुवात होते. मग ईर्ष्या, चढाओढ, हार-जीत, जिद्द, खुन्नस, माज, मस्ती या साऱ्यांची त्यात सरमिसळ होते. पैसा पणाला लावण्यापासून सुरू झालेला 'हा बरबादीचा खेळ' पैशांनंतर प्रॉपर्टी आणि क्वचित प्रसंगी बायकोसारखी जवळची व्यक्ती पणाला लावण्यापर्यंत पोहोचतो, असे आपण कधी कधी ऐकत-वाचत असतो. संपत्ती आणि धर्मपत्नी पणाला लावण्यातून आणि त्यांना गमावण्यातून किंवा जिंकण्यातूनही कसे 'महाभारत' घडते, हे आम्हा भारतीयांना सांगायला नकोच.

सुरुवातीला अगदी चिल्लर एक-दोन रुपयांपासून हा पत्त्यांचा जुगार सुरू होतो. हा खेळ गंमत, टाईमपास म्हणून खेळणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. पण जेव्हा हार-जीत, कमावणे-गमावणे सुरू होते, त्यावेळी फायदा-नुकसान हा हिशेब व्हायला लागतो आणि त्यातली गंमत संपते. जो काहीतरी गमावतो, तो परत मिळविण्यासाठी पुन्हा पुन्हा खेळत राहतो. एवढेच नव्हे, तर जिंकतो तो सुद्धा अधिकाधिक जिंकण्यासाठी खेळतच राहतो. या खेळण्या-खेळण्यात हा खेळ आपला कसा खेळखंडोबा करून टाकतो, हे बहुतेकांना कळतही नाही. 'रात्री करोडपती जुगार खेळायला बसले आणि रात्रभरात रस्त्यावरच आले' असे अनेक किस्से आपण आपल्या अवतीभवती पाहत असतो. 'रात्री कारने खेळायला आले आणि रात्रभरात कार गमावून पैदल झाले' अशाही घटना दहापैकी आठांच्या बाबतीत घडू शकतात. रिकाम्या हाताने आलेले बॅगा भरून पैसे घेऊन गेले, असे दोघांच्याच बाबतीत होऊ शकते. एका जुगाऱ्याने म्हणे तीन पत्त्यांच्या जुगारात खूप काही कमावले, पण गमावले नाही. त्याने 'तीन पत्ते' असेच आपल्या कारखानदारीचे 'बोधचिन्ह' बनवून तो कारखाना आंतरराष्ट्रीय दर्जावर नेऊन ठेवला, असेही झाले आहे. पण क्वचितच... आयपीएल सामन्यांसाठी ऑनलाईन टीम तयार करून त्यावर बेटिंग करण्यापासून सुरू झालेला ऑनलाईन जुगाराचा प्रवास आता घरोघर ऑनलाईन तीनपत्ती, रमीपर्यंत येऊन पोहोचला आहे. लोकप्रिय अभिनेते, क्रिकेटर यांनी विविध माध्यमांतून केलेल्या जाहिरातींना बळी पडून सर्वसामान्य लोकसुद्धा या 'फास्ट आणि ईझी मनी'च्या नादी लागून पैसा गमावत आहेत, कर्जबाजारी होत आहेत आणि त्यांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. दुष्परिणामांची कल्पना असूनसुद्धा माणूस त्याच्या आहारी जातो आणि बहुतेक वेळा आपले सर्वस्व गमावून बसतो. जुगार समोरासमोरवाला असो की आभासी, तो चालवणारे कधीच तोट्यात जात नाहीत. त्याला जिंकणाऱ्यांना पैसे द्यावे लागत असले तरी तो तोट्यात जाण्याचा प्रश्न नसतो. कारण तो पैसा कमावण्यासाठीच लोकांना खेळवत असतो. जुगाराला चालना देण्यासाठी विविध मार्गांनी लोकांना सवय आणि पर्यायाने व्यसन लावण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

मोबाईल क्रांतीपूर्वी जुगार अस्तित्वात होताच. परंतु जुगार खेळणे आताइतके सहज नव्हते. घरातून बाहेर पडून विशिष्ट ठिकाणी जाऊन हे सर्व केले जायचे. जुगार खेळण्याला सामाजिक प्रतिष्ठा नव्हतीच. परंतु दुर्दैवाने हे चित्र आता बदलत आहे. बारकाईने पाहिल्यास आपल्या आजूबाजूला ऑनलाईन जुगार खेळणारे अनेक जण दिसून येतील इतके हे सार्वत्रिक झाले आहे. एकेकाळी उन्हाळी सुट्टीत आवर्जून खेळला जाणारा लहान मुलांचा बोर्ड गेम 'ल्युडो' हादेखील आता ऑनलाईन जुगाराच्या कक्षेत आला आहे. अशा ॲप्सवर नोंद केल्यानंतर सुरुवातीला मोठा 'कॅश बोनस' दिला जातो. जुगार खेळणारे सुरुवातीला काही पैसे जिंकतातही. हे जिंकलेले पैसे थेट त्याच्या खात्यात येतात. ऑनलाईन जुगाराची सवय लागते. त्याची परिणती व्यसनात होते. 'ईझी मनी'ची सवय लागते. मग हळूहळू या जुगार खेळाची 'शैली' बदलत जाते. आधी सहजपणे मिळणारे पैसे एकाएकी थांबतात. जुगाराच्या नादी लागलेले लोक पैसे जिंकण्यासाठी म्हणून आणखी खेळत राहतात आणि आणखी पराभूत होत जातात. पैसा गमावतात आणि मन:स्वास्थ्यही. 'ईझी मनी'च्या या व्यसनात आपण कधी कर्जबाजारी होतो ते लक्षातदेखील येत नाही. मग सुरू होते कर्जवसुली, भाईगिरी पद्धतीने. या दुष्टचक्रात अडकून कित्येकांनी आत्महत्या केल्या, याची कुठेही गणना होत नाही. या दुष्टचक्रात पुरुषांबरोबरच महाविद्यालयीन तरुण-तरुणी, विवाहित स्त्रिया, निवृत्त ज्येष्ठ नागरिकदेखील अडकत चालले आहेत, हे तर धक्कादायकच.

याची दुसरी खटकणारी बाजू अशी की, या सर्व प्रकाराला काहीही सामाजिक आणि राजकीय धरबंध नाही. अशा दुष्टचक्रात अडकलेले सर्व समाजाच्या डोळ्यांदेखत अडकवू दिले जात आहेत, असाच याचा अर्थ आहे. लोकप्रिय, प्रसिद्ध अभिनेते या ऑनलाईन जुगाराची जाहिरात अगदी खुलेआम करताना दिसतात. अशा अनेक जाहिरातींमधून अनेक कलाकार भरघोस मोबदला घेऊन काम करतात. पैशांसाठी या जाहिरातींमध्ये काम करणाऱ्या अभिनेत्यांना जबाबदार धरू नये, असे एखादे मत असू शकते. तरीही आपल्या लोकमानसावरील प्रभावाचा आपल्या 'या' दुकानदारीमुळे किती भयंकर दुष्परिणाम होत असतील, याची त्यांना कल्पना नाही, असे असूच शकत नाही. लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या जुगाराच्या जाहिराती करताना या धनदांडग्या कलावंतांना जराही संकोच किंवा लज्जा वाटत नाही, हे आश्चर्यच आहे. प्रत्यक्ष जुगाराच्या अड्ड्यावर दलाली करणारे आणि जाहिराती करणारे हे कलावंत किंवा खेळाडू यांच्यात फरक तो कोणता, असे विचारावे वाटते. भारतातील काही राज्यांनी अशा ऑनलाईन खेळांवर बंदी घातली आहे. अशा जुगारी खेळांसाठी आपण जाहिरात करीत आहोत आणि काही लोकांना बरबाद करीत आहोत, हे त्यांनी लक्षात घ्यायलाच हवे. तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीमुळे जुगार आता बोटाच्या एका क्लिकवर अनिर्बंध खेळता येतो. जुगाराचे व्यसन, त्यातून वाढते कर्ज याचे दुष्परिणाम आता अनिर्बंध वाढू लागले आहेत आणि म्हणूनच या बाबतीत जाणकारांनी सामाजिक भान जागृत करण्याची गरज आहे. एकूणच या ऑनलाईन गेमिंगकडे भारत सरकारचे लक्ष आहे. २०२२ ते फेब्रुवारी २०२५ या काळात केंद्र सरकारने थोड्या थोडक्या नव्हे तर चक्क दीडेक हजार बेकायदेशीर बेटिंग, जुगार आणि गेमिंग साईट्स 'ब्लॉक' करून टाकल्या. आता या ऑनलाईन गेमिंगवर कडक आणि काटेकोर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे विधेयक आणले आहे. बेटिंग ॲप्स आणि सेलिब्रिटींच्या जाहिरातीमुळे भारतात मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याच्या पृष्ठभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळाने ऑनलाईन गेमिंग विधेयकाला मंजुरी दिली व ते लोकसभेत मंजूरही झाले. या प्रस्तावित कायद्याचा उद्देश भारतातील ऑनलाईन गेमिंग क्षेत्राचे नियमन करणे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे होणारी सट्टेबाजी दंडनीय गुन्हा ठरवणे हे आहे. भारतात ऑनलाईन गेमिंग उद्योग २०१९ पर्यंत दुपटीने वाढून ९.१ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. या विधेयकामुळे गेमिंग उद्योग कायदेशीर चौकटीत येणार आहे. त्यातून फसवणुकीचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा आहे. या विधेयकात आर्थिक संस्थांना ऑनलाईन मनी गेमिंगसाठी पैसे ट्रान्सफर करण्यास मनाई केली जाणार आहे. या गेम्सच्या कलाकारांच्या जाहिरातींवरही बंदी येणार आहे. मात्र, ई स्पोर्ट्स आणि कौशल्यावर आधारित मोफत ऑनलाईन गेम्सना प्रोत्साहन दिले जाणार आहे. जिंकलेल्या रकमेवर ३० टक्के कर आणि ऑनलाईन गेमिंगवर २८ टक्के जीएसटी लावण्याची तरतूदही या विधेयकात आहे. त्यामुळे त्याचे स्वागत आणि त्याच्या कठोर अंमलबजावणीची अपेक्षाही.

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# कृत्रिम प्रज्ञा साधेल व्यापक प्रसार

येत्या काळात एआयच्या क्षेत्रातील सगळ्यात मोठी प्रगती मशीन लर्निंग आणि डीप लर्निंगमध्ये होईल. यामुळे यंत्रे अधिक स्मार्ट होतील आणि मनुष्याच्या दृष्टीने 'स्वयंसिद्ध' कामे करू शकतील. जेएनआय आणि चॅटबॉट्स सर्वमान्य होतील. चॅट जीपीटी, डीपसीकमुळे अनेकांना याचे कुतूहल निर्माण झाले. भविष्यात एआयवर आधारित यंत्रणा स्वत: निर्णय घेऊ शकतील. हे विविध क्षेत्रांमध्ये, जसे की वैद्यकीय निदान, उद्योग, वित्तीय क्षेत्र आणि वाहतूक व्यवस्थापनात लागू होईल. एआयच्या मदतीने आरोग्यक्षेत्रात मोठे बदल होतील. स्वयंचलित रोगनिदान, वैद्यकीय उपचारांची अधिक अचूकता आणि आरोग्य सेवांचे प्रभावी वितरण अनुभवता येईल. मोदी सरकारने २०२४ मध्ये भारत एआय मिशन मंजूर केले गेले आणि त्यासाठी १०,३०० कोटी रुपयांची रक्कम निर्धारित केली. पुढील पाच वर्षांमध्ये हा निधी विविध भागांमध्ये भारत एआय मिशनच्या अंमलबजावणीसाठी वापरला जाणार आहे.

संगणक उत्पादक विक्रीसाठी सतत नवनवीन मार्ग शोधत असतात. कारण हा व्यूहात्मक धोरणाचा भाग असतो. अधिक यूजरफ्रेंडली उत्पादने जास्त वापरली जातात, विकली जातात हा साधा हिशेब असतो. यूजर इंटरफेस म्हणजे वापरकर्ता संगणकप्रणाली किंवा प्रोग्रामशी कसा संवाद साधू शकतो याचे शास्त्र. उदाहरणार्थ, वापरकर्त्यांना संगणक प्रोग्रामशी संवाद साधण्यासाठी माउस, कीबोर्ड आणि संगणक स्क्रीनची आवश्यकता असते. आता ध्वनी (ऑडिओ) आणि चलतचित्रे (व्हिडीओ) ही माध्यमे जास्त लोकप्रिय होत आहेत. त्याचबरोबर एखादे प्रोडक्ट अनेक देशांमध्ये सादर केले जाते तेव्हा स्थानिक परिभाषा, संस्कृती आदी घटक लक्षात घेतले जातात. यामुळे लँग टेक हा नवा प्रवाह उदयास आला आहे. जागतिक उत्पादनाचे स्थानिकीकरण (लोकलायझेशन) करणे हा एक मोठा व्यवसाय आहे. लँग टेक सेवांचे तीन भागात वर्गीकरण केले जाते- ब्रँड, वेबवरील माहिती, डिजिटल मार्केटिंगचा प्रयत्न आणि स्थानिक भाषेतील मजकुराचे स्थानिकीकरण; ज्यामुळे स्थानिक बाजारपेठेत विश्वास निर्माण होतो. यामध्ये वेबसाईट, ऑनलाईन मदत, व्हिडीओ (संवाद, मजकूर), चॅटबॉट्स, ऑनलाईन गेम्स (खेळ), ईआरपी सॉफ्टवेअरमधील यूजर इंटरफेस, रिपोर्ट्स या घटकांचा समावेश होतो. या सॉफ्टवेअर प्रकल्पांना स्थानिक भाषेचे ज्ञान, भाषांतर करणे, प्रणाली स्थानिकीकरण, त्यानुसार आवश्यक तंत्रज्ञान ही सर्व कौशल्ये आवश्यक असतात



'जनरेटिव्ह एआय' हे एक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आहे. ते मजकूर, प्रतिमा, संगीत आणि व्हिडीओ स्वरूपात नवी माहिती तयार करू शकते. 'जनरेट' या शब्दाचा अर्थ निर्मिती. 'जनरेटिव्ह एआय'चे प्रचलित उदाहरण म्हणजे चॅटबॉट्स, ज्यांनी जगात क्रांती आणली आहे. मानवासारखा संवादात्मक मजकूर लिहिण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दल सर्व जण चकित आहेत. ज्या माहितीवर त्यांना प्रशिक्षित केले जाते त्यातून ते प्रथम पृथक्करण करतात आणि त्याचा निष्कर्ष म्हणजे अवघड कल्पना व्यक्त करू शकतात, जे मानवाला कदाचित लगेच जमले नसते. काही बाबतीत तर हे अशक्य ठरते. जनरेटिव्ह एआय ही संकल्पना मशीन-लर्निंग मॉडेल्सवर आधारित आहे. जी मानवी मेंदूसारखे कार्य करते. जनरेटिव्ह एआय चॅटबॉट्स आजकल खूप लोकप्रिय होत आहेत. हे चॅटबॉट्स मानवाप्रमाणेच संवाद साधू शकतात आणि विविध प्रकारच्या माहितीचे आदानप्रदान करू शकतात. माणसाला प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी काही वेळ लागू शकतो, तर चॅटबॉट्स त्वरित प्रतिसाद देतात. चॅटबॉट्स हे ग्राहक सेवा आणि व्यवस्थापन क्षेत्राचे भविष्य आहे.

हे तंत्र फक्त माहितीवर मर्यादित नसून ध्वनी, चित्र, चलचित्रही (व्हिडीओ) तयार करू शकते. जनरेटिव्ह एआय आश्चर्यकारकपणे वास्तववादी प्रतिमा तयार करू शकते, जे छायाचित्रांसारखे दिसते. या प्रतिमा मजकूर वर्णनावर आधारित किंवा साठवलेल्या डेटामधून प्रतिमा हाताळून तयार केल्या जाऊ शकतात. यामुळेच फेक व्हिडीओची समस्या निर्माण झाली आहे. मागल्या वर्षी हॉलिवूडमध्ये संवादलेखक (स्क्रिप्ट रायटर्स) संपावर जाण्यामागे एआयचा वापर हेही एक कारण होते. मराठी भाषेसंदर्भात एआय क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण कामे सुरू आहेत. यामुळे मराठी भाषा डिजिटल युगात अधिक प्रभावी होत आहे. ही कामे प्रामुख्याने नैसर्गिक भाषा प्रक्रिया या उपशाखेत मोडतात. भाषिणी हा भारत सरकारने सुरू केलेली एक राष्ट्रीय एआय भाषांतर मोहीम आहे. यात भारतीय भाषांमध्ये सामग्रीचे भाषांतर करण्यासाठी ३००+ पूर्वप्रशिक्षित एआय मॉडेल्स आहेत, ज्यात मराठीसाठीही सुविधा आहे. गुगल असिस्टंट, सिरी, एलेक्सासारख्या आवाज साहाय्यकांमध्ये मराठीतून संवाद साधता येतो. यामुळे वापरकर्त्यांना मराठीत विविध कार्ये सहज करता येतात. तसेच एआय आधारित भाषांतर साधने इंग्रजी आणि इतर भाषांमधील मजकुराचे मराठीत भाषांतर करण्यासाठी मदत करत आहेत.

सध्या अनेक कंपन्या आणि संस्था आपल्या चॅटबॉट्समध्ये मराठी भाषेचा समावेश करत असल्यामुळे मराठी भाषिकांना प्रश्नांची उत्तरे मिळवणे सोपे झाले आहे. चॅटजीपीटी, जेमिनी, परप्लेक्सिटीसारख्या मोठ्या भाषा मॉडेल्समध्ये मराठी मजकूर तयार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता विकसित केली जात आहे. यामुळे मराठीत लेख, कथा, कविता आणि इतर मजकूर तयार करणे शक्य झाले आहे. एआयचा वापर करून मराठीत शैक्षणिक साहित्य तयार केले जात आहे. खान अकॅडमीसारखी लोकप्रिय ॲप्स आता मराठीत उपलब्ध आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना सोप्या आणि आकर्षक पद्धतीने शिक्षण मिळवता येते. सीओईपी महाविद्यालयातील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा विश्व नावाचा एक प्रकल्प तयार केला आहे, जो मराठी साहित्याचे संरक्षण आणि प्रचार करण्यासाठी मदत करतो. मराठी भाषेसाठी नैसर्गिक भाषा प्रक्रिया (एनएलपी) आणि इतर एआय संबंधित तंत्रज्ञानावर संशोधन सुरू आहे. यात मराठीतील बोलीभाषा समजून घेण्यावरदेखील भर दिला जात आहे. यामुळे मॉडेल्स मराठी भाषेच्या विविध पैलूंचा अभ्यास करून अधिक अचूक होतील. अनेक उद्योग एआय वापरत आहेत. काही शेतकरीसुद्धा या तंत्राचा फायदा घेत आहेत. येत्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये प्रवेश करेल आणि समाजातील सर्व क्षेत्रांना आकार देईल. या बदलांमुळे जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित होईलच, परंतु त्याचबरोबर नवीन नैतिक, सामाजिक, आणि तंत्रज्ञानविषयक आव्हानेदेखील समोर येतील. एआयच्या वापरामध्ये नैतिक मुद्दे आणि सामाजिक आव्हाने येऊ शकतात. त्यात डेटा गोपनीयता, निर्णयाच्या परिणामांची जबाबदारी महत्त्वाची असेल. फेक माहिती तयार करणे आणि पसरवणे अनैतिक आहे. दुर्दैवाने इथे सायबर कायदे अधिक प्रभावी करायची गरज आहे. हे भविष्य ध्यानात घेऊन शिक्षणक्रम, ते शिकवणाऱ्या संस्था आणि त्यांच्या शिकवण्याच्या पद्धती यामध्येही कालानुरूप बदल व्हायला हवेत. यातून शाळकरी मुले-मुली आणि महाविद्यालयीन युवा पिढीतील कल्पकता आणि नवनिर्मितीच्या ईर्ष्येला प्रोत्साहन मिळाले पाहिजे कारण अशाच व्यक्ती चाकोरीबद्ध कामांवर अवलंबून न राहता स्वत:ला आणि समाजाला पुढे नेऊ शकतील. म्हणजेच बदल समजून घेणे आणि आत्मसात करणे हे एक कठीण काम एकविसाव्या शतकात जन्मलेल्या पिढीला करावे लागणार आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नीलेश जोशी

# नैतिक मूल्यांची शिकवण दृढ व्हावी

भारतीय संस्कृतीत महिलांना पूर्वीपासूनच पूजनीय स्थान आहे. नवरात्रीचे नऊ दिवस तर स्त्रीच्या विविध रूपांची आराधना येथील समस्त समाज करीत असतो. एवढेच नव्हे तर 'नारी तू नारायणी' यावर श्रद्धा असलेला आमचा समाज, संस्कृती आहे. या संस्कृतीत जेवढे राष्ट्राचे रक्षण महत्त्वाचे मानले गेले तेवढीच महत्त्वाची महिलांची सुरक्षा देखील मानली गेली. महिलांचा सन्मान, सुरक्षेसाठी प्रसंगी प्राणपणाने संघर्ष केल्याची अनेक उदाहरणे इतिहासात सापडतील. पण ही संस्कृती असणाऱ्या समाजातच महिला सुरक्षेविषयीची काळजी वाटावी अशा घटना सातत्याने घडताना दिसतात. मग स्वाभाविकच सामान्य सज्जनांचा संताप होतो. काही प्रसंगी हा सात्त्विक संताप सामूहिकरीत्या व्यक्त होतानाही दिसून येतो. त्या-त्या वेळी अनेक जण नानाविध प्रश्न देखील व्यवस्थेला विचारतात. यात प्रामुख्याने रोष व्यक्त होतो तो कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या शासनावर आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे दायित्व असलेल्या पोलिस प्रशासनावर. खरं म्हणजे हा संताप योग्यच. पण एकीकडे मातृ पूजनाची परंपरा जपणारा, नवरात्रीचे नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना करणारा समाज, तर दुसरीकडे त्याच समाजात असणारी काहींची विकृत मनोवृत्ती हा विरोधाभास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा, कारणांचा आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचा समाजातील सर्वच घटकांना विचार करावा लागणार आहे. केवळ शासन आणि पोलिस प्रशासन यांच्यावर ही जबाबदारी ढकलून नामानिराळे निश्चितच होता येणार नाही.

महिलांवर विविध प्रकारच्या अत्याचाऱ्यांचे वृत्त नित्याचेच झाले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या २०२२ सालच्या अहवालानंतर देशात दररोज ८६ बलात्काराच्या घटनांची नोंद करण्यात आली. अर्थात दर १६ मिनिटांनी एका महिलेवर बलात्कार झाल्याचा गुन्हा नोंदविला गेला. यात आणखी वेदनादायी म्हणजे दर तीन दिवसांनी दोन महिलांची बलात्कारानंतर हत्या केल्या गेली. तर २०२४ सालात महिलांवरील अत्याचारांचे ४६,४५९ गुन्हे नोंदविण्यात आले. यात ७,९४० बलात्कार, ८८३ अपहरण, हुंडाबळी १३९, पती व नातलगांकडून क्रूर कृत्य १०,५३९, विनयभंग व लैंगिक छळ १७,६७१ आदींचा समावेश आहे. यातील दोषसिद्धीचे प्रमाण महाराष्ट्रात सुमारे ३४.३ टक्के इतके आहे.

२०२३ च्या तुलनेत २०२४ साली महिला अत्याचारांच्या प्रमाणात काहीशी घट झाली असली तरी ही आकडेवारी देखील मन सुन्न करणारी आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक कायदे आहेत. परिस्थितीनुरूप हे कायदे अद्ययावत आणि आणखी कठोर करण्यात आले. महिलांना अत्याचार, हिंसा, छळ आणि भेदभावांपासून संरक्षण देणे हा या कायद्यांचा उद्देश. केंद्र, राज्य शासनात महिला आणि बाल कल्याण विकास हे महत्त्वाचे मंत्रालय देखील महिलांच्या विकास आणि संरक्षणासाठी आहे. पण असे असताना देखील दिवसेंदिवस महिलांवरील वाढणारे अत्याचार आणि अत्याचार करणारी विकृत मानसिकता समाज व्यवस्थेसमोर प्रश्न म्हणून उभी आहे म्हणूनच केवळ कायदा, शासन, पोलिस प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांनीच याबाबतचा विचार करणे पुरेसे ठरणार नाही तर या समस्येच्या मुळाशी जाऊन समाजव्यवस्थेत नेमकी काय चूक होत आहे याचाही विचार करणे आवश्यक ठरेल. यासाठी समाजातील सज्जनशक्तीने पुढाकार घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

मातृ पूजनाची परंपरा, बहिणीच्या रक्षणाचे बंधन उत्सव म्हणून साजरा करणारी आमची संस्कृती. पण तरीही ही विकृती का वाढतेय् याचा विचार करता अनेकानेक कारणे समोर येतात पण मुख्यतः कालौघात समाजव्यवस्थेत आणि त्यातही कुटुंब व्यवस्थेत होत असलेले बदल अनेक प्रश्न निर्माण करणारे असल्याचे मत समाज शास्त्रज्ञांचे आहे. पूर्वी कुटुंबातून होणारा संस्कार, कुटुंबातील घटकांचा नैतिक धाक हा क्षीण झाला आहे. त्यातच समाजमाध्यमांच्या अतिरेकी, अविवेकी वापराला वयाचे बंधन नसल्याचे दिसून येते. विविध समाजमाध्यमातून नको त्या बाबी पाहण्याचा छंद अनेकांना कळत्या-नकळत्या वयात लागला आहे. त्यातून उद्दीपित होणाऱ्या भावना देखील समाजातील या विकृतीला कारणीभूत आहेत. पण मुख्यतः कुटुंब व्यवस्थेतून होणारा संस्कार, नैतिक मूल्यांची रुजवण ही सैल झाल्याचे देखील महत्त्वपूर्ण कारण या समस्येचा खोलवर विचार करता समोर येते. म्हणूनच कायद्याने त्याचे काम चोख करावेच, न्याय व्यवस्थेने कुणाचीही गय करू नये पण समाजातील कुटुंब संस्कार, नैतिक मूल्यांची शिकवणूक ही परंपरागत व्यवस्था दृढ व्हावी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक आणि राधाकृष्णन्

रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार चंद्रपुरम पोन्नुस्वामी (सी. पी.) राधाकृष्णन् यांनी बुधवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना रालोआने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात जे शक्तिप्रदर्शन केले, त्यावरून राधाकृष्णन् यांचा विजय १०० टक्के निश्चित आहे. इंडिया आघाडीने राधाकृष्णन् यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली आहे. रेड्डी गुरुवारी म्हणजे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अर्ज भरू शकतात. उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार जाहीर करण्यात तसेच उमेदवारी अर्ज भरण्यात रालोआने बाजी मारली. यात इंडिया आघाडी माघारली आहे. इंडिया आघाडीला आपला उमेदवार लवकर जाहीर करता आला नाही तसेच त्याचा उमेदवारी अर्ज दाखल करायलाही त्यांनी वेळ घेतला. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत दूरचा विचार करत भाजपाने राधाकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली आहे. या निवडणुकीत यावेळी दक्षिण भारताचा उमेदवार देत भाजपाने एकाच दगडात अनेक पक्षी मारलेत. राधाकृष्णन् कौंडर जातीचे आहेत. ही जात ओबीसीत येते. तामिळनाडूत सत्तारूढ असलेल्या द्रमुकचे राजकारण ओबीसी केंद्रित आहे. त्याला छेद देण्यासाठी भाजपाने राधाकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली, असे दिसते. राधाकृष्णन् उपराष्ट्रपतिपदावर निवडून आल्यानंतर त्याचा फायदा भाजपाला फक्त तामिळनाडूतच नाही, दक्षिण भारतातील सर्व राज्यांत मिळू शकतो. तेलगू देसम, जनकल्याण समिती अशा सर्व पक्षांचा पाठिंबा असला, तरी जे रालोआत नाही, मात्र दक्षिण भारतात ज्यांचा चांगला राजकीय प्रभाव आहे, अशा वायएसआर काँग्रेस आणि भारत राष्ट्र समिती यांनीही राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे.

यावेळची उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक आणखी एका राज्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे, ते म्हणजे झारखंड. राष्ट्रपती होण्यापूर्वी द्रौपदी मुर्मू झारखंडच्या राज्यपाल होत्या, तर आता उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन्ही महाराष्ट्राचे राज्यपाल होण्याआधी झारखंडचे राज्यपाल होते. त्यामुळे झारखंडच्या राज्यपालपदाला येत्या काळात महत्त्व आले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मूळ तामिळनाडूचे असलेले राधाकृष्णन् यांची ओळख २०१३ मध्ये एका तामिळ चॅनेलवरील चर्चेत 'तामिळनाडूचे मोदी' अशी करून देण्यात आली होती. मोदी यांच्याप्रमाणेच तामिळनाडूत स्वच्छ प्रतिमेचा राजकारणी अशी त्यांची प्रतिमा आहे. १९९८ आणि १९९९ मध्ये ते तामिळनाडूच्या कोईम्बतूर मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले होते. २००४, २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला, तर २००९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी लढवलीच नव्हती. २००४ ते २००७ या काळात तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी प्रभावीपणे काम केले. २०२३ मध्ये त्यांना झारखंडचे राज्यपाल करण्यात आले. वर्षभरातच त्यांना महाराष्ट्रात पाठविण्यात आले. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतील संख्याबळाचा विचार करता राधाकृष्णन् यांचा विजय हा निश्चित आहे; फक्त ते किती मतांनी विजयी होतात, एवढाच प्रश्न आहे.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत आतापर्यंत चार वेळाच निवडणूक अविरोध झाली. १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् अविरोध विजयी झाले. १९५७ मध्ये त्यांची पुन्हा या पदावर अविरोध फेरनिवड झाली. १९७९ मध्ये न्या. मोहम्मद हिदायतुल्ला यांची तर १९८७ मध्ये डॉ. शंकरदयाल शर्मा यांची उपराष्ट्रपतिपदी अविरोध निवड झाली. १९८७ नंतर २०२५ पर्यंत एकाही उपराष्ट्रपतीची अविरोध निवडणूक होऊ शकली नाही. यावेळी सी. पी. राधाकृष्णन् यांची निवडणूक अविरोध व्हावी, असा प्रयत्न भाजपाने केला, पण त्याला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी प्रतिसाद दिला नाही. उलट इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयातील माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर करीत निवडणुकीसाठी दंड थोपटले आहे.

उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन् हे देशातील दुसरे राज्यपाल ठरणार आहेत. याआधी ज्येष्ठ भाजपा नेते आणि राजस्थानचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत आणि जगदीप धनकड उपराष्ट्रपती झाले होते. उपराष्ट्रपती होण्याआधी शेखावत राजस्थानचेच राज्यपाल होते, तर जगदीप धनकड पश्चिम बंगालचे. धनकड यांच्या राजीनाम्यामुळेच यावेळी उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होत आहे.

इंडिया आघाडीनेही सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर करीत भाजपाला शह देण्याचा प्रयत्न केला आहे. भाजपाने दक्षिण भारतीय उमेदवार दिल्यानंतर इंडिया आघाडीनेही दक्षिण भारतीय उमेदवार देत या निवडणुकीतील चुरस वाढविली आहे. रालोआच्या राजकीय उमेदवाराच्या तुलनेत इंडिया आघाडीने गैरराजकीय आणि संविधान तज्ज्ञ असा उमेदवार दिला आहे. सुदर्शन रेड्डी यांच्या उमेदवारीमुळे तामिळ आणि दक्षिण भारतीय अस्मिता या निवडणुकीत पणाला लागणार आहे. तेलगू देसम हा रालोआचा घटक पक्ष असल्यामुळे राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याच्या त्याच्या निर्णयात बदल होण्याची कोणतीच शक्यता नसली, तरी वायएसआर काँग्रेस आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांमध्ये द्विधा परिस्थिती निर्माण होऊ शकते. खरं म्हणजे या दोन्ही पक्षांनी राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन् हे या नावाचे दुसरे नेते ठरणार आहेत. याआधी १९५२ मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् उपराष्ट्रपतिपदी अविरोध विजयी झाले होते. १९५७ मध्ये त्यांची या पदावर फेरनिवड झाली होती. त्यानंतर जवळपास ६८ वर्षांनी सी. पी. राधाकृष्णन् उपराष्ट्रपती होत आहेत. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचे यावेळचे आणखी एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यावेळी रिंगणात असलेले दोन्ही उमेदवार भगवान श्रीकृष्णाशी संबंधित आहेत. रालोआच्या उमेदवाराचे नावच राधाकृष्णन् आहे, तर इंडिया आघाडीच्या उमेदवाराच्या नावात सुदर्शन आहे. गंमत म्हणजे भाजपाने गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशीच राधाकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीने यावेळी उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने सुदर्शन आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण सुदर्शन चक्र हे भगवान श्रीकृष्णाच्या हातातच शोभत असते, श्रीकृष्णापासून सुदर्शन चक्र वेगळे करता येत नाही. श्रीकृष्णाच्या हातात आहे, तोपर्यंतच सुदर्शन चक्रात दैवी ताकद असते. दुसऱ्याच्या हातात गेल्यानंतर ते फक्त चक्रच उरते आणि ज्याच्या हातात आहे, त्याला फक्त चकराच येत असतात. त्यामुळे यावेळी होणारी उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक अतिशय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या निवडणुकीच्या निकालाचा भारताच्याच नाही तर 'महाभारता'च्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहे.

९८८१७१७८१७

### कमकुवत मनाने कुटुंबातील प्रेम कमी होत आहे

आजच्या काळात सर्वांत मोठं दुःख म्हणजे कुटुंबातील कमकुवत मनाचे नाती तुटताना दिसत आहेत. रक्ताचे नाते असूनही लोकांमध्ये दुरावा वाढतो आहे. यामागे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे कमकुवत मन. एकेकाळी घर कुटुंब म्हणजे प्रेम, आपुलकी, सहनशीलता आणि एकमेकांसाठी त्याग करण्याची शिदोरी असायची. मतभेद झाले तरी कुटुंबातील लोक तोल सांभाळायचे. पण आता मात्र मनाची ताकद कमी झालेली दिसते. छोटीशी टीका, थोडासा अपमान, थोडं मतभेद यामुळे लोक लगेच दुखावतात. मन मजबूत नसल्याने ते सहन होत नाही आणि अखेर ते नाते तुटण्यामध्ये बदलते. आजचा माणूस जास्त स्वकेंद्रित झाला आहे. माझं म्हणणं खरं, माझ्या मनासारखं झालं पाहिजे या हट्टामुळे नाती ताणली जातात. सहनशीलता आणि समजूतदारपणा कमी झाल्याने नात्यांचा पूल तुटतो. कमकुवत मनाचे परिणाम थोड्याशा गैरसमजातून वाद निर्माण होतात. राग, द्वेष, मत्सर या भावना निर्माण होऊ लागल्या आहेत. संवादाऐवजी शांतता आणि टाळाटाळ वाढते. त्यामुळे एकत्रित असणारे अखेरीस विभक्त होण्याची वेळ येते आहे. कुटुंब प्रेम एक झाड आहे, आणि प्रत्येक नातं त्याची फांदी आहे. जर मन कमकुवत झालं, तर फांद्या तुटत जातील. पण मन मजबूत ठेवलं, तर कुटुंबातील प्रेमाची सावली कायम राहील.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### शालार्थ घोटाळा : दोषारोपांची संगीत खुर्ची

मराठी आणि ग्रामीण शाळांनी दशकानुदशके लाखो विद्यार्थ्यांना परवडणारे शिक्षण दिले, पण आज त्याच शाळा शालार्थच्या घोटाळ्यात गोवल्या गेल्या आहेत. सुरुवातीला शिक्षण विभागावर संशय, मग सचिव, शाळा समित्या, मुख्याध्यापक, शिक्षक अशी ही दोषारोपांची संगीत खुर्ची! तपासाचा व्हायचा तो उद्देशच बदलून सर्वांनी आपली खुर्ची वाचवण्याचा खेळ सुरू आहे. शिक्षकांचे पगार थांबवले, अटकेसाठी मुख्याध्यापकांना पकडले, पण खरा गाभा जे अधिकारी आयडी बनवतात, मंजुरी देतात आणि गैरव्यवहारास मोकळीक देतात त्यांच्यापर्यंत कोणीच पोहोचत नाही. आज नागपूर विभागातच २० अटक झाल्या, पण इतर जिल्हे अजून रडारवर नाहीत. ग्रामीण शिक्षण घडवणाऱ्या संस्थांवर संपत्ती जप्तीची धमकी, तर वास्तविक जबाबदारी असलेले प्रशासक मात्र सुरक्षित! हे दुष्टचक्र थांबवण्यासाठी शिक्षक, पालक व शाळा व्यवस्थापनांनी एकत्र येऊन 'खरे दोषी कोण?' असा सवाल करणे गरजेचे आहे. नाहीतर शिक्षणाची मुळे खोदणारे सुटत राहतील आणि मुलांपर्यंत ज्ञान नेणाऱ्या या शाळांवर कलंक लागवत राहील.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

## वाचक पत्रे

### राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षणाचा विस्तार होणे आवश्यक

आपल्या भारतीय समाजात समानता आणण्यासाठी शिक्षणाचे सरकारीकरण, विनामूल्य व सक्तीचे शिक्षण आणि समान शाळा पद्धती ही तीन तत्त्वे किती महत्त्वाची आहेत, हे म. जोतिराव फुले यांनी अधोरेखित केले. म्हणून त्यांनी सर्वांसाठी शिक्षण आणि समतावादी समाज निर्मितीचा पुरस्कार केला. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील सामाजिक भान जोतिराव फुलेंच्या विचारात प्रकर्षाने दिसून येते. वर्ण आणि जातिव्यवस्थेने समाजाची विभागणी शोषक आणि शोषित अशा दोन भागांत केली. शोषक जाती व शोषित जातींमध्येही उपविभागणी असल्याने, शोषित जात किंवा वर्ग म्हणून एकजुटीने उभे राहिले नाहीत. स्पृश्य जातींमध्ये अनेक जाती आहेत. त्यांचे व्यवसाय, रीतिरिवाज आणि परंपरा एक नाहीत. तसेच अस्पृश्य जातींमध्येही अनेक जाती असून त्यांच्यात उच्च-नीचतेची धारणा काम करते. शोषणातून मुक्तीसाठी सर्व शोषित जातींना एकत्वाने भान देणे आवश्यक होते. हे एकत्वाचे भान शिक्षणातून देता येऊ शकते यावर महात्मा फुलेंचा अगाध विश्वास होता.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात मुख्यतः तीन तत्त्वे दडलेली आहेत. पहिले तत्त्व म्हणजे शिक्षण सरकारी असले पाहिजे. सरकारी शिक्षणातूनच सार्वत्रिकीकरण साध्य करता येऊ शकते. सरकारी शिक्षणाचा यांत्रिक रथ महात्मा फुलेंना अभिप्रेत नव्हता. सरकार स्वत:च विषमतावादी आहे व विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासते, हे त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षण विस्तार संकुचित करण्याची व शाळाबंदीची भूमिका घेतली आहे. ग्रामीण भागातील, शहरी झोपडपट्टीतील व निम्न मध्यमवर्गीय यांची प्राथमिक शिक्षणातून हकालपट्टी होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा प्रश्न तीव्र व बहुपदरी झाला आहे. सार्वत्रिकीकरण साध्य करण्यासाठी समान शाळा पद्धतीचा पुरस्कार व महात्मा फुलेंच्या विचारांची नितांत गरज आहे. सर्वांना शिक्षण मिळावे इथेच ते थांबत नाहीत, तर शिक्षण कशासाठी व कोणते हा मार्मिक प्रश्न ते उपस्थित करतात.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### पापय्या तालीम संघात स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

जुनी मिल कपौंड येथील पापय्या तालीमच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सुतार यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, उपाध्यक्ष प्रदीप शिर्के, सेक्रेटरी शिवाजी चटके, सहसेक्रेटरी विजय पाटील, खजिनदार प्रकाश सुरवसे, वसंत कुलकर्णी, जयंत मोरे, गजाननम लामकाने, अजित शिंदे, प्रकाश पवार, राहुल चटके, जुनी पोलीस लाईन गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन अनिकेत व्यवहारे, सचिव वसंत येळे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सचिन हक्के, प्रदीप जाधव, संभाजी मळगे, वसंत ढेरे, तानाजी सावंत, अमोल जाधव, अनिल इंगळे, अतुल कोथिंबीरे, संजय हिरळीकर, रणजीत खताळ, श्रीनिवास कोटा, तानाजी बोधले, बबन झिंगाडे, बाळासाहेब ढेकळे, प्रेम इंगळे, आदित्य इंगळे, प्रभाकर व्यवहारे, स्वप्नील अनगरकर, हर्षल अनगरकर, बबत पतंगे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते तलवारबाजी नॅशनल ब्रांझ पदक विजेया श्रेयश वाघमोर यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन वस्ताद वसंत कुलकर्णी यांनी केले तर आभार जयंत मोरे यांनी मानले.



### श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जयंत फडके गुरुजींचा सत्कार

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

सोलापूर येथील वेदमूर्ती व ज्येष्ठ पुरोहित जयंत फडके गुरुजी हे सोलापूर सोडून पुणे येथे स्थायिक होण्यासाठी जात असल्याने श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघातर्फे त्यांचा सत्कार करुन निरोप समारंभ करण्यात आला. अध्यक्ष वल्लभ करकमकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी जयंत फडके गुरुजी यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी या विषयी प्रवचन केले. रामकृष्ण अघोर यांनी सोलापुरातील त्यांच्या ५५ वर्षांच्या वास्तव्याचा आढावा घेतला. आभार अनिल अघोर यांनी मानले. यावेळी वल्लभ करकमकर व सौ. करकमकर यांच्या हस्ते भेटवस्तू देवून सत्कार केला. यावेळी पोलीस खात्यातील निवृत्त अधिकारी दुरुगकर व कुलकर्णी उपस्थित होते.




### शरद बँकेतर्फे सभासदांना ११ टक्के लाभांश जाहीर

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

बँकेच्या पारदर्शक आणि सुलभ सेवेमुळे बँकेचे नावलैकिक झाले असून बँकेला २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये ८३ लाख २८ हजार इतका झालेला असून बँकेच्या ठेवी १०२ कोटी ४२ लाख इतके असून आर्थिक वर्षामध्ये २३ कोटी ४२ लाख रुपये ने वाढ झाली आहे. बँकेने आण्णासाहेव पाटील आर्थिक विकास महामंडळ व्याज परतावा या योजनेअंतर्गत २० कोटींची कर्जे दिली असून शरद बँकेतर्फे सभासदांना ११ टक्के लाभांश जाहीर झाल्याचे बँकेचे चेअरमन प्रा. महेश माने यांनी सांगितले. शरद नागरी सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमन प्रा. महेश माने यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी प्रशालेत संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. सभेमध्ये सभासद यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे बँकेचे चेअरमन प्रा. माने व बँकेचे तज्ञ संचालक माणिकप्रभू मुळे यांनी समाधानकारक उत्तरे दिली. तसेच बँकेचे संस्थापक मनोहर सपाटे यांनी आर्थिक वर्षामध्ये बँकेने १०० कोटीच्या ठेवीचे उद्दीष्ट पूर्ण केल्याने बँकेचे चेअरमन, सर्व संचालक मंडळ व सेवक वर्गाचे अभिनंदन केले. यावेळी तज्ञ संचालक श्रेणीक शहा, संचालक ज्ञानेश्वर सपाटे, निलेश उंब्रजकर, एकनाथ घाडगे, प्रदीप निर्मळ, अनिल लोंढे, युन्नूस मुजावर, तसेच बँकेचे सभासद अंबादास चन्ना, गितेश चुळभरे, शामराव कुलकर्णी, दत्ता भोसले, मुकुंद जाधव, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र आवताडे, शाखा व्यवथापक दत्तात्रय चटके, केशव क्षीरसागर, स्वाती सपाटे, संदीप टोणपे उपस्थित होते. सूत्रसंचालन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र आवताडे यांनी केले व बँकेचे व्हाईस चेअरमन समहानंदा सोलापूरे यांनी आभार मानले.

### शिवराम प्रतिष्ठानच्या गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी समर्थ शिंदे

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**



येथील भगवान नगर भागातील शिवराम प्रतिष्ठानच्या गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी समर्थ शिंदे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी ओंकार वाघमोडे, सचिव प्रकाश बुगले, सहसच्चिव वैभव चव्हाण, सुरज कसबे, पूजा प्रमुखपदी समर्थ बहिरवाडे, सोहम चव्हाण, खजिनदार साईजराज भिसे, सहखजिनदार सचिन बहिरवाडे, प्रसिद्धी प्रमुख अनिकेत भिसे, सहप्रसिद्धी प्रमुख अजय मोरे, स्टेज प्रमुख दिपक बोड्डू यांची निवड करण्यात आली.



# ‘गवसु’मधील आकारणीसाठी कर्मचाऱ्यांना सहकार्य करा

## आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आवाहन

## नागरिकांनी विरोध केल्यास पाडकामाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

शहरातील गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत येणाऱ्या झोपडपट्ट्या, वस्त्यांमध्ये महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडून आकारणी सर्वेक्षण कर्मचाऱ्याकडून करण्यात येत आहे. येथील पक्क्या आरसीसी बांधकामाची माहिती कर्मचाऱ्यांना देणे बंधनकारक आहे. येथील नागरिकांनी कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. नागरिकांनी त्यास विरोध केल्यास संबंधितांचे बांधकाम अनधिकृत असल्याचे गृहीत धरून पाडकाम करण्यात येईल, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

सोलापूर शहरातील गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत येणाऱ्या झोपडपट्ट्या, वस्त्यांमध्ये मोठ्या इमारती उभारण्यात आल्या आहेत. या भागात कच्चे आणि मोठ्या इमारती यांना समान कर आणि इतर सुविधाची आकारणी होत आहे. वास्तविक पाहता मोठ्या आरसीसी इमारतींसाठी नियमानुसार आकारणी होणे आवश्यक आहे. या संदर्भात महापालिकेच्या उपसमितीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. पक्के आरसीसी बांधकाम याची आकारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गवसु मधील आकारणीसाठी महापालिकेचे कर्मचारी गेल्यास त्यांना विरोध होत असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित नागरिकांनी या कर्मचाऱ्यास आवश्यक ती माहिती देणे बंधनकारक आहे. माहिती न दिल्यास त्यांचे बांधकाम अनधिकृत असल्याचे गृहीत धरून नियमानुसार पाडकामाची कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे संबंधित नागरिकांनी कर्मचाऱ्यांना आकारणीसाठी माहिती द्यावी, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

### डिपॉझिट शिवाय देणार वैयक्तिक नळ कनेक्शन

प्रशासनाकडून सार्वजनिक नळ बंद करण्यात येत आहेत. शासनाच्या हर घर जल योजनेअंतर्गत प्रत्येकांना व्यक्तिगत नळ कनेक्शन देण्यात येत आहे. यामुळे प्रत्येक घरात पाणीपट्टी लावण्यात येत आहे. सामान्य नागरिकांना डिपॉझिटची अडचण असेल तर डिपॉझिट न भरता संबंधितांनी नळ जोडण्यासाठी आवश्यक साहित्य आणून नळ जोडणी करून घ्यावी. डिपॉझिट टप्प्याटप्प्याने आवश्यकतेनुसार जमा करून घेण्यात येणार आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

## ओबीसी आरक्षण कोट्यातून

# भटक्या विमुक्तांना १३.५ टक्के आरक्षणाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ओबीसींच्या २७ टक्के आरक्षण कोट्यातून भटक्या विमुक्तांना १३.५ टक्के आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीकडे करण्यात आली आहे, अशी माहिती लक्ष्मण भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आगामी निवडणुकांसाठी ओबीसीला २७ टक्के आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने निकालाद्वारे दिले आहे. भटक्या विमुक्तांना पुरेशी संधी मिळालेली नाही. राजकीय पक्ष उमेदवारीसाठी भटक्या विमुक्तांना विचारात घेत नाहीत. महाराष्ट्रात भटक्या विमुक्त जमाती या सर्वात जास्त मागास, अविकसित, अप्रगत आहेत. राजकीय संधी पासून वंचित आहेत. त्यामुळे ओबीसीच्या आरक्षण कोट्यातून भटक्या विमुक्तांना १३.५ टक्के आरक्षण मिळावे. तसे न झाल्यास राज्यातील भटके विमुक्त समाज रस्त्यावर उतरतील असा इशारा लक्ष्मण भोसले यांनी दिला. दरम्यान, दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता सोलापुरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून रॅली काढण्यात येणार आहे. विविध पाच मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेत युवराज जाधव, भीमराव बंडगर, संजय गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, यशवंत फडतरे मल्लेश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# मिळकत करावरील १०० टक्के व्याज, शास्ती माफीची अभय योजना जाहीर

## मिळकतदारांनी मूळ रक्कम 30 सप्टेंबर पर्यंत भरावी

## अन्यथा मिळकत जप्ती, लिलावाची कारवाई : आयुक्त डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

महापालिका मिळकत करावरील व्याज आणि शास्ती १०० टक्के माफीची अभय योजना सुरू करण्यात येत आहे. संबंधित थकबाकीदारांनी मिळकत कराची मूळ रक्कम ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत भरावी अन्यथा मिळकत जप्ती , सातबारावर बोजा चढविणे आणि लिलावाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.

महापालिकेत दि. १६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या संदर्भात आदेश दिले होते. त्यानुसार ही अभय योजना राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेतील मिळकत करापोटी चालू मागणी १७६ कोटीची आहे. सर्व मिळून ६०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ९० कोटी रुपये नळाची आहे. तर सुमारे २५० कोटी रुपये शास्ती आणि व्याजाची रक्कम आहे. वसुली करावयाची निव्वळ थकबाकी पाहता ३०० कोटी रुपये आहे. यापूर्वी मिळकत कर विभागाने थकबाकीदारांच्या मिळकतींवर बोजा चढविण्याची कारवाई हाती घेतली. संबंधित थकबाकीदारांना मिळकत कर भरण्यासाठी आवश्यक ती संधीही देण्यात आली. उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियोजनाखाली ही योजना राबविण्यात येत आहे. अभय योजना येत्या ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे. त्या दरम्यान संबंधितांनी मूळ रक्कम भराऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो.

अभय योजनेनंतरही मिळकत कराची थकबाकी न भरल्यास मिळकत जप्ती, लिलाव आणि सातबारावर बोजा चढविण्याची कारवाई हाती घेण्यात येणार आहे. आपली थकबाकी भरून या अभय योजनेचा लाभ घ्यावा आणि कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

# गतवर्षीपेक्षा सिंहगड अभियांत्रिकीला वाढता प्रतिसाद

## सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक पसंतीसाठी एन.बी. नवले सिंहगड महाविद्यालय आघाडीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यात यंदा अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचा कल वाढताना दिसत आहे. गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी प्रवेशप्रक्रियेत विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला असून पहिल्याच फेरीत मोठ्या प्रमाणावर जागा भरल्या गेल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या पसंतीनुसार पहिल्या फेरीतील जागावाटपात केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय आघाडीवर राहिले आहे. पुण्यातील नामांकित महाविद्यालयांना पर्याय म्हणून सोलापूरकर विद्यार्थ्यांनी सिंहगडच्या महाविद्यालयाची पहिली पसंती दिली आहे.

कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या शाखांना अपेक्षेप्रमाणे अधिक प्रतिसाद मिळाला आहे. तरीदेखील इलेक्ट्रिकल, सिव्हिल व मेकॅनिकल या मूलभूत शाखांना देखील चांगली मागणी राहिल्याने उद्योग-व्यवसायाशी निगडित शाखांविषयी विद्यार्थ्यांचा विश्वास कायम असल्याचे जाणवते.





> सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयावर दाखवलेला विश्वास आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. गेल्या काही वर्षांत आम्ही शिक्षणासोबत संशोधन, नवोन्मेष आणि उद्योगाभिमुख उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले आहे.
>
> **- संजय नवले (कॅम्पस डायरेक्टर)**

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने अल्पावधीत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. मागील दोन वर्षांपासून राष्ट्रीय पातळीवर स्मार्ट इंडिया हॅकथॉनसह विविध स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवणे, विद्यार्थ्यांसाठी टीजी स्कीम, प्रथम वर्षापासूनच प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, तसेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार मेजर व मायनर डिग्री मिळवण्याची संधी ही वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करणारी ठरली आहेत. याशिवाय, महाविद्यालयाला मिळालेले उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार व उत्कृष्ट संस्था पुरस्कार यामुळे त्याची विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे.

जुन्या परंपरेचा वारसा, दर्जेदार प्राध्यापक वर्ग, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम व कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये मिळणारी नोकरीची संधी यामुळे अभियांत्रिकी शिक्षण हे अजूनही अनेक विद्यार्थ्यांचे आकर्षण आहे.

> आमचे ध्येय केवळ पदवीधर निर्माण करणे नाही, तर कौशल्यसंपन्न अभियंते घडवणे आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना मेजर व मायनर डिग्री घेण्याची संधी उपलब्ध करून देत आहोत. आगामी काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांनी यश मिळवावे, यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे.
>
> **- डॉ. शंकर नवले (प्राचार्य)**

एकूणच, पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओढा ओसरला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम पायाभूत सुविधा व नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे यंदाच्या प्रवेशप्रक्रियेत सोलापूर जिल्हा हा विद्यार्थ्यांसाठी एक मजबूत शैक्षणिक पर्याय म्हणून पुढे आला आहे. याचाच एक भाग सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे.



# हिंगलाजमाता पतसंस्थेस ७६ लाखांचा नफा

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

पूर्व भागातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या हिंगलाजमाता नागरी सहकारी पतसंस्थेस २०२४-२५ मध्ये ७६ लाख १३ हजार ६१७ रुपयांचा निव्वळ नफा झाला असून सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पुकाळे यांनी जाहीर केला. साखर पेठे येथील हिंगलाजमाता नागरी पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष पुकाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभासदांचे स्वागत उपाध्यक्ष प्रकाश कटारे यांनी केले. अहवाल वाचन व्यवस्थापक राजेश क्षीरसागर यांनी केले. प्रारंभी हिंगुलांबिका देवीच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्रकाश कटारे यांनी केले. यावेळी श्रीकांत अबुरे, सुनील अण्णे, जगदीप दंतकाळे, विलास पतंगे, विजय पेंडकर, सुधीर ढगे, डॉ. संध्या नाईकनवरे, शोभा आकुडे, शिल्पा क्षीरसागर, हिशोबनिस शंकर कटारे उपस्थित होते.

# जनमंगल पतसंस्थेचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेचा दुसरा वर्धापन दिनानिमित्त साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वोद्योग प्रादेशिक उपआयुक्त उज्वला पळसकर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, पत्रकार नंदकुमार येच्चे, जनमंगल फौंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात, चेअरमन सविता





थोरात, व्हाईस चेअरमन नयना पलंगे, सचिव प्रिती कांबळे, सहसचिव मनिषा मोरे आदी उपस्थित होते.

# ओम गर्जना गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी सोमनाथ निंबाळे

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**



ओम गर्जना युवाशक्ती सामाजिक व सांस्कृतिक गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी सोमनाथ निंबाळे यांची निवड करण्यात आली. सचिव समीर कमळे, कार्याध्यक्ष शुभम गुरव यांची ट्रस्टीचे अध्यक्ष शाम धरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव अंबादास पांढरे, कोषाध्यक्ष संगमेश्वर सातलगांव, वसंतप्पा धोत्रे, राजाभाऊ भरमगुंडे, अर्चना जमादार, विकास तंबाके, शावरप्पा वाघमारे, शशिकांत जमादार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

## विडी घरकुल गणेशोत्सव मंडळ अध्यक्षपदी अविनाश दासरी

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

विडी घरकुल मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाच्या प्रेसिडेंटपदी नरेश श्रीराम, अध्यक्षपदी अविनाश दासरी, उपाध्यक्षपदी महेश बुगडे, सेक्रेटरीपदी अविनाश शंकु, मिरवणूक प्रमुखपदी अजय कोंगारी यांची निवड करण्यात आली. सोमा सभागृहात झालेल्या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

Classifieds

**पाहिजेत**

**शेती कामगार बिऱ्हाड पाहिजे. अकलूज येथे नर्सरीत काम करणारे जोडपे पाहिजेत. ९८९०१४३४३२ (गिरमे)**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project (www.smart-mh.org)**
**E-TENDER NOTICE NO: 2025_DOAWB_1211782**
**(Supply, Installation, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic rice Mill Machinery)**
The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Shivani Farmer Producer Company Ltd. Rengepar, Tal. - Lakhani, Dist. -Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The last date for submission of online bid is **22/9/2025 up to 01.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned website only.
**District Implementation Unit, SMART Project, Dist. Bhandara**

**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on **16/09/2025 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sr. no | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Assessment of Novel Fertilizer Formulation on Nutrient Dynamics, Productivity, and Carbon Sequestration Potential in Pomegranate | Young Professional - 1 | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website : **nrcpomegranate.icar.gov.in**

Sd/-
**DIRECTOR**

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः देवळाली ता. भुम, जि. धाराशिव येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव, सब डी. व ता. भुम पैकी मौजे देवळाली येथील ग्रामपंचायत हद्दीतील जागा याचा ग्रामपंचायत अनु. क्र. ५१० याचा मिळकत नं. ५०२ याचे क्षेत्र १८४.८५ चौ. मी याचे चौ. फुट १९८९.00 असे आहे, यासी चतुःसीमा :- पूर्वेस - दयानंद रामलिंग विभूते यांचो जागा, दक्षिणेस - मारुती पंडीत विधाते यांची जागा, पश्चिमेस - ग्रामंचायत रस्ता, उत्तरेस - अभिमान शेटे यांची जागा, येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक जागा, जाणे-येणेसाठी रस्ता व पाणी वागणूक जागेच्या पश्चिम बाजूच्या ग्रामंचायत रस्त्याने जाते व आहे. येणे प्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह ग्रामपंचायत मिळकत.

सदर ग्रामपंचायत मिळकत हि अनिल हरिश्चंद्र तांबे यांच्या वडीलोपार्जीत मालकीची कब्जे वाहिवाटीची मिळकत असून त्यांनी ती ग्रामपंचायत मिळकत श्री आकाश अनिल तांबे त्यांच्या नावे रजि. खरेदीखत नं. १३३९/२०२५/बमऊ, दि. १२/०६/२०२५ अन्वये हस्तांतरीत केली आहे. तशी उताऱ्यास त्यांच्या नावाची नोंद झाली आहे. सदरची ग्रामपंचायत मिळकत श्री आकाश अनिल तांबे हे बँकेकडे तारण ठेऊन कर्ज घेवू इच्छितात, तरी सदर घरजागा / मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही. असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची. क्लेअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील त्यानंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता सावधानतेची जाहीर नोटीस दिली. दि. २०/०८/२०२५.

**सही/-**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**पत्ता - ऑफिस ३९४५/१,**
**भवानी पेठ, सोलापूर रोड,**
**बार्शी. ता. बार्शी, जि. सोलापूर**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**
**श्री आकाश अनिल तांबे (अशिल)**

## महत्त्वाचे

### एकदिवसीय क्रमवारीत कुलदीप यादव तिसऱ्या स्थानी

**दुबई :** भारताचा फिरकी गोलंदाज कुलदीप यादव बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसी एकदिवसीय गोलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर घसरला तर दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराजने पुन्हा अव्वल स्थान गाठले. केर्न्स येथे झालेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियावर ९८ धावांनी विजय मिळवून केशव महाराज पुन्हा अव्वल स्थानी पोहोचला. सामनावीर म्हणून निवडण्यात आलेल्या ३५ वर्षीय डावखुरा फिरकी गोलंदाज महाराजने ३३ धावांत गडी बाद केले. त्याने कुलदीप आणि श्रीलंकेच्या महेश थिकेशनाला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले. केशव महाराज यापूर्वी नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२३ मध्ये काही काळ अव्वल स्थानी होता. कुलदीप व्यतिरिक्त, गोलंदाजांच्या यादीत टॉप १० मध्ये स्थान मिळवणारा रवींद्र जडेजा हा एकमेव भारतीय गोलंदाज आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये जेतेपद जिंकल्यानंतर भारतीय संघाने एकही एकदिवसीय सामना खेळलेला नाही. वेस्ट इंडीजचा वेगवान गोलंदाज जेडेन सील्सनेही गोलंदाजी क्रमवारीत मोठी झेप घेतली. पाकिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात त्याने १८ धावा देत सहा बळी घेतले. तो १५ स्थानांनी झेप घेऊन १८ व्या स्थानावर पोहोचला. पाकिस्तानचा लेग-स्पिनर अबरार अहमद (१५ स्थानांनी झेप घेऊन ३९ व्या स्थानावर) आणि वेस्ट इंडीजचा ऑफ-स्पिनर रोस्टन चेस (पाच स्थानांनी झेप घेऊन ५८ व्या स्थानावर) हे देखील क्रमवारीत वरच्या स्थानावर आहेत. पुरुषांच्या फलंदाजी क्रमवारीत शुभमन गिल ७८४ गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

### चिन्नास्वामी स्टेडियमचे वैभव परत आणणार : व्यंकटेश प्रसाद

**बंगळूरू :** चिन्नास्वामी स्टेडियममध्ये क्रिकेटचे पुनरागमन हा एका भव्य समारंभाचा मुख्य विषय होता. या समारंभात भारताचे माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद यांनी बुधवारी त्यांच्या पॅनेलचा जाहीरनामा प्रसिद्ध करून आगामी कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) निवडणूक लढवण्याच्या दिशेने पहिले ठोस पाऊल उचलले. ४ जून रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूच्या ११ चाहत्यांचा बळी घेणाऱ्या चेंगराचेंगरीनंतर या प्रतिष्ठित स्टेडियममध्ये कोणताही सामना खेळला गेला नाही. आता, पुढील महिन्यात होणाऱ्या आयसीसी महिला विश्वचषक सामन्यांनाही धोका निर्माण झाला आहे. खरं सांगायचं तर चेंगराचेंगरीचा प्रकार घडायला नको होता. राज्य सरकारशी संपर्क साधण्यात आपल्याला खूप सक्रिय राहावे लागेल. चिनास्वामी स्टेडियममध्ये शक्य तितक्या लवकर सामने खेळवले जातील याची खात्री करावी लागेल, असे प्रसाद यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर पत्रकार परिषदेत सांगितले. प्रसाद यांनी संकेत दिले की त्यांच्या उमेदवारांच्या पॅनेलमध्ये १६ सदस्य असतील. तथापि, त्यांनी या टप्प्यावर त्यांची नावे उघड करण्यास टाळले. रघुराम भट यांच्या नेतृत्वाखालील सध्याचे पदाधिकारी ३० सप्टेंबर रोजी त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणार आहे.

# आशिया चषकासाठी भारतीय हॉकी संघ घोषित

### लाक्रा आणि दिलप्रीतला स्थान



**नवी दिल्ली, २० ऑगस्ट**

बिहारमधील राजगीर येथे होणाऱ्या आशिया चषकासाठी १८ सदस्यीय भारतीय हॉकी संघाची बुधवारी घोषणा करण्यात आली. यामध्ये फॉरवर्ड शिलानंद लाक्रा आणि दिलप्रीत सिंग यांनी आपले स्थान कायम ठेवले आहे.

ही स्पर्धा २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान खेळवली जाईल यातील विजेत्याला पुढील वर्षी १४ ते ३० ऑगस्ट दरम्यान नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये होणाऱ्या एफआयएच पुरुष विश्वचषकात थेट प्रवेश मिळेल.

ड्रॅग फ्लिकर हरमनप्रीत सिंग हा संघाचा कर्णधार आहे. राजिंदर सिंग, लाक्रा आणि दिलप्रीत ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर भारतीय संघाचा भाग होते. शमशेर सिंगच्या जागी राजिंदरची निवड झाली तर ललित उपाध्यायची जागा लाक्राने घेतली. यांनी अलिकडेच आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्ती घेतली आहे. गुरजंत सिंगपेक्षा दिलप्रीतला प्राधान्य देण्यात आले आहे.

जूनमध्ये एफआयएच प्रो लीगच्या युरोप टप्प्यानंतर स्ट्रायकर ललित उपाध्याय आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्त झाला.

आशिया चषकात भारताला जपान, चीन आणि कझाकस्तानसह पूल अ मध्ये स्थान देण्यात आले आहे. भारतीय संघ आपला पहिला सामना २९ ऑगस्ट रोजी चीनविरुद्ध खेळेल. त्यानंतर ३१ ऑगस्ट रोजी जपान आणि १ सप्टेंबर रोजी कझाकस्तानविरुद्ध खेळेल.

गोलरक्षकाची जबाबदारी कृष्ण बी. पाठक आणि सूरज करकेरा यांच्यावर असेल. बचावफळीत हरमनप्रीत आणि अमित रोहिदास यांच्यासोबत जर्मनप्रीत सिंग, सुमित, संजय आणि जुगराज सिंग आहेत.

मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद, राजिंदर, राज कुमार पाल आणि हार्दिक सिंग मिडफिल्डमध्ये असतील. फॉरवर्ड लाईनमध्ये मनदीप सिंग, अभिषेक, सुखजीत सिंग, लाक्रा आणि दिलप्रीत जबाबदारी सांभाळतील.

नीलम संजीव सेस आणि सेल्वम कार्ती यांना राखीव ठेवण्यात आले आहे. संघ निवडीबाबत मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले, आम्ही अनुभवी संघ निवडला आहे. विश्वचषक पात्रता लक्षात घेता आशिया चषक आमच्यासाठी महत्त्वाचा आहे, त्यामुळे आम्हाला असे खेळाडू हवे आहेत जे दबावाखाली चांगले खेळू शकतील.

**भारतीय संघ :** गोलरक्षक : सूरज करकेरा, कृष्ण बी. पाठक.

**बचावपटू :** हरमनप्रीत सिंग, अमित रोहिदास, जर्मनप्रीत सिंग, सुमित, संजय आणि जुगराज सिंग.

**मिडफिल्ड :** मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद, राजिंदर, राज कुमार पाल आणि हार्दिक सिंग.

**फॉरवर्ड :** मनदीप सिंग, अभिषेक, सुखजीत सिंग, शिलानंद लाक्रा आणि दिलप्रीत सिंग.

**राखीव खेळाडू :** नीलम संजीप सेस आणि सेल्वम कार्ती. (वृत्तसंस्था)



# सिंकफिल्ड चषकामध्ये गुकेशचा विजय

### अब्दुसत्तोरोव्हला हरवून जबरदस्त पुनरागमन

**सेंट लुई, २० ऑगस्ट**

विश्वविजेता डी गुकेशने सुरुवातीच्या फेरीतील अपयश मागे टाकत येथे सिंकफिल्ड कप बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत माजी जागतिक रॅपिड चॅम्पियन नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हवर शानदार विजय मिळवला.

पहिल्या फेरीत त्याचा सहकारी भारतीय खेळाडू गुकेशला हरवणारा आर प्रज्ञानंदने दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनासोबत गुण सामायिक केले. दुसऱ्या सामन्यात फ्रान्सच्या अलिरेझा फिरोजाने पोलंडच्या दुदा जान-क्रिझ्स्टोफला हरवले. अमेरिकेच्या लेव्हॉन आरोनियनने त्याच्याच देशाच्या सॅम्युअल सेव्हियनसोबत बरोबरी साधली आणि संयुक्त आघाडी कायम ठेवली. दुसऱ्या अमेरिकन वेस्ली सो याने १० खेळाडूंच्या ३,७५,००० बक्षीस रकमेच्या स्पर्धेत फ्रान्सच्या मॅक्सिम वाचियर-लाग्रेव्हसोबत बरोबरी साधली.

आता सात फेऱ्यांचा खेळ बाकी असताना, प्रज्ञानंद, आरोनियन आणि फिरोजा १.५ गुणांसह संयुक्त आघाडीवर आहेत.

गुकेश, कारुआना, वेस्ली सो, सेव्हियन आणि वाचियर-लॅग्रावे हे चौथ्या स्थानावर आहेत. दुडा अर्धा गुणांसह नवव्या स्थानावर आहे तर अब्दुसत्तोरोव्हने सलग दुसरा सामना गमावल्यानंतर अद्याप त्याचे खाते उघडलेले नाही. (वृत्तसंस्था)

# विश्वनाथन् आनंदचा सामना कास्पोरोव्हशी

### गुकेशचा सामना कार्लसनशी

### क्लच बुद्धिबळ प्रदर्शन सामना

**नवी दिल्ली, २० ऑगस्ट**

भारताचा बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद ऑक्टोबरमध्ये सेंट लुईस, अमेरिकेत होणाऱ्या क्लच बुद्धिबळ प्रदर्शन सामन्यात त्याचा दीर्घकाळचा प्रतिस्पर्धी रशियाच्या गॅरी कास्पोरोव्हविरुद्ध खेळेल, तर विश्वविजेता डी. गुकेशचा सामना मॅग्नस कार्लसनशी होईल.

कास्पोरोव्ह आणि आनंद यांचा शेवटचा सामना २०२१ मध्ये झाग्रेबमधील क्रोएशिया रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धेत झाला होता. त्यामध्ये आनंदने विजय मिळवला होता. दोघांमध्ये ८२ सामने झाले आहेत. त्यापैकी ३० सामने अनिर्णीत राहिले आणि विजयाच्या बाबतीत कास्पोरोव्हचे वर्चस्व राहिले.

दोन माजी विश्वविजेते गॅरी कास्पोरोव्ह आणि विश्वनाथन् आनंद हे एका विशेष क्लच बुद्धिबळ प्रदर्शन सामन्यात (७-११ ऑक्टोबर) आमनेसामने येतील, असे सेंट लुईस बुद्धिबळ क्लबने एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. हा प्रदर्शन सामना क्लबच्या नवीन सुविधेत होणारा पहिला सामना असेल, असे त्यात म्हटले आहे.

हे सामने रॅपिड आणि ब्लिट्झ टाइम कंट्रोल्समध्ये खेळवले जातील. क्लच बुद्धिबळ चॅम्पियन्स शोडाउन ४१२,००० अमेरिकन डॉलर्स बक्षीस पूलसह २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान आयोजित केला जाईल ज्यामध्ये जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचे कार्लसन, जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाचे हिकारू नाकामुरा, जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकाचे फॅबियानो कारुआना आणि गुकेश सहभागी होतील. (वृत्तसंस्था)



न्यू यॉर्क येथे मंगळवारी झालेल्या यूएस ओपन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये मिश्र दुहेरी सामन्यादरम्यान स्पेनचा कार्लोस अल्काराझ (उजवीकडे) आणि एम्मा रादुकानु प्रतिस्पर्ध्याचा फटका परतवताना.

### केआयडब्ल्यूएसएफमध्ये सहभागी होणार सर्वोत्तम खेळाडू

**श्रीनगर :** देशातील निवडक कॅनो, कायाक आणि सेलिंग खेळाडू गुरुवारपासून येथे सुरू होणाऱ्या पहिल्या खेलो इंडिया वॉटर स्पोर्ट्स फेस्टिव्हल (केआयडब्ल्यूएसएफ) मध्ये प्रतिष्ठित दाल सरोवरावर वर्चस्वासाठी स्पर्धा करतील. ही स्पर्धा तीन दिवस चालेल. या तीनही वॉटर स्पोर्ट्स प्रकारामध्ये ४०० हून अधिक खेळाडू २४ सुवर्णपदकांसाठी स्पर्धा करतील. उत्तराखंड, मध्य प्रदेश, ओडिशा आणि केरळ या स्पर्धेत वर्चस्व गाजवतील अशी अपेक्षा आहे. केआयडब्ल्यूएसएफकडे १० सेलिंग स्पर्धा देखील आहेत ज्या ऑलिंपिक कार्यक्रमाचा भाग आहेत.

### डब्ल्यूपीजीमध्ये मन्नत, हीना यांची संयुक्त आघाडी

**बंगळूरू :** बुधवारी येथे महिला प्रो गोल्फ टूरच्या ११ व्या लेगच्या पहिल्या फेरीत हौशी गोल्फर मन्नत ब्रार आणि व्यावसायिक गोल्फर हीना कांग यांनी संयुक्त आघाडी घेतली. दोघांनीही सम पार ७२ चा कार्ड बनवला. इतर तीन खेळाडू कृती चौहान, लावण्य गुप्ता आणि रिया जादोन त्यांच्यापेक्षा दोन शॉट्स मागे आहेत. हीनाने दोन डावानी सुरुवात केली पण तीन बर्डी बनवून पुनरागमन केले आणि ७२ गुण घेतले.चौथ्या होलमध्ये बर्डी बनवल्यानंतर मन्नतने ११ व्या आणि १२ व्या होलमध्ये दोन गुण केले. परंतु १५ व्या आणि १८ व्या होलमुळे तिने पुनरागमन केले. दुसरीकडे, १० व्या लेगचे विजेतेपद जिंकणारी रिधिमा दिलावारी संघर्ष करताना दिसली आणि तिने ८२ चा कार्ड बनवला तर दुसरी माजी विजेती सहर अटवालने ८६ चा कार्ड बनवला.

# सलाह ठरला वर्षातील सर्वोत्तम फुटबॉलपटू

### महिलांमध्ये मारिओना कॅल्डेंटीला पुरस्कार

**लंडन, २० ऑगस्ट**

मंगळवारी झालेल्या प्रोफेशनल फुटबॉलर्स असोसिएशन पुरस्कारांमध्ये गेल्या हंगामात लिव्हरपूल फॉरवर्ड मोहम्मद सलाहची इंग्लिश फुटबॉलमधील वर्षातील सर्वोत्तम पुरुष खेळाडू म्हणून निवड झाली, तर, आर्सेनलच्या मिडफिल्डर मारिओना कॅल्डेंटीने महिला गटात हा पुरस्कार जिंकला.

इंग्लंडमध्ये खेळणाऱ्या सहकारी व्यावसायिक खेळाडूंनी या पुरस्कारासाठी मतदान केले. सलाहने विक्रमी तिसऱ्यांदा हा पुरस्कार जिंकला आहे. या ३३ वर्षीय इजिप्शियन आंतरराष्ट्रीय खेळाडूने प्रीमियर लीगमध्ये २९ गोल केले, ज्यामुळे लिव्हरपूलने विक्रमी २० व्यांदा विजेतेपद जिंकले. सलाहने या वर्षाच्या सुरुवातीला तिसऱ्यांदा फुटबॉल रायटर्स असोसिएशनचा फुटबॉलर ऑफ द इयर पुरस्कारही जिंकला.

महिला गटात, २९ वर्षीय कॅल्डेंटीने आर्सेनलसोबतच्या तिच्या पहिल्या हंगामात उत्कृष्ट कामगिरी केली आणि सर्व स्पर्धांमध्ये १९ गोल केले. ॲस्टन व्हिलाचा मिडफिल्डर मॉर्गन रॉजर्सला वर्षातील सर्वोत्तम पुरुष युवा खेळाडू म्हणून निवडण्यात





आले, तर सर्वाधिक किमतीत आर्सेनलमध्ये सामील झालेल्या कॅनेडियन स्ट्रायकर ऑलिव्हिया स्मिथने महिला गटात हा पुरस्कार जिंकला.

किलियन एमबाप्पेने रियल माद्रिदसोबतच्या दुसऱ्या हंगामाची सुरुवात पेनल्टीवर गोल करून केली, ज्यामुळे त्याच्या संघाला मंगळवारी स्पॅनिश फुटबॉल लीग ला लीगाच्या पहिल्या सामन्यात ओसासुनाविरुद्ध १-० असा विजय मिळवता आला.

गेल्या हंगामात रियल माद्रिदमध्ये सामील झालेल्या एमबाप्पेने ५१ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करून घरच्या संघाला विजय मिळवून दिला. अशा प्रकारे एमबाप्पेने रियल माद्रिदसोबतची त्याची चांगली कामगिरी सुरू ठेवली. गेल्या हंगामात त्याने क्लबसाठी सर्वाधिक गोल केले.

या प्रकारे रियल माद्रिदने नवीन हंगामाची सुरुवात त्यांच्या कट्टर प्रतिस्पर्धी बार्सिलोनाप्रमाणे विजयाने केली. शनिवारी बार्सिलोनाने मॅलोर्कावर ३-० असा सहज विजय मिळवला. गेल्या हंगामात, रियल माद्रिद बार्सिलोनानंतर स्पॅनिश लीगमध्ये दुसऱ्या स्थानावर राहिला. ओसासुना नवव्या स्थानावर राहिली. (वृत्तसंस्था)

# बार्शीचा प्रणव करडे राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी पात्र

### राज्य स्पर्धेत कांस्य पदकाची कमाई



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

तालुक्यातील कांदलगाव येथील प्रणव समाधान करडे याने राज्य नेमबाजी स्पर्धेत कांस्य पदक संपादिले. यासह तो राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. मध्यप्रदेशातील आर्मी मार्कस्मॅनशिप युनिट, मह (इंदूर) येथे नुकत्याच २८ व्या नेमबाजी चॅम्पियनशिप स्पर्धा झाल्या. यात प्रणव करडे याने ही कामगिरी केली. प्रणवने १० मीटर एअर रायफल ज्युनिअर गटात सहभाग घेतला होता. प्रणव हा अर्श शूटिंग क्लबचा असून त्याला आंतरराष्ट्रीय नेमबाज व प्रशिक्षक इम्रान हसन खान यांचे मार्गदर्शन लाभले. या कामगिरीच्या जोरावर प्रणवने राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. प्रणवचे वडील समाधान हे भारतीय आर्मीमध्ये सुभेदार या पदावर अरुणाचल प्रदेश येथे कार्यरत आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना किसन जाधव यांनी दिली कबड्डी स्पर्धेची ट्रॉफी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश कार्यालय येथे भेट घेऊन ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेची ट्रॉफी भेट दिली. याप्रसंगी प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, माणिक कांबळे, आनंद गाडेकर, प्रथमेश पवार आदींची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नुकतेच



ईच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नगरसेवक नागेश गायकवाड आणि किसन जाधव मित्र परिवाराच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणी व अजिंक्यपद कबड्डी स्पर्धे चे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये ९०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाले.

### मंत्री भुजबळ यांचाही सन्मान

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळात वर्णी लागली. त्यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोपवली. छगन भुजबळ यांनी मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथमच किसन जाधव यांनी भुजबळ यांना मखमली टोपी, शाल, पुष्पगुच्छ, प्रतिमा देऊन त्यांचा गौरव करीत सन्मान केला.



# जिल्हा मैदानी स्पर्धेत स्वामी विवेकानंद प्रशालेस तीन पदके

### प्रवीण घोडकेची राज्य स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

एस.आर.पी.एफ. मैदान सोरेगाव येथे झालेल्या जिल्हा मैदानी स्पर्धेत एमआयडीसी येथील स्वामी विवेकानंद प्रशालेने तीन पदकांची कमाई केली. १४ वर्षाखालील गटात प्रवीण घोडके याने ट्रायथलॉन या प्रकारात रौप्य पदक पटकाविले. १६ वर्षाखालील गटात सुप्रिया कोळी हिने भालाफेक क्रीडा प्रकारात तर १८ वर्षाखालील गटात राहुल बोलाबत्तीन याने भालाफेक प्रकारात कांस्य पदक संपादिले. या कामगिरीवर प्रवीणची बालेवाडी पुणे येथे २ ते ५ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सुभाष माने, गणपती कोळी व खंडू शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंचे नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, उपाध्यक्ष अनुगीता पवार, सहसेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार, सहसेक्रेटरी सीमा श्रीगोंदेकर, कार्यकारणी सदस्य हार्दिक निमाणी, मुख्याध्यापक डॉ. हणमंत नारायणकर यांनी अभिनंदन केले.

# श्री स्वामीनारायण गुरुकुल कुंभारीस विजेतेपद



### दक्षिण तालुका कराटे स्पर्धा

### मंद्रूपचा फुले विद्यालय उपविजेता

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुका कराटे स्पर्धेत श्री स्वामीनारायण गुरुकुल कुंभारीने सर्वसाधारण विजेतेपद तर महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मंद्रूपने उपविजेतेपद पटकाविले.

पंचायत समिती दक्षिण सोलापूर आणि जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्यातर्फे झालेल्या या स्पर्धेत १४ व १७ वर्षे वयोगट स्पर्धेचे आयोजन श्री शावरसिद्ध हायस्कूल आचेगाव येथे केले होते.

यात दक्षिण तालुक्यातील ५ शाळा व ४४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. स्पर्धे चे उद्घाटन शावरसिद्ध हायस्कूलचे मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार व शंकरलिंग हायस्कूलचे प्राचार्य वीरेश थळंगे यांच्या हस्ते करण्यात आले. पारितोषिके रेवणसिद्ध सणके यांच्या हस्ते देण्यात आली. क्रीडा शिक्षक शावरसिद्ध आप्पाराव पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धेचे संयोजक मनोज बाळगे यांचे सहकार्य लाभले.



# मातोश्री ईश्वराम्मा विद्यालयाचा तन्मय कदम तालुका कुस्ती स्पर्धेत अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० ऑगस्ट-**

श्री रुक्मिणी विद्यापीठ पंढरपूर संचलित मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय व जुनिअर कॉलेज पंढरपूर या प्रशालेचा तन्मय सूर्यकांत कदम याने पंढरपूर तालुका फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविले. क्रीडा शिक्षिका सुप्रिया मोटे, कुमुदिनी सरदार यांचे तन्मयला विशेष लाभले. या यशाबद्दल संस्था सचिवा सुनेत्राताई पवार यांनी तन्मय कदम व क्रीडा शिक्षिकांचा सत्कार केला. यावेळी प्राचार्य नंदिनी गायकवाड, इरफान शेख आदी उपस्थित होते.

# तालुका कराटे स्पर्धेत वेळापूरच्या वैष्णवी आडतला सुवर्ण



**वेळापूर, दि. २० ऑगस्ट-**

गिरझणी येथे झालेल्या तालुका कराटे स्पर्धेत सेंट जॉन्स इंग्लिश मिडियम स्कूल वेळापूरच्या वैष्णवी संजय आडत हिने ३० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीवर तिची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली. तिला प्रशिक्षक गणेश शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले. तिचे संस्थापक सोमी जॉन, मुख्याध्यापिका शीजी जॉर्ज, माजी विद्यार्थी, डॉ.सागर पवार, डॉ. अमित गायकवाड. डॉ. स्वप्नील नागटिळक यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### सदलापूरच्या पवनकुमारचे नीट परिक्षेत यश

**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

तालुक्यातील सदलापूर येथील पवनकुमार कुंभार यांनी नीट परिक्षेत ऑल इंडीया रँकमध्ये ४०८४० क्रमांक व महाराष्ट्र राज्यात ३२५२ रँक व ५१० गुणांनी उत्तीर्ण होवून उज्वल यश संपादन केले आहे. पुढील वैद्यकीय शिक्षणाकरीता बुलडाणा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे. परिस्थीतीशी संघर्ष करून नीट परिक्षेत उज्वल यश संपादन करून जिल्ह्यात चमकल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतिक होत आहे. येथील मंदीर समितीच्यावतीने चेअरमन महेश इंगळे यांनी पवनकुमार याचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा, मिठाई देऊन यथोचित सत्कार केला. वडील किरणकुमार कुंभार यांनी आपल्या अल्पभुधारक शेती व्यवसायातून व आपल्या दुर्बल आर्थिक परिस्थीतीवर मात करून पवनकुमार याला साथ दिल्यानेच पवनकुमारला हे यश मिळवता आल्याचे श्री. इंगळे यांनी सांगितले. मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, विरुपाक्ष कुंभार, किरणकुमार कुंभार, चंद्रकांत कुंभार, आनंदप्पा कुंभार, प्रा.मनोज जगताप, सागर गोंडाळ, विपूल जाधव, गिरीश पवार, गणेश इंगळे, श्रीकांत मलवे, स्वामीनाथ मुमूडले, प्रसाद सोनार उपस्थित होते.



### धानय्या कौटगी यांना पीएच.डी. प्रदान

**अक्कलकोट दि. २० ऑगस्ट-**

येथील मंगरुळे प्रशालेत इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत असणारे धानय्या गुरूलिंगय्या कौटगी यांना नुकतीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाशजी महानवर यांच्या हस्ते इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.कौटगी यांना यासाठी दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयातील प्रा. डॉ. तानाजी कोळेकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. प्रकाश सुरवसे, डॉ. शिवाजी शिंदे यांची उपस्थिती होती. कौटगी यांनी बहुतांश राज्याची इंग्रजी विषयाची नेट, सेट, गेट आणि पेट ही परीक्षा तब्बल ७९ वेळा उत्तीर्ण होऊन एक महाविक्रम केला आहे. त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली आहे. कर्नाटक लिंगायत एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन डॉ. प्रभाकर कोरे, माजी आमदार महांतेश कवटगीमठ, के. एल. ई.चे सदस्य व शालेय समितीचे अध्यक्ष अनिल पट्टेद, सदस्य महादेव बळीगार, अण्णाप्पा काडादी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील, शालेय समिती सदस्य ॲड. अनिल मंगरुळे, मंगरुळे प्रशालेचे मुख्याध्यापक नंदाजी कदम, उपमुख्याध्यापक जी. बी. पट्टेद, पर्यवेक्षक आरती तोळनुरे यांनी कौटगी यांचे अभिनंदन केले.



### सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात एसक्यूएल प्रशिक्षण

**पंढरपूर, दि. २० ऑगस्ट-**

सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूरमध्ये अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी एसक्यूएल प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे संचालन रवी तेजा यांनी केले.या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना डेटाबेस व्यवस्थापन, एसक्यूएल क्वेरी लेखन, डेटा मॅनिप्युलेशन तसेच विविध एसक्यूएल तंत्रज्ञानांचा सखोल अभ्यास करून व्यावसायिक कौशल्ये वाढविण्यावर भर देण्यात आला. या कौशल्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील डेटाबेसशी संबंधित कामे अधिक आत्मविश्वासाने व कौशल्याने पार पाडता येतील. एसक्यूएल हे आजच्या डिजिटल युगातील अत्यंत आवश्यक कौशल्य असल्यामुळे या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमध्ये मोठा फायदा होणार आहे. याशिवाय, प्रोग्रामिंग व डेटा ॲनालिसिससारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधीही वाढण्यास मदत होईल. सिंहगड महाविद्यालयात आयोजित या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे व्यावसायिक व तांत्रिक कौशल्य वृद्धिंगत होण्यास महत्त्वाचा हातभार लागला आहे. सोलापूर जिल्हयामध्ये अभियांत्रिकीच्या विदयार्थ्यांसाठी कॉग्नीझंट ही कंपनी कॅम्पस प्लेसमेंटसाठी फक्त सिंहगड महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठीच ऑगस्ट महिन्यात उपलब्ध झालेली आहे. यासाठी एसक्यूएलचे प्रशिक्षण विदयार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटमध्ये निवड होण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी आशा महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी केली.

### 'कर्मयोगी'च्या धनश्री नाईकनवरेची नामांकित कंपनीत निवड; मिळाले ९ लाखांचे पॅकेज

**पंढरपूर, दि. २० ऑगस्ट-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील धनश्री नाईकनवरे या माजी विद्यार्थिनीची इटॉन इंडिया इनोव्हेशन सेंटर, पुणे या नामांकीत कंपनीमध्ये मुलाखतीमधून निवड होऊन ९ लाखांचे पॅकेज मिळाले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी दिली. श्री पांडुरंग प्रतिष्ठान चे विश्वस्त रोहन परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए बी कणसे, रजीस्ट्रार जी. डी. वाळके, उप प्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मोहसीन शेख, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, विभागप्रमुख डॉ. एस एम लंबे , डॉ. एस व्ही एकलारकर, प्रा. अनिल बाबर, प्रा. दीपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समन्वयक, विद्यासागर जगताप, प्रा. सुशील कुलकर्णी, प्रा.दत्तात्रय चौगुले, प्रा. योगेश माने व इतर सर्व प्राध्यापक यांनी धनश्री नाईकनवरे यांचे अभिनंदन केले.

# साताऱ्यातील १५० महिला अभ्यासासाठी भेंडमध्ये

## लोकसहभागातून भेंडकरांनी केलेल्या कामाचा करणार अभ्यास

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२० ऑगस्ट-**

अटल भूजल योजनेंतर्गत सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील किरकसाल येथील अकरा बचत गटातील १५० महिलांनी भेंड गावाला भेट दिली. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद सातारा यांच्या माध्यमातून आयोजित अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून भेंड गावाने २०१८ पासून लोकसहभागातून जलसंधारणाचे उत्तम काम केले.

तसेच वेळोवेळी शासनाच्या विविध योजना यशस्वी राबवल्या. मागील दोन वर्षापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करत असलेली ईक्रीसॅट संस्था जलसंधारण व पीक पद्धतीवर तांत्रिक अभ्यास करत आहे या सर्वांचा परिपाक म्हणून सातारा जिल्ह्यातील आदर्श किरकसाल गाव जे की राज्यस्तरावर भूजल समृद्ध ग्राम स्पर्धेत तिसरा तिसरा क्रमांक पटकावला. भेंड येथे अभ्यास दौरा आयोजित केला होता.यावेळी गावामध्ये झालेली जलसंधारणची विविध कामे, पीक पद्धतीचा अभ्यास, मिलेट वर झालेले काम व्हिडीओ चित्रफीतीच्या माध्यमातून दाखवण्यात आले.

याबरोबरच ईक्रीसॅट प्रकल्प कार्यालयाला भेट दिली. ज्यामध्ये संस्थेने केलेल्या कामाची सर्व महिलांनी पाहणी केली, यावेळी प्रस्ताविक सादर करत असताना गावचे मा.सरपंच डॉ. संतोष दळवी यांनी गावात झालेल्या कामाबद्दल माहिती दिली व लोक सहभागाची ताकद सांगितली. आलेल्या सर्व महिलांनी भेंड गावचे कौतुक केले, मनोज शहा यांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. किरकसाल गावचे माजी आदर्श सरपंच अमोल काटकर यांनी अभ्यास दौऱ्याचे नियोजन सांगितले. अटल भूजल योजना सातारा शकील मुजावर यांनी आभार मानले.





लोकसहभागातून, शासनाच्या व ईक्रीसॅट सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून जलसंधारणाची खूप कामे भेंड मध्ये झालेली आहेत. त्याचा परिपाक म्हणून आज भेंड ची ओळख एक जलसमृद्ध गाव म्हणून होत आहे, याचा आम्हा सर्व ग्राम स्थांना सार्थ अभिमान आहे भविष्यात सुद्धा लोकसहभागातु लोकोपयोगी कामे करण्याचा ग्रामस्थांचा मानस आहे.

**- डॉ. संतोष दळवी,**
सरपंच, भेंड

# शासनाच्या योजनेमध्ये काही प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट करा : सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० ऑगस्ट-**

महाराष्ट्रामध्ये शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये सिझेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय पिशवी काढणे, अपेंडिक्स, हर्निया या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट नाहीत. या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट कराव्यात अशी मागणी सांगोला नगर परिषदेचे माजी नगरसेवक सतीश सावंत यांनी राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, आयुष्यमान भारत मिशनचे राज्याचे प्रमुख ओम प्रकाश शेटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष मंगेश चिवटे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्रामध्ये शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये सिझेरियन, नॉर्मल डिलिव्हरी, गर्भाशय पिशवी काढणे, अपेंडिक्स, हर्निया या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट नाहीत. या प्रमुख शस्त्रक्रिया समाविष्ट कराव्यात. शासकीय हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टर व भूलतज्ञ नसल्यामुळे या शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्ण खाजगी रुग्णालयात जातात. या शस्त्रक्रिया करण्यासाठी खाजगी रुग्णालयात गोरगरिबांना हजारो रुपये द्यावे लागतात. ज्यांच्याकडे पैसे नाहीत, अशा गोरगरीब रुग्णांना प्राण गमवावे लागतात. शासकीय हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची कमतरता भूलतज्ञांची कमतरता तसेच इतर गोष्टींची कमतरता असल्यामुळे आशा रुग्णांना खूप मोठी अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे या शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले योजना अंतर्गत समाविष्ट करण्यात याव्यात. यामुळे गरजू व गरीब रुग्णांना फायदा होईल व आर्थिक भार कमी होईल व महाराष्ट्रातील रुग्णांना दिलासा मिळेल असे निवेदनात नमूद केले आहे.

### डॉल्बी सिस्टीम वापरावर बंदी घाला : डोंबाळी

**पंढरपूर, दि.२० ऑगस्ट-**

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने असंख्य भाविक देवदर्शनासाठी येत असतात. पंढरपूर शहरात हल्ली सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणूक तसेच लग्नसमारंभ प्रसंगी डॉल्बी सिस्टीमचा वापर वाढलेला आहे. त्यामुळे उच्च रक्तदाब, हृदयरूग्ण नागरिक व लहान मुलांनाही त्रास सहन करावा लागतोय. त्यामुळे पंढरपूरमध्ये डॉल्बी वापरावर तात्काळ कायमस्वरूपी बंदी आणावी अशी मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते यशवंत डोंबाळी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# सोमवार बाजारात मोबाईल गहाळचे प्रमाण वाढले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

अक्कलकोट शहरातील आठवडा बाजार सोमवारी एवन चौक येथील कांदा बाजार येथे अंत्यत महागडे मोबाईल हॅन्डसेट गहाळ होण्याचे प्रमाण वाढत आहे . त्यामुळे नागरिकांनी भाजी खरेदी करताना महागडे मोबाईल गहाळ होण्याच्या घटनेपासुन दक्षता घेणे गरजेचे बनले आहे.

मोबाईल ही आता जीवनाश्यक बाब बनली आहे. अंत्यत महागडे मोबाईल वापरताना नागरिकांनी दक्षता घेणे गरजेचे आहे. सोमवार आठवडा बाजार दिवशी शेखर बाबुराव गुंजले (वय-३२, रा. बेरड गल्ली अक्कलकोट) यांचा सॅमसंग कंपनीचा महागडा मोबाईल गहाळ झाल्याबाबत उत्तर पोलीसात नोंद केली आहे. विनोद माने यांचे नांवे असलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल सोमवारी सायंकाळी ५ वा.चे दरम्यान गहाळ झाला. घटनेचा अधिक तपास उत्तर पोलीस करीत आहेत. सोमवारी आठवडा बाजारात गर्दीचा फायदा घेऊन चोरटे हातोहात मोबाईल लांबवतात नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी महागडे मोबाईल वापरताना दक्षता घेणे गरजेचे आहे योग्य खबरदारी घेतल्या होणारा मनस्ताप टाळणे शक्य आहे.

# पिलीव येथे आज शिवनेरी दहीहंडी उत्सव

**१ लाख ११ हजाराचे पहिले बक्षिस; काजल गोसावी, अदिती देवर्षीसह अन्य नृत्यांगणांचाही सहभाग**

**पिलीव, दि. २० ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे गुरुवार दि २१ आगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता शिवनेरी दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, माढयाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार रामभाऊ सातपुते, फलटणचे विद्यमान आमदार सचिन पाटील, विनायक शेठ मासाळ, माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती किशोर सुळ, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उत्सव होणार आहे. यासाठी प्रथम बक्षीस १ लाख,११हजार,१११ रुपये ॲड. अजय घाटे, धनाजी सूळे, अणणासाहेब सुळ पाटील, देवानंद मासाळ व सदानंद पांढरे यांच्यावतीने, दुसरे बक्षीस ७७ हजार,७७७ जगन्नाथ जानकर, रविशेठ नाळे, विकास कोकरे, बाबासाहेब पुकळे, प्रशांत तरंगे यांच्यावतीने तर प्रोत्साहन पर बक्षीस ५५हजार,५५५ ॲड. किशोर काळे, दिनेश आवताडे, नवनाथ पाटील, विश्वजीत गोरड व विकास माने यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. यावेळी काजल गोसावी, लावणी सम्राणी आदीती देवर्षी, आसावरी धम धमा धम रिआलिटी शो फेम, मोना डान्सर, डान्सर लावणी आदीती जाधव यांचा खास आकर्षण असणाऱ्या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी प्रसिद्ध निवेदीका मयुरी पिसाळ निवेदन करणार आहेत. तरी पिलीव परीसरातील नागरिकांनी या दहीहंडी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवाशक्तीचे शिवराज पुकळे यांनी केले आहे.

# निमगावच्या तमन्ना मुलाणी व वैशाली लोंढे यांचा अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२० ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्यावतीने ग्राम स्तरावर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगीरी करणा-या महीलांना देण्यात येणारा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार निमगाव टें येथील तमन्ना जमिर मुलाणी व वैशाली हरिशचंद्र लोंढे यांना सुनंदा बबनराव शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



निमगाव टें ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजवंदनानंतर हा कार्यक्रम झाला. यावेळी रजनी बडवे, ग्रा.पं.सदस्य प्रताप शिंदे, सुनिल खापरे, निता शिंदे, विकास शिंदे, सुनिल शिंदे उपस्थीत होते.२०१७ पासुन तमन्ना मुलाणी यांनी महीलांचे २५ बचतगट स्थापन करून सुमारे २८० महीलांना शासनाचा आर्थीक लाभ मिळवून दिला आहे. सर्वांना बँकेमार्फत सुमारे ४५ लाख रूपये व शासनाचा सी.आय.एफ.१३ लाख रूपये मिळवून दिले आहेत. यामध्ये आर्थीक महीला सबलीकरण, सक्षमीकरण करून त्या सर्वांना विवीध स्वरूपाचे मार्गदर्शन देत स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला आहे. तमन्ना मुलाणी यांच्या याच कार्याची दखल घेण्यात आली. वैशाली लोंढे यांनी ११९ बालकांना लसिकरण केले. केंद्र सरकारच्या वतीने देण्यात येणा-या आयुष्यमान कार्ड काढणे, त्याचा फायदा मिळवून देणे, जन्ममृत्यू नोंद यासारखी कामे लोंढे यांनी केली. तमन्ना मुलाणी व वैशाली लोंढे यांच्या कार्याची दखल सरपंच यशवंत शिंदे, ग्रा.पं.सदस्य प्रताप शिंदे, सुनिल खापरे यांच्यासह सर्व सदस्य व ग्रामस्थांनी घेवून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

# अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मिळणार मदत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २० ऑगस्ट-**

माढा तालुक्यातील अनेक मंडलांमध्ये मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेली पिके नष्ट झाल्याने शेतकरी संकटात सापडले होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, या मागणीसाठी भाजपा माढा तालुका यांच्या वतीने तत्कालीन तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

त्यानंतर या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करून पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठवण्यात आला. या पाठपुराव्याला यश मिळून शासनाकडून माढा तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली किसान मोर्चा तालुकाध्यक्ष नंदकुमार मोरे, प्रकाश कुलकर्णी, शंकर मुळुक, पांडुरंग राऊत, बिरूदेव शेळके, लाला झाडे, प्रमोद रोटे, सोमनाथ वाघमारे, विवेक कुंभेजकर, माया माने, संध्या कुंभेजकर, लेंडवे मेजर, नावजी अनभुले, अर्जुन माने, देशमुख, पवार उपस्थित होते.

# गोसावी समाजाच्या प्रश्नांसाठी 'वंचित'चे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील गोसावी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने विविध प्रश्नांसाठी आज मंगळवारी निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ प्रश्न मार्गी लावण्याचा आदेश दिला.



यावेळी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. नितीन ढेपे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक जिल्हाध्यक्ष दीपक पराध्ये, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, युवक शहराध्यक्ष महेश जाधव, जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे शहर महासचिव विनोद इंगळे, लोकसभा वंचितचे उमेदवार आतिश बनसोडे विक्रांत गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष वैभव भंडारे, युवक जिल्हा सचिव सोमनाथ डावरे संगेपांक श्रीनिवास, अमर डुरके, रोहित लालसरे, विजयकांत उघडे, विजय गायकवाड, रवी थोरात, शंकर शिंदे, युवकचे नरेश मस्के, सुरवसे यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अक्कलकोट तालुक्यातील गोसावी समाजासाठी घरकुल योजना मार्गे लावावी, रस्ता, पाणी, शाळा या मूलभूत गरजांची पूर्तता करावी. या भटक्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाने अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. जातीचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड, जन्मदाखला, घरकुल योजनेसाठी जमीन उपलब्ध नाही. म्हणून हा समाज अजूनही भटकंती करून उपजीविका करीत आहे. या निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित प्रांत अधिकारी तहसीलदार आणि जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांना भ्रमणध्वनीद्वारे आठ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

# समर्थनगरी परिवारातर्फे महिनाभर अखंड स्वामी नामस्मरण

**• ४८३ साधकांचा सहभाग; महिन्याला ५४० तास सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

समर्थनगरी परिवाराच्या वतीने पहाटे पाच ते रात्री अकरा वाजेपर्यंत महिनाभर अखंड स्वामी नामस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ४८३ साधकांनी सहभाग घेतला आहे. दररोज १८ तास आपल्या घरी बसून दिलेल्या वेळेनुसार अखंड नामस्मरण केले जाते. महिन्याला ५४० तास इतका मोठा सोहळा संपन्न होत आहे.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामीभक्त चोळपा महाराज यांचे वंशज वे.शा.सं. अण्णू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक अध्यक्ष सैदप्पा इंगळे यांच्या नियोजनानुसार विश्वशांती व मनशांती करिता राज्यभरामध्ये नाम प्रसार सेवा, एकत्रित नामस्मरण सोहळा, साधना वर्ग, ललिता पंचमी उत्सवासह लिखित नामजप सोहळा, पारायण आदिचे आयोजन करण्यात येते. शिव हर शंकर, नमामि शंकर, शिव शंकर शंभो, हे गिरीजा पती भवानीशंकर, शिव शंकर शंभो स्वामी महाराजांच्या या मंत्रास अनुसरून समर्थनगरी पुणे, सातारा शाखेच्या वतीने राज्यभरात राज्याध्यक्षा वनिताताई झेंडे, कार्याध्यक्षा वीणाताई कामटे (पुणे), राजश्रीताई बाबर (सातारा), सुधाताई कोळेकर व सहकाऱ्यांच्या माध्यमातून राज्यभरामध्ये श्रावणमासानिमित्त पहाटे पाच ते रात्री अकरापर्यंत अखंड स्वामीनामजप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



"नामस्मरणाच्या माध्यमातून स्वामी संदेश देण्याचे कार्य करणारा समर्थनगरी परिवार आहे . नामप्रसार सेवेसह सामाजिक बांधिलकी जपत हम गया नही जिंदा है ही योजना व श्रावणमासात अखंड नामस्मरणसेवेचे आयोजन करून नवनवीन भक्तांना या नामाची गोडी लावण्याचे कार्य खूप महत्त्वाचे आहे . स्वामींच्या आवडीचे कार्य होत असून सर्व भक्तांनी स्वामी सेवेत सहभागी व्हावे.

**- वे.शा.सं. अण्णूमहाराज,**
श्री स्वामीभक्त चोळाप्पा महाराज वंशज,
श्री स्वामी समर्थ समाधी मठ, अक्कलकोट

नामजपाचे नियोजन पहाटे ५ ते रात्री ११ सुमारे १८ तास नामस्मरण होतो. प्रत्येक साधक अर्धा तास आपल्या ठराविक वेळेत नामस्मरण करतो. अर्ध्या तासात एका टप्प्यात २३ साधक याप्रमाणे दिवसभरात ४८३ साधक नामस्मरण करतात. श्रावणमास अखेर ५४० तास नामस्मरण सोहळा संपन्न होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### तेजस्विनी महिला उद्योग समूहाच्या वतीने १७० भक्त देवदर्शनासाठी रवाना

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

माजी उपमहापौर तथा तेजस्विनी महिला उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष दिलीप कोल्हे यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही बचत गटातील महिलांना आणि जय महाराष्ट्र तरुण मंडळातील २० युवकांना उज्जैन, ओंकारेश्वर, महाकाल यासह परिसरातील सर्व धार्मिक स्थळांना देवदर्शनासाठी धार्मिक सहल काढली. यामध्ये बचत गटातील १५० महिलांना सोबत घेऊन माजी नगरसेविका मंगला कोल्हे यांनी त्यांचे सर्व जाण्याचे येण्याचे राहण्याची उत्तम व्यवस्था केली आहे यासाठी मंगळवारी ते रेल्वेने रवाना झाले. यात्रेमध्ये मदत कार्यासाठी मंगेश डोंगरे, आरिफ निगेबान, सतीश मस्के, रणजित कोल्हे, कल्लाप्पा काम ने, बाळासाहेब सुरवसे, मंगला डोंगरे, मल्लवा उपासे, उषा नायडू, गीता डुकरे, जया माने, राधा गायकवाड, वंदना जाधव, कविता चव्हाण हे परिश्रम घेत आहेत.



### भावसार व्हिजन क्लबचा मेगा प्रोजेक्ट; मोफत २५ मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

भावसार व्हिजन क्लबचे रोप्य महोत्सवी २५ वर्षाचे औचित्य साधून व भावसार व्हिजनचे माजी गव्हर्नर श्री गिरीश पुकाळे यांचा वाढदिवसानिमित्त सोलापुरात २५ निराधार गरीब व गरजू वृद्धांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आले बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता दमाणी नगर येथील लायन्स क्लबच्या चॅरिटेबल हॉस्पिटल येते रुग्णांचे करण्यात आले. नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे माजी गव्हर्नर गिरीश पुकाळे डेप्युटी गव्हर्नर श्रीराज निकते सेक्रेटरी आशिष जवळकर कॅप्टन मनोज क्षीरसागर संचालक निशिकांत पुकाळे शशिकांत बेदरकर सुनील उपरे हर्षल माळवदकर सुहास राशींनकर धवल चिंचुरे उपस्थित होते



### महापालिकेच्या वतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने भारताचे थोर नेते व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कॉन्सिल हॉल येथील कार्यालयामध्ये भारताचे थोर नेते व माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त तैमूर मुलाणी, मुख्यलेखा परीक्षक रुपाली कोळी, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी,मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, मालमत्ता कर विभाग प्रमुख युवराज गाडेकर, निवडणूक विभाग प्रमुख ओमप्रकाश वाघमारे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजित खानसोळे यांच्या सह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह मुख्यलेखा परीक्षक रुपाली कोळी, उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी उपस्थिती असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सदभावना दिवसाची प्रतिज्ञा दिली.

# मनपा निवडणूक : ३ सप्टेंबरला प्रसिद्ध होणार प्रारूप प्रभाग रचना

**हरकती, सूचना नोंदविण्यास १५ सप्टेंबरपर्यंत मुदत**

**महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी येत्या ३ सप्टेंबर रोजी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात येणार आहे. त्यावर हरकती व सूचना नोंदविण्यासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत ठेवण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले असून त्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नगरविकास विभागाने राज्यातील ड वर्ग महापालिकांना प्रभाग रचना तयार करण्याच्या सुचना दिल्या आहेत. आयोग आणि शासनाच्या आदेशानुसार निवडणुकीची प्रक्रिया सुरु केली आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे प्रभाग रचना करण्यात येत आहे.

ड वर्ग दर्जाच्या महानगरपालिकांच्या प्रभाग रचनेकरीता दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रशासनाकडून नियोजनपूर्वक कार्यवाही सुरू आहे. यामध्ये संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून प्रगणक गटाची मांडणी करणे, प्रारुप प्रभाग रचना तयार करणे, जनगणनेची प्राप्त माहिती तपासणे, स्थळ पाहणी, गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे, नकाशावर निश्चित केलेल्या प्रभागहद्दी जागेवर जावून तपासणे, प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा तयार करुन त्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे, जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांमार्फत प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगर विकास



विभागास सादर करणे , प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगास पाठविणे ही प्रक्रिया करण्यात आली आहे. राज्य निवडणुक आयोग/आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे हे कार्यवाही करण्यात येत आहे.

दरम्यान, त्यानंतर सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्फत येत्या दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी महापालिका निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर हरकती सूचना मागविण्यात येणार आहेत.

**वेबसाईटवर घर बसल्या पाहता येणार प्रारूप प्रभाग रचना**

सोलापूर महापालिकेच्या वेबसाईटवर महापालिका निवडणुकीसाठीची प्रारूप प्रभाग रचना ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नागरिकांना घरबसल्या ही प्रारूप प्रभाग रचना ऑनलाइन पाहता येणार आहे. त्याचबरोबर सोलापूर महापालिका आवारातही प्रारूप प्रभाग रचना लावण्यात येणार आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

दि. १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत.

त्यानंतर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडून प्राप्त हरकती सूचनांवर १६ ते २२ सप्टेंबर २०२५ दरम्यान सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनावणीनंतर २३ ते २५ सप्टेंबर २०२५ दरम्यान हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिकारी यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभागास जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांमार्फत सादर करणार आहेत. दि. २६ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान प्राधिकृत अधिका-यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना नगर विकास विभाग राज्य निवडणुक आयोगास सादर करणार आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून अंतीम प्रभाग रचनेस मान्यता देण्यात येईल. दि. ९ ते १३ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान राज्य निवडणुक आयोग यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे महापालिका आयुक्त हे प्रसिद्ध करणार आहेत.

## बाप्पाच्या आगमनाचा उत्साह...



सोलापूर : गणपती बाप्पाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर कुटुंबासमवेत सोलापूरकरांनी विविध स्टॉल्सवर केलेली गर्दी. अशोक चौक परिसरात टिपलेले छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)

## नवरसधारा सांस्कृतिक कार्यक्रमास रसिकांचा उत्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

हुतात्मा स्मृती मंदिर येथे आनंदरंग कलामंच या संस्थेने नवरसधारा हा एक आगळा वेगळा आणि नेत्रदीपक, विलोभनीय असा कार्यक्रम सादर केला. नऊ रसांच्या धारा सोलापूरच्या रसिकांवर बरसल्या.



या कार्यक्रमामध्ये केवळ गाणीच नव्हती तर गाण्याव्यतिरिक्त नृत्य, नाट्य, संगीत, कविता यांचा सुरेख असा संगम होता. कार्यक्रमाची संकल्पना प्रथमेश माणेकरी आणि निमिष गोडबोले यांची होती. याचे दिग्दर्शन प्रथमेश माणेकरी यांनी केले. सूत्रधाराची भूमिका हर्षवर्धन माणेकरी यांनी पार पाडली. नृत्यदिग्दर्शन श्रीनिअंबा नृत्यालयाचे श्रीनिवास काटवे आणि अंबिका काटवे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसिका तुळजापूरकर यांनी केले. रंगभूषा विजयालक्ष्मी रमेश श्रावण यांनी केले. प्रकाशयोजनेची धुरा देवदत्त सिद्धम यांनी सांभाळली. वेशभूषा अंबिका माणेकरी यांनी केली. या कार्यक्रमा साठी अजय दासरी, संजय सावंत, अभिराम सराफ, प्रशांत देशपांडे, अरविंद माने, कल्याण श्रावस्थी, राजा राजेशचंद्र, सुमित फुलमाम डी, गिरीश पंचवाडकर इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

**सहभागी कलावंत असे**

काश्मिरा ताकटे- रंजन, रसिका तुळजापूरकर, निमिष गोडबोले, स्नेहल पोतदार, निर्मो ही अग्निहोत्री, शिवानी देगावकर, राहुल शिंगे, आरिफ शेख,आकाश डोंगरे, सोहम मोगली, प्रीतिविंध्य खटावकर ओंकार कोरे आणि प्रथमेश माणेकरी.

**वादक :** ओंकार कुलकर्णी, अद्वैत खेडकर, अविनाश इनाम दार,जयंत जोशी, सिद्धार्थ दणाणे, श्रेयस कुलकर्णी

## वयोवृध्द व्यक्तीच्या आत्महत्या प्रकरणी दोन मुलांसह चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

मंगळवार पेठ येथील ७६ वर्षीय व्यक्तीने चिठ्ठी मध्ये चौघांची नावे लिहून गळफास घेवून आत्महत्या केली आहे. नावे असलेल्या चौघांमध्ये त्या वयोवृद्ध व्यक्तीची दोन मुले व त्या मुलाचे सासू व नातेवाइकाचा समावेश आहे.

बसवेश्वर इराप्पा रासुरे (वय ७५ रा. मंगळवार पेठ,सोलापूर) हे गळफास घेवून मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. यावरून अमरनाथ रासुरे, सोमनाथ रासुरे व त्याची सासू धनश्री आडके , मलकार्जुन सारंगमठ (सर्व रा पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर) अशी गुन्हा दाखल केलेल्याची नावे आहेत. संशयित आरोपींनी प्राथमिक दृष्टया आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत असल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत आहे. १८ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास पश्चिम मंगळवार पेठ येथील राहत्या घरी बसवेश्वर इराप्पा रासुरे (वय ७५) यांनी घरातील खोलीच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली. त्यावेळी शेजारी असलेल्या विश्वनाथ बोरसे यांनी पोलिस ठाण्यात येवून माहिती दिली. ठाणे अंमलदार यांनी हवालदार नितीन भोगशेट्टी यांनी घटनास्थळी जाण्यास कळवले. त्यानुसार भोगशेट्टी हे घटना स्थळी पोहोचले,त्यांनी नातेवाईकांच्या मदतीने त्यास गळफासावरून खाली उतरवले. बेशुध्द अवस्थेत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. तो उपचारापूर्वीच मयत असल्याचे सिव्हिलच्या डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची माहिती जोडभावी पेठ पोलिस ठाण्यास कळवली असता,त्यांनी त्यांनी या घटनेची आकस्मित मृत्यूची नोंद करून घेतली.

हवालदार भोगशेट्टी यांनी मयताचा गळफास सोडवल्यानंतर त्यांना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी रवाना करतेवेळी मृताच्या हाफ चड्डी च्या उजव्या खिशात चिठ्ठी सापडली. ती दोन पंचासमक्ष ताब्यातघेतली. मृत्यूचे शवविच्छेदन झाल्यानंतर त्यामध्ये प्राथमि क कारण गळफास घेवून मृत्यू झाल्याची कळवले आहे. चिठ्ठी मध्ये ,मी बसवेश्वर इ.रासुरे माझ्या मृत्यू माझे दोन मुली अमरनाथ ब रासुरे व सोमनाथ ब रासुरे त्यांची सासू धनश्री आडके जबाबदार आहेत.त्याबरोबर मलकार्जुन सारंगमठ वनारोटे यांच्या बसतात जे जबाबदार आहेत. खास करून माझा मुलगा अमरनाथ रासुरे हा जास्त जबाबदार आहे. त्याच्या खाली इंग्रजी व मराठीतूनसही केलेली आहे.



## पर्यावरणाचा समतोल बिघडल्यास मानवाच्या अस्तित्वास धोका : कुलगुरु महानवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

वृक्षरोपण व त्यांचे संवर्धन करणे पर्यावरण समतोलाच्या दृष्टीने अपरिहार्य आहे अन्यथा मानवी जीवनाच्या अस्तित्वास धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. ग्लोबल वार्मिंगचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. त्यासाठी वृक्षरोपण व त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

आंतरराष्ट्रीय प्रार्थना योगमंडळ सोलापूर आयोजित परमपूज्य महातपस्वी कुमार स्वामीजींच्या ११६ व्या जयंतीनिमित्त राजेंद्र मायनाळ लिखित महातपस्वी श्री कुमार स्वामीजी यांचे जीवन व कार्य या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाच्या वेळी ते बोलत होते. यावेळी सोलापूर ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार विश्वनाथ चाकोते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्रींच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर प्रा. मधुरा वडापूरकर व सुवर्णलता तेलसंग यांनी भावगीते सादर केली. आंतरराष्ट्रीय प्राथमिक मंडळाचे अध्यक्ष व ग्रंथाचे लेखक राजेंद्र मायनाळ यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी उद्योगपती काशिनाथ ढोले, सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे उपाध्यक्ष सिद्धाराम बामणी, उद्योगपती सुरेश पवार, अखिल भारतीय ब्राह्मण समाजाचे सोलापूर शहर नूतन शहराध्यक्ष प्रमोद तमनवार, प्राचार्य गजानन धरणे, विश्वत विश्वनाथ म्हेत्रे, लक्ष्मण तळळीकर, बाळासाहेब नष्टे, लातूरचे भद्रानप्पा रंगदाळे, निलंग्याचे विजयकुम ार कुटुंबले उपस्थित होते. सचिव बाबासाहेब कुलकर्णी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन विश्वस्त नागनाथ चौगुले यांनी केले. जन्मोत्सवाच्या निमित्ताने महाप्रसादाची व्यवस्था केली होती. महाप्रसादाची व्यवस्था विश्वस्त विश्वनाथ म्हेत्रे, रमेश चौगुले, संतोष मंठाळ यांनी चोख बजावली.

# विमुक्त जाती व भटक्या जमाती अंतर्गतच्या २२३ जातींना न्याय मिळाला पाहिजे : समिती प्रमुख कांदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती अंतर्गत २२३ जातींचा समावेश आहे. या सर्व जातींना शासकीय पद भरती, आरक्षण व अनुशेष या अंतर्गत शासकीय धोरणाप्रमाणे सर्व विभागामध्ये समाविष्ट करून घेण्याबरोबरच शासकीय योजनेचा लाभ ही शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. या सर्व जातींना न्याय मिळाला पाहिजे, अशी भूमिका समि तीची असून त्याची तपासणी समितीमार्फत अत्यंत काटेकोरपणे करण्यात येईल, असे निर्देश महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे प्रमुख तथा आमदार सुहास कांदे यांनी दिले.



शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात आयोजित जिल्हा परिषद महानगरपालिका व सर्व नगरपालिकांच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती अंतर्गत च्या कामाचा आढावा समितीने घेतला, त्याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून आमदार कांदे म ार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार उमेश यावलकर, आमदार अनिल मांगरूळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कक्ष अधिकारी विनोद राठोड, म हापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, इतर बहुजन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के, तहसीलदार श्रीकांत पाटील, सर्व गटविकास अधिकारी व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी समिती प्रमुख तथा आमदार कांदे म्हणाले की, राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जम ातीच्या शहरी व ग्रामीण भागातील सर्व नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्या शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी त्यांच्या अधिनस्त विभागात शासकीय नियमाप्रमाणे या समाजातील नागरिकांना लाभ मिळत आहे की नाही याची सविस्तर माहिती समितीला सादर करावी. या प्रवर्गातील नागरिकांची रिक्त असलेली पदे तात्काळ भरावीत. एकही पद कोणत्याही कारणाशिवाय रिक्त राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी त्या त्या विभाग प्रमुखाची आहे, असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्हा परिषद, महानगरपालिका व सर्व नगरपालिका मध्ये ज्या कर्मचाऱ्यांच्या भरत्या झालेल्या आहेत परंतु जात वैधता प्रमाणपत्र सहा महिने झाले तरी सादर केलेले नाही अशा सर्व कर्मचाऱ्यांची माहिती द्यावी. तसेच यातील जे प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत ती ही यादी सादर करावी. सहा महिने झाले तरी कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही आशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतून बडतर्क रण्याबाबतची कारवाई संबंधित यंत्रणा प्रमुखांनी करावी, असे निर्देशही कांदे यांनी दिले. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील छोट्या छोट्या जाती मधील नागरिकांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांचे हक्क इतर कोणीही हिरावून घेणार नाही याची दक्षता प्रशासकीय यंत्रणांनी घेतली पाहिजे असेही त्यांनी सुचित केले.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषद अंतर्गत नियुक्त जाती व भटक्या जमाती मधील लाभार्थ्यांना देण्यात येत असलेल्या घरकुलांच्या लाभाविषयी माहिती दिली. महापालिका आयुक्त ओंबासे यांनी महापालिकेअंतर्गत पदभरती व अनुशेष याची माहिती दिली तर नगरपालिका प्रशासन अधिकारी श्रीमती पवार यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिका अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांना पदभरती, आरक्षण व अनुशेष तसेच शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील गाळेवाटप आरक्षण याविषयी सविस्तर माहिती दिली.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# नूमवि शाळेत राजीव गांधी जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रभारी मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



सहशिक्षक लंगोटे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. स्मिता माळवदकर यांनी भारतात आधुनिक तंत्रज्ञान आणण्यामागे स्वर्गीय राजीव गांधी यांची भूमिका सांगितली. सूत्रसंचालन व आभार आळसंदे यांनी केले.

## ▶▶ महत्वाचे...

### विनापरवाना श्री गणेश मूर्ती विक्री केल्यास कारवाई

**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**



महापालिका प्रशासनाने निश्चित केलेल्या शहरातील श्री गणेश मूर्ती विक्री केंद्राच्या नियोजित आठ ठिकाणीच स्टॉल्स थाटण्यात यावेत. विनापरवाना श्री गणेश मूर्तीची इतरत्र विक्री केल्यास कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे. गणेशोत्सवानिमित्त सोलापूर शहरात महापालिकेच्या वतीने आवश्यक ते नियोजन करण्यात येत आहे. श्री गणेश मूर्ती विकण्यासाठी स्टॉल्स करिता शहरातील विविध आठ ठिकाणी निश्चित करण्यात आली आहेत. या नियोजित ठिकाणीच विक्रेत्यांनी स्टॉल्स उभारावेत इतरत्र विक्री केल्याचे आढळल्यास महापालिका प्रशासनाकडून कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेचा परवाना आवश्यक आहे. सोलापूर शहरातील पुंजाल मैदान, पोलीस हेडक्वार्टर समोरील शिवराम चौक येथील मैदान, हवामान खात्या समोरील जागा, आसार मैदान, छत्रपती संभाजी महाराज तलाव येथील मैदान, पार्क स्टेडियम समोरील मैदान, कर्णिक नगर चिल्ड्रन पार्क शेजारील मैदान, विभागीय कार्यालय क्रमांक दोन समोरील खुली जागा आधी आठ ठिकाणी ही सोय करण्यात आली आहे. विनापरवाना इतरत्र विक्री केल्याचे आढळून आल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले आहे.

### नाल्यात पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

दोन नंबर एसटी स्टॅन्ड परिसरातील नाल्यात पडल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आला. तरुणाला उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जैद महिबूब सय्यद (वय ३०, रा. कुर्बान हुसेन नगर) असे तरुणाचे नाव आहे. जैद हा बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास दोन नंबर एसटी स्टॅन्ड परिसरातून जात होता. त्यावेळी तेथील नाल्यात तो पडला. यात त्याच्या डाव्या डोळ्याला आणि पायाला मार लागला. ही बाब माहित झाल्यानंतर मित्र दस्तगीर कुरेशी याच्या मदतीने शासकीय रुग्णालयात सकाळी ८.४५ वाजता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मंडळाचा फलक डोक्यावर पडून महिला जखमी

**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

आकाशवाणी केंद्रापासून राहत्या घराकडे पायी जाणारी महिला मंडळाचा फलक डोक्यावर पडून जखमी झाली. हा अपघात सोमवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास गवळी वस्ती कॅमा बिल्डींगजवळ घडला. रेखा संजय घंटे (वय ६१, रा. चौपाड) असे महिलेचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी रेखा या आकाशवाणी केंद्र येथून चौपाड येथील राहत्या घरी पायी चालत जात होत्या. आकाशवाणी केंद्रापासून काही अंतरावरील गवळी वस्ती जवळ आल्यानंतर अचानक गणपती मंडळाचा फलक डोक्यावर पडला. यात डोक्याला मार लागल्याने रात्री १०.४० वाजता त्या स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मुलीला होणाऱ्या त्रासाचा जाब विचारल्याने मारहाण

**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

मुलीला होणा-या त्रासाबाबत विचारणा करण्यास गेल्यानंतर सहा जणांनी लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही मारहाण मोहोळ तालुक्यातील पेनूर शिवारात मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास झाली. आप्पाराव लक्ष्मण जाधव (वय ३०) व मनिषा आप्पाराव जाधव (वय १९, दोघे रा. पेनूर ता मोहोळ) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत. मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास आप्पाराव हे पेनूर येथील शिवारात होते. त्यावेळी ते त्यांच्या मुलीला होणा-या त्रासाबाबत विचारणा करण्यासाठी विकास बापू चव्हाणकडे गेले. तेथे विकास आणि इतर पाच जणांनी लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. आप्पाराव यांच्या डाव्या हाताला माल लागला आहे तसेच डोक्याला जखम झाली आहे. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन त्यांना शासकीय रुग्णालयात रात्री ११.३० वाजता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# भीमा नदीत दीड लाख क्युसेकचा विसर्ग

## नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० ऑगस्ट-**

उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी धरणातून ९१ हजार ६०० क्यूसेक्स तर वीर धरणातून ५४ हजार ७६० क्यूसेक्स असा १ लाख ४६ हजार ३६० क्यूसेक्स इतका विसर्ग सोडण्यात आल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

दरम्यान बुधवारी २० ऑगस्ट रोजी दुपारी ३.०० वाजता संगम येथून १ लाख २० हजार ६९५ क्सूसेक्सने तर चंद्रभागा नदी पात्रातून ६० हजार २४७ क्सूसेक्सने पाणी वाहत आहे. उजनी व वीर धरण घाटमाथ्यावरील पावसाच्या प्रमाणानुसार व धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवक नुसार विसर्गामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने, नदीपात्रालगत पूरस्थिती निर्माण होवून सखल भागातील नागरी वस्तीमध्ये पूराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे. तसेच पाणी पातळी वाढत असल्याने पंढरपूर तालुक्यातील ८ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने नीरा व भीमा नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, अशा सूचना तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील यांना दिलेल्या आहेत.

### नगरपालिका प्रशासन सज्ज

उजनी व वीर धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी भीमा नदीला उजनीतून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु झालेला आहे. त्यामुळे शहरातील चंद्रभागा नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षेबाबत दक्षता घ्यावी तसेच पूर परिस्थितीत आवश्यक उपाययोजना करण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. तसेच नगरपालिका प्रशासनामार्फत उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथील रायगड भवन येथे एक हजार नागरिकांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच बाधित होणाऱ्या नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तू नेण्यासाठी नगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत वाहनांची व्यवस्था करण्यात आली असून स्थलांतरित करण्यात येणाऱ्या नागरिकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व स्वयंसेवी संस्थेमार्फत भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही मुख्याधिकारी श्री रोकडे यांनी सांगितले.

# गृहनिर्माण संस्थेच्या राखीव जागेवर अतिक्रमण

**पावणे सहा गुंठ्याची नोंद करून घेत कमी भावात विक्री**

## २२ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

माढा तालुक्यातील भोसरे येथे डीसीसी बँक कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेची रस्ता व ओपन स्पेससाठी पावणे सहा गुंठे जागा राखीव ठेवली आहे. मात्र, त्या जागेचे बोगस मोजणी, नोंदी व नकाशा तयार करून ती जागा कमी किमतीत विकली. मोठ्या प्रमाणात अर्थिक व्यवहार केला. याप्रकरणी माढ्यातील २२ जणांवर सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना २५ जुलै रोजी उत्तर सोलापूर, दुय्यम निबंधक कार्यालय सोलापूर या ठिकाणी घडली आहे. नामदेव राजाराम गरड (वय ७५ रा. आंतरभारती प्रशालेजवळ टेंभुर्णी रोड, कुर्डूवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सलीम हमजू शेख, शिवाजी श्रीपत दास, सुभाष खाडे, बब्रुवान पाटील, दत्तात्रय कुंभार, कल्याण बाबर, आकाश बागल, योगेश गिरी, अतुल चोपडे, प्रियंका चोपडे, दिपाली भोरे, कृष्णा वटाणे, प्रिया अंधारे, प्रविण चोपडे, संभाजी नाईकवाडे, महेश तांबारे, कुबेर जगताप, ज्ञानेश्वर माने, किरण बागेल, ज्योतीराम बागल, रवि बागल, अरविंद बागल (सर्व रा. माढा) अशी गुन्हा नोंद करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

आरोपींनी आप-आपसात संगनमत करून डीसीसी बँक कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेने मौजे भोसरे, ता. माढा येथील मुळ गट क्र. ६४ मधील १ हेक्टर ९० आर जागे मधील प्लॉट नं ६४/१/३८ हे रस्ता व ओपन स्पेश राखी क्षेत्र आहे. प्लॉट धारकांसाठी राखून बनावट व खोटा बैठक दाखवली, ठराव करून बनावट व खोटी मोजणीही केली.

मोजणी दाखवून खोटा व बनावट नकाशा सही शिक्के मारून तसेच तहसीलदार यांची बोगस व बनावट सही शिक्के मारून खोटा नकाशा तयार केला. ते जाणीव पूर्वक खरा आहे असा वापरून खरेदी खतात जोडला, खरेदी खतात जोडून शपथेवर खोटे कथन करून खोटे शपथ पत्र जोडले. फिर्यादी व इतर प्लॉट धारकांची बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केली. राखीव असलेल्या ५७४७.२ चौमी जागा बळकावून शासकीय बाजार भावांपेक्षा कमी किमतीमध्ये आप आपसात खरेदी विक्री करून मोठ्या प्रमाणात अर्थिक गैरव्यवहार केला आहे.

# सराईत दुचाकी चोरटा 'पोत्या'वर स्थानबध्दतेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

दुचाकीचोरीबरोबरच इतर गंभीर गुन्हे करून सामाजिक शांतता धोक्यात आणणारा गुन्हेगारावर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या आदेशाने स्थानबध्देतची कारवाई करण्यात आली.



आदित्य उर्फ पोत्या बसवराज दोडमणी (वय ३०, रा. विजापूर रोड, नडगेरी पेट्रोलपंपाजवळ, सोलापूर) असे स्थानबध्द करण्यात आलेल्या सराईत दुचाकी चोरट्याचे नाव आहे. मागील काही वर्षापासून आरोपी आदित्य हा दुचाकी चोरीचे गुन्हे करत असल्याची नोंद पोलिसात आहे. त्याचबरोबर तो चोरी, घरफोडी, घातक शस्त्राने दुखापत करणे, जबरी चोरी करणे, घातक शस्त्रांनी धमकी देण्यासारखे गंभीर गुन्हे त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

आरोपी आदित्यची व्यापा-यांसह सामान्य नागरिकांमध्ये दहशत असल्याने त्याच्याविरूध्द कोणी पोलिसांना माहिती देत नाहीत. तो करत असलेल्या धोकादायक कृत्यांमुळे सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यात १५ गुन्हे दाखल आहेत.

गुन्हेगारी कारवायांपासून त्याला परावृत्त करण्यासाठी त्याच्यावर सन २०२३ व २०२४ मध्ये प्रतिबंधक कारवाई केली. परंतु त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. उलट त्याने सामाजिक शांतता धोक्यात येईल असे कृत्य केल्याची नोंद पोलिसात झाल्याने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी त्याच्यावर स्थानबध्दतेची कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यापमाणे त्याला कारवाई करून येरवडा कारागृहात दाखल करण्यात आले.

ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, वपोनि शिवाजी राऊत, सपोनि तुकाराम घाडगे, अंमलदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

# बांधकाम विभागाकडे शाळा पाडकाम फाईल प्रलंबित

## जीर्ण खोल्यांमुळे विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेच्या शाळांच्या जीर्ण झालेल्या धोकादायक इमारतीचे पाडकाम करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याला अधिकार देण्यात यावेत, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे रविवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची भेट झाल्यावर त्यांनी जिल्ह्यात जिल्हा परिषदे मार्फत सुरू असलेल्या विकास कामांची मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती घेतली. राज्यभर सध्या पावसाची संततधार सुरू आहे. पावसामुळे जुन्या जीर्ण व धोकादायक झालेल्या वर्ग खोल्यांमुळे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना धोका पोहोचू शकतो. जिल्ह्यात झेडपी शाळेच्या १३३ वर्ग खोल्या धोकादायक झाले आहेत. जिल्हा परिषदेने या धोकादायक वर्ग खोल्यांचे स्ट्रक्चर ऑडिट केले आहे. अशा धोकादायक वर्ग खोल्या पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेल्या तीन वर्षांपूर्वीच प्रस्ताव दिला आहे. पण बांधकाम विभागाने या शाळांच्या वर्ग खोल्यांची तपासणी करून खोल्या पाडण्याबाबत अद्याप दाखला दिलेला नाही. बांधकाम विभागाकडे असलेला कामाचा पसारा पाहता जिल्हा परिषदे कडून गेलेल्या अशा कामाबाबत दिरंगाई होत आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वर्ग खोल्यांच्या नवीन बांधकामासाठी डीपीसीतून आलेला निधीही परत जात आहे. त्यामुळे वेळेत काम होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तत्पर कार्यवाही होणे अपेक्षित आहे. पण गेल्या तीन वर्षापासून हा प्रस्ताव पडून असल्यामुळे अडचणी निर्माण झाले आहे. जिल्हा परिषदेच्या स्वतःचा बांधकाम विभाग कार्यरत आहे.

या विभागाकडे सार्वजनिक विभागाकडूनच अधिकारी नियुक्त होत असतात. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागालाच वर्ग खोल्या व इतर धोकादायक इमारतीची पाहणी करून पाडकामाचे अधिकार देणे गरजेचे आहे. यावर गांभीर्याने विचार करून असा धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती सीईओ कुलदीप जंगम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या विनंतीला मान देत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

# मल्लिकार्जुन नगरात गळफासाने एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

राहत्या घराच्या छताच्या हुकाला साडीने गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. हा प्रकार बुधवारी सकाळी ७.१५ वाजता मल्लिकार्जुन नगरात उघडकीस आला. रुद्रप्पा चिदानंद रामुपरे (वय ४५, रा. मल्लिकार्जुन नगर) असे आत्महत्या केलेल्या व्यकतीचे नाव आहे.

रुद्रप्पा हे बुधवारी सकाळी ७.१५च्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातील छताच्या लोखंडी हुकाला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले.

नातेवाईकांच्या मदतीने हवालदार नवले यांनी त्यांना गळफासातून सोडवले. त्यानंतर बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# माकपचे उद्यापासून ३ दिवसीय राजस्तरीय राजकीय अभ्यास शिबीर

## प्रा. अभ्यंकर, डॉ. नारकर, डॉ. अजित नवले, बादल सरोज यांचे होणार मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० ऑगस्ट-**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कुंभारी येथील रेनगरात शुक्रवार दि २२ ते २४ ऑगस्ट असे तीन दिवस राज्यस्तरीय राजकीय अभ्यास शिबिर आयोजित केले आहे, अशी माहिती ज्येष्ठ कामगार नेते व माजी आ.नरसय्या आडम यांनी पत्रकार परिषदेत दिली.



देशाच्या इतिहासात क्रांतिकारी वारसा लाभलेला, क्रांतिकारकांची भूमी असलेला सोलापूर जिल्हा प्रथमच माकपच्या राजकीय अभ्यास शिबिराचे यजमानपद भूषवणार आहे. माकपाच्या शाखा सचिवांसाठी आयोजित हे तीन दिवसीय शिबिर कुंभारी येथील रे नगर येथे शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट ते रविवार, दि. २४ ऑगस्ट दरम्यान होणार आहे.या शिबिराचे उद्घाटन माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थान माकपाचे राज्य सचिव डॉ. कॉ. अजित नवले भूषवतील.

मार्क्सवादी विचारांचा सोलापुरातील वारसा स्वातंत्र्यपूर्व काळापासून सोलापुरात मार्क्सवादी विचारधारेवर चालणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य चळवळ व कामगार चळवळ जोपासली. कॉ. नारायणराव आडम, रमणय्या दिड्डी, कोमरय्या यलगेटी व कॉ. नबिखा बेरिया व अन्य लढाऊ कार्यकर्त्यांनी मिळून १९६५ साली सोलापुरात माकपाची पहिली शाखा स्थापन केली. त्यानंतर पक्षाने कामगारांच्या प्रश्नांवर ऐतिहासिक व निर्णायक लढे उभे केले. त्या लढ्यांची परंपरा आजही कायम आहे.

सन २०१४ नंतर देशात आणि महाराष्ट्रात राजकीय अस्थिरता, सामाजिक-आर्थिक विषमता वाढली आहे. सांप्रदायिकता, धर्मांधता आणि जातीयतेच्या आधारावर अराजकता माजलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुद्दाम थांबवून लोकशाही प्रक्रियेची गळचेपी केली जात आहे. अस्मितेच्या नावाखाली जनतेच्या खऱ्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. या परिस्थितीत सत्ताधारी महायुतीला सत्तेतून पायउतार करून विकासाला नवे पर्व देणे हाच पर्याय असल्याचा संदेश या अभ्यास शिबिरातून दिला जाणार आहे. या पत्रकार परिषदेस कॉ एम. एच. शेख, नसीमा शेख, कॉ. युसुफ शेख, नलिनी कलबुर्गी, व्यंकटेश कोंगारी, शेवंता देशमुख, म.हनीफ सातखेड, सुनंदा बल्ला, ड.अनिल वासम, दत्ता चव्हाण आदी उपस्थित होते.

### या विषयांवर होणार वैचारिक मंथन

या शिबिरात माकपचा जाहीरनामा, भांडवली अर्थव्यवस्था, साम्राज्यवादी धोरणे, भारतातील सांप्रदायिकता व धर्मांधता, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थिती या विषयांवर प्रा. अजित अभ्यंकर, डॉ. उदय नारकर, डॉ. अजित नवले, ज्येष्ठ हिंदी सायित्यिक कॉ. बादल सरोज यांच्यासह महाराष्ट्रातील पुरोगामी, लोकशाही, समाजवादी व मार्क्सवादी विचारवंत मार्गदर्शन करतील. तर विशेष सत्रामध्ये माकपाचे पॉलिटब्युरो सदस्य कॉ. प्रकाश करात व डॉ. अशोक ढवळे मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत.

**अशी आहेत शिबिराची वैशिष्ट्ये**

महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यांतून २७० शाखा सचिव व लढाऊ कार्यकर्त्यांचा सहभाग या शिबिरात राहणार आहे. २२ ऑगस्ट रोजी लाल सलामी व ध्वजारोहणाने भव्य सुरुवात होईल. रे नगरच्या प्रशस्त प्रांगणात हजारो लाल सैनिकांची हजेरी राहील.या तीन दिवसीय शिबिरातून महाराष्ट्राच्या राजकारणात नवे भांडवलविरोधी, समाजवादी, लोकशाही मूल्यांचे पर्व सुरू होईल, असा विश्वास माजी आ.नरसय्या आडम यांनी व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

मानवी जीवनाचा उद्देश काय? याचा विचार केला तर माणसाला भौतिक सुख, कीर्ती, ऐश्वर्य या पलीकडे जाऊन परमसत्याचा शोध घ्यावा लागतो. या शोधासाठी शास्त्रांनी कर्म, ज्ञान, योग व भक्ती असे विविध मार्ग सांगितले आहेत. परंतु या सर्व मार्गांमध्ये भक्ती हा मार्ग श्रेष्ठ आहे. कारण कर्मामध्ये आसक्ती निर्माण होऊन बंधन वाढते, ज्ञानामध्ये अहंकार येण्याची शक्यता असते. या आसक्ती व अहंकाराचा अडसर दूर करण्याचे सामर्थ्य मात्र भक्तीत आहे. म्हणूनच, भक्ती ही मुक्तीपेक्षाही श्रेष्ठ मानली गेली आहे, असे श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर निरुपण करताना प्रतिपादन केले.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २६

पुढे डॉ. जयवंत महाराज निरुपण करतात की, विदुर काका व उद्धव यांचा संवाद हे या विचाराचे मूळ उदाहरण आहे. उद्धवांनी विदुरांना सांगितले की, खऱ्या ज्ञानोपदेशासाठी त्यांना मैत्रेय ऋषीकडे जावे लागेल. त्या अनुषंगाने विदुरांनी यमुना स्नान करुन गंगातीरी मैत्रेय ऋषींची भेट घेतली. तेव्हा ऋषींनी विदुरांच्या जीवनातील पूर्वकथा सांगितली-मांडव्य ऋषींच्या शापामुळे यमराजांना दासीपुत्र म्हणून जन्म घ्यावा लागला आणि तेच पुढे विदुर काका झाले. हा प्रसंग ऐकताना जीवनातील प्रत्येक अनुभवाला दैवी नियोजन असते, हा गूढ अर्थ महाराज श्रोत्यांना समजावून देतात.

भक्ती ही माणसाचे अंत:करण निर्मल करते. विकार क्षणात कसे निर्माण होतात, हे महाराजांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. राग, द्वेष, मत्सर, अहंकार हे मनाचे विकार क्षणात उभे राहतात, परंतु भक्तीचा स्पर्श झाला की हे सारे विकार वितळून जातात. कारण भक्ती म्हणजे फक्त विधी नाही तर आत्म्याचा देवाशी होणारा अखंड संवाद आहे, असे तात्विक चिंतन डॉ. जयवंत महाराज यावेळी मांडतात.

या संवादातून सृष्टीविषयक तत्त्वज्ञानही उलगडते. ही सृष्टी कोणी निर्माण केली? तिच्या निर्मितीची प्रक्रिया कशी आहे? असे प्रश्न प्रत्येकाला पडतात. उत्तर असे की, सृष्टी हे केवळ भौतिक निर्माण नसून ते दैवी संकल्पाचे प्रकट रुप आहे. परमेश्वराच्या इच्छेतून ही सृष्टी घडते आणि प्रत्येक जीव त्या सृष्टीतील कण आहे. त्यामुळे जीव परमेश्वरापासून विलग नाही तर भक्तीमुळेच तो आपल्या मूळ स्वरुपाची जाणीव करतो. या ठिकाणी भक्तीचा सामाजिक अर्थही तेवढाच महत्त्वाचा आहे. कारण भक्ती अहंकार नष्ट करते, समत्व वाढवते आणि परस्परांमध्ये प्रेम व सेवाभाव निर्माण करते. ज्या समाजात भक्ती आहे, तेथे अन्याय, स्वार्थ, भेदभाव कमी होतात. म्हणूनच, मुक्ती ही केवळ वैयक्तिक उन्नती असली तरी भक्ती ही वैयक्तिक उन्नतीसोबत सामाजिक शुद्धीचीही हमी देते, असे आवाहन डॉ. जयवंत महाराज भाविकांना करतात.

अखेरीस, भक्ती ही केवळ साधन नाही तर साध्यही आहे. मुक्ती ही जीवाची अंतिम अवस्था आहे ; तर भक्ती ही या अवस्थेच्या पुढे ही सुखाचा उपभोग देणारी अवस्था आहे. म्हणूनच, भक्ती ही मुक्तीपेक्षाही श्रेष्ठ आहे, असे तात्विक चिंतन आजच्या सत्रात डॉ. जयवंत महाराज यांनी प्रकट केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरूवार | दिनविशेष - चांगला दिवस, शिवरात्री, बृहस्पती पूजन, गुरुपुष्यामृत |
| दि. २१ ऑगस्ट २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८२ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसु | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - श्रावण | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. त्रयोदशी (१२.४४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वर्षा | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - पुष्य (२४.०८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - व्यतिपात (१६.१३) | |
| करण - विष्टि (२४.१६) | |



# सिद्धेश्वर पॉलिटेक्निकमध्ये उद्योजकता विकास विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथे उद्योजकता विकास या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे, प्रमुख पाहुणे गिरीराज झंवर, टीपीओ प्रमोद मेणसे उपस्थित होते.

स्वतःचा व्यवसाय उभा करण्यासाठी लागणारे मार्केटिंग आणि सेल्स कौशल्याचे विकास करण्याकरता मार्गदर्शन केले. पावर पॉइंटच्या माध्यमातून विद्यार्थिनींना आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा उपयोग मार्केटिंगमध्ये कसा होतो व डिजिटल मार्केटिंग एक महत्त्वाचा घटक असून याचा व्यवसाय वाढीसाठी उपयोग ठरू शकतो, असे गिरीराज झंवर यांनी व्यक्त केले. योग्य मार्केटिंग न झाल्यास गुणवत्तापूर्वक उत्पादनाला सुद्धा मार्केटमध्ये चांगला प्रतिसाद मिळत नाही. वस्तू खरेदी व विक्री काळाची गरजेनुसार बदलत असते. लक्ष्यप्रेक्षक समोर ठेवून वस्तूंचे उत्पादन करणे क्रमप्राप्त ठरते असे सांगितले. यावेळी प्रा. गजानन धरणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन दिया पटेल व संस्कृती झंवर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गायत्री लंगोटे, सायली तळेकर, श्रुतिका तळेकर, कृष्णाली डोरले, रोहित देशपांडे, किरण गलगली ,विशाल दुधगी यांचे सहकार्य लाभले.

# हराळवाडी ग्रामस्थांचे चिखलात ठिय्या आंदोलन



## हराळवाडी ते कामती रस्त्यासाठी आक्रमक भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

कामती गावाला जोडणारा हराळवाडी येथील प्रमुख मार्ग करण्याच्या मागणीसाठी हराळवाडी ग्रामस्थांनी सोमवारी आक्रमक भूमिका घेत चिखलात ठिय्या आंदोलन केले. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते तथा माऊली हेगडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. लक्ष्मी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने जमलेल्या ग्रामस्थांनी प्रशासन व लोकप्रतिनिधी विरोधात जोरदार नाराजी व्यक्त केली.

देशाला स्वातंत्र्य मिळून तब्बल ७९ वर्षे उलटली, तरीदेखील हराळवाडी ते कामती हा रस्ता मार्गी लागलेला नाही. त्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, तसेच रुग्णालयात जाणारे वृद्ध नागरिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

२०१९ पासून या रस्त्याच्या मागणीसाठी चार वेळा ग्रामपंचायतीतून ठराव करून शासनदरबारी सादर करण्यात आले. मात्र प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी सातत्याने या मागणीला कानाडोळा केल्याचा आरोप ग्रामस्थांनी आंदोलनादरम्यान केला.

हराळवाडीत आठवडी बाजार भरत नसल्याने नागरिकांना कामती बाजारपेठेसाठी तसेच शासकीय कामांसाठी मोहोळला जाण्यासाठी या मार्गावर अवलंबून राहावे लागते. उन्हाळा व हिवाळ्यात हा रस्ता वापरण्या योग्य असला तरी पावसाळ्यात चिखल व पाण्यामुळे नागरिकांना प्रचंड समस्यांना सामोरे जावे लागते.

ग्रामस्थांनी तातडीने हा रस्ता मार्गी लावण्याची मागणी केली असून, प्रशासन व लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष न दिल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ गायकवाड, ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत ढगे, सुनील जावीर, भारत गायकवाड, पांडुरंग बाड, दत्ता ऐवळे, सचिन मोटे, शिवाजी गायकवाड, जयराम शिंदे, पै. हनुमंत हराळे, भैय्या कोलारकर, मंजू हराळे, पै. बिरू माने, श्रीकांत मोटे सागर गायकवाड, बालाजी झाडगे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नूमवि शाळेत बीज बंधन उपक्रम

## बीज बंधनातून हरित रक्षाबंधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

रक्षाबंधन सणाला पर्यावरणपूरक स्वरूप देत निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यासाठी नू. म. वि. मराठी शाळेत शरद पवार फेलोशिप अंतर्गत 'बीज बंधन' हा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेचा व सृजनशीलतेचा वापर करून विविध बियांपासून आकर्षक राख्या तयार केल्या. या राख्यांमध्ये निसर्गप्रेम, पर्यावरण रक्षण आणि संवेदनशीलता मूल्ये जोपासली. मुख्याध्यापिका सौ. स्मिता मळवदकर व वर्गशिक्षिका सौ. रोहिणी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या बियांच्या राख्या तयार करून शाळेच्या परिसरातील वृक्षांना बांधल्या आणि त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा घेतली. या प्रतीकात्मक कृतीतून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये जसे की जबाबदारीची जाणीव आणि निसर्गाशी बांधिलकी विकसित झाली. तसेच जीवन कौशल्ये जसे की सर्जनशीलता, सहकार्याची वृत्ती, समस्यांचे निराकरण आणि भावनिक संवेदनशीलता यांना वाव मिळाला.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त मनपा शिक्षण मंडळात ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनानिमित्त महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आवारामध्ये महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

सर्व कर्मचाऱ्यांना तिरंगी फेटे बांधून व चार हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण अभिवादन करून मिठाई वाटप करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, सुरेश कासार, भगवान मुंढे, निलोफर सय्यद, रजनी राऊळ, सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक पांडुरंग माने, मुकुंद चंदनशिवे, सारंग अंजीखाने, महेश वालावलकर, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, तरंगिणी कोंडा, सुवर्णा गुरव, प्रफुल्ला कदम, प्रभा चव्हाण, रूपाली कंची, अविनाश शिंदे, नितीन अंकुश, गुरुप्रसाद तलवार, रियाज अत्तार, अमोल गायकवाड, अमोल धस, लक्ष्मी पुजारी, सचिन जाधवर, भगवान गायकवाड, सौदागर वाघमारे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची कार्यवाही लवकरच करणार

## १९८ पैकी ७२ रस्त्यांची करण्यात येणार दुरुस्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

सततच्या पावसामुळे शहरातील बहुतांश रस्ते खड्डेमय झाले आहेत. याची माहिती घेण्यात आली आहे. त्यापैकी दोष दायित्व कालावधी (डीएलपी) असलेल्या ७२ रस्त्यांची दुरुस्ती हाती घेण्यात येणार आहे तशा सूचनाही संबंधितांना देण्यात आल्या आहेत. पावसाने उघडीप दिल्यानंतर दोन-तीन दिवसातच नव्या तांत्रिक पद्धतीने नुसार ओल्या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची कार्यवाही हाती घेण्यात येत आहे, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली.

सोलापूर महापालिकेच्या माध्यमातून विविध योजना अंतर्गत मागील दोन वर्षात सोलापूर शहरात एकूण १९८ रस्ते करण्यात आले आहेत.

शहरात गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात पाऊस होत आहे. सततच्या पावसामुळे अनेक रस्ते खड्डेमय झाले आहेत. एकूण १९८ रस्त्यांपैकी ७२ रस्ते दुरुस्ती करण्यासंदर्भातील दोष दायित्व कालावधी बाकी आहे. या संबंधितांना रस्ते दुरुस्तीसाठी नोटीस दिली आहे. लवकरच या संदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. ओल्या रस्त्यावर खड्डे बुजवणे अडचणीचे ठरते. यामुळे नव्या तांत्रिक पद्धतीने असे रस्तेही बुजून्यात येणार आहेत. त्यासाठीची आवश्यक साहित्य लवकरच उपलब्ध होणार आहे. त्यानंतर खड्डे आणि रस्ते दुरुस्तीची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्ते खड्डे मुक्त करण्याचा महापालिकेचा प्रयत्न राहणार आहे, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी सांगितले.



# चांगल्या शिक्षणामुळेच जीवनात यशस्वी होऊ शकतो : प्रा. शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

जीवनात यशस्वी व्हायचा असेल आणि भविष्यात चांगल करिअर घडवायचा असेल तर आपण चांगले शिक्षण घेऊन पुढे जाऊ शकतात व आपल्या जीवनातील लक्ष गाठू शकतात, असे विचार रयत शिक्षण संस्थेचे माजी प्रा. शाबोद्दीन शेख यांनी गैबीपीर उर्दू प्रा. स्कूलमध्ये आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुरहान, संस्थेचे अध्यक्ष हाजी के.बी. नदाफ समाजसेविका सलिमाबी शेख, समाजसेवक इकबाल बागवान, मोइनुद्दीन मुतवल्ली, जमीर कोतकुंडे, पत्रकार तौफिक नदाफ, सादिक नदाफ, सतार तुरूप, हाफीज इस्माइल शेख, भिम शक्तिचे सुबोध वाघमोडे, राजाभाऊ कदम उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी माजी नगरसेविका वहिदाबी शेख यांनी भूषविले होते. मुख्याध्यापक अ. मजीद शेख यांनी केले. संस्थेच्यावतीने समाजसेवक इकबाल बागवान, पत्रकार तौफिक नदाफ व गायक अ. रहमान यांना विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सुबोध वाघमोडे व कार्यक्रमाचे अध्यक्ष वहिदाबी शेख यांनी मनोगत व्याक्त केले. कार्यकम यशस्वी करण्यासाठी निलोफर शेख, तहसीन चाँदा, शबाना जमादार, अकबर मुतवल्ली, सलमा नदाफ, शब्बीर शेख, आफरीन शेख, सालेहा शेख, यासिनबी शेख आदीनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मसरत शेख यांनी तर आभार अ. मजीद शेख यांनी मानले.२१

# मानवतावादी दृष्टिकोनातून काम करण्याची आवश्यकता

## प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांचे प्रतिपादन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

१९ ऑगस्ट हा दिवस जागतिक मानवतावादी दिवस म्हणून मानला जातो. जगभरातील मानवतावाद्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. गरजू लोकांना योग्यवेळी योग्य ते सहाय्य मिळालं पाहिजे हा या दिवसाचा खरा संदेश आहे. बहुभाषिक, अनेक जाती व धर्माचे लोक राहत असलेल्या या देशात आपत्ती व्यवस्थापनाच्या काळात मानवतावादी दृष्टिकोनातून काम करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज बोरामणीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया संचलित स्प्रिंट फोर ह्युमॅनिटेरियन प्रकल्प अंतर्गत जागतिक मानवतावादी दिनानिमित्त बोरामणी गावात आयोजित आपत्ती व्यवस्थापन पुनर्वसन कार्यावेळेस दिल्या जाणाऱ्या मिनिमम इनिशियल सर्विस ऑफ पॅकेज अर्थात प्रजनन आरोग्याच्या सेवा सुविधांविषयी जनजागृती व्हावी यासाठी पोस्टर प्रदर्शन, हिमोग्लोबिन तपासणी, रक्तगट तपासणी, शुगर तपासणी, सामान्य आरोग्य तपासणी व औषधोपचार, गरोदर व स्तनदा महिलांना प्रोटीन पावडरचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी व्यासपीठावर सरपंच अरुणा साळुंखे, राज साळुंखे, ग्रामपंचायत अधिकारी संदीप दराडे, उपसरपंच सुनीता गाडेकर, बोरामणी ग्रामपंचायत सदस्य सैपनसाब फुलारी, एसव्हीसीएस हायस्कूल बोरामणीचे मुख्याध्यापक एम.आर.अतनुरे, पर्यवेक्षक शिवप्पा बिराजदार, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र सोलापूरचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, विठ्ठल मंदिरचे पुजारी रमेश मोहिते, सखी वन स्टॉप सेंटरच्या समुपदेशिका सुजाता बत्तुल, केसवर्कर स्वाती आलूवालिया, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, मंद्रूप ग्रामीण रुग्णालय, आय. सी. टी. सी. सेंटरचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ बाळकृष्ण बेंडकाळे व समुपदेशक शितल सूर्यवंशी आदी उपस्तिथ होते.

एम. जे. प्रथम मानवसेवा संस्था महाराष्ट्रचे अध्यक्ष मोहन तलकोकुल यांना समाजातील दुबळ्या घटकांसाठी करीत असलेल्या समाज सेवेबद्दल तर मुळेगाव तांडा उपकेंद्राच्या अशा वर्कर व फॅमिली प्लॅनिंगच्या नरोत्तम सेक्सरियार फाउंडेशन संचलित मुखाचा व गर्भाशयाचा कॅन्सर जनजागृती प्रकल्पाच्या भूतपूर्व कर्मचारी रेखा राठोड यांनी सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्यावतीने आयोजित आपदामित्र प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.अध्यक्षीय समारोप डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार कल्पना गडगडे यांनी मानले.

# खानकाही मिशनतर्फे रविवारी 'एक आवाज नशे के खिलाफ' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

जश्न-ए-ईद मिलादुन्नबी निमित्त खानकाही मिशन या संस्थेच्या वतीने रविवार दि. २४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता हकीम गार्डन, आसरा चौक, होटगी रोड येथे एक आवाज नशे के खिलाफ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्था प्रमुख सय्यद मोहम्मद कामील पाशा हुसेनी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी हजरत अल्लामा मौलाना अहमद नक्शबंदी यांचे व्याख्यान होणार आहे. यावेळी नशा मुक्ती अंतर्गत जनजागृती करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हजरत सय्यद वाहिद अली गेसूदराज हुसैनी आणि हजरत सय्यद मोहम्मद सबील पाशा हुसैनी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. या पत्रकार परिषदेस मोहम्मद नूरूल हसन नुरद्दीन चिस्ती अमिनी, अन्वर रजाक, सय्यद आरिफ कादरी आदी उपस्थित होते.


# आता तरी साजरा करू या... पर्यावरण पूरक उत्सव

**सर्वोच्च संस्कृतीचे आम्ही भारतीय वारसदार ।**
**प्रदूषणमुक्त भारत सत्यात उतरविणार ।।**

खरंच मंडळी.... प्रदूषणमुक्त भारत ही एक हाती संकल्पना शक्य आहे का? तर नाही. कारण प्रत्येक सण उत्सव हे पर्यावरण पूरक असतील तरच आपला भारत प्रदूषण मुक्त बनेल, तेही आपल्या सर्वांच्या एकजुटीच्या निश्चयातून!

आपण हल्ली ऐकतोय की, पर्यावरणाचा असमतोल होत आहे... पण पर्यावरण म्हणजे नेमके काय? याबाबत एका रशियन पर्यावरण शास्त्रज्ञाने सांगितले आहे की, मानवताच्या सभोवताली घडणाऱ्याभौतिक शास्त्रानुसार दृश्य - अदृश्य घडणाऱ्या घटना म्हणजे पर्यावरण. त्यात निसर्गातील पृथ्वी आप, तेज, वायू, आकाश या पंचतत्वांनी बनलेलं हे पर्यावरण आलंच...

आपला भारत देश बाराही महिने विविध धर्मांचे सण एकात्मतेने साजरा करणारा वैविध्यपूर्ण देश आहे. एखादे सण म्हटल्यास पाणी, झाडे, माती, पाने, फुले, रंग, अन्न आर्थिक गोष्टी या सर्वांचा सहसंबंध असतोच. या सर्व घटकांचा पर्यावरणास मारक न



करता पर्यावरण पूरक उत्सव कसे साजरा येतील... यासाठी आपण सर्व भारतीयांनी उपाययोजना केल्या पाहिजेत. दिवाळीत मोठमोठ्या आवाजाचे फटाके न लावता शांततेने सण साजरा करीत, त्यात गोरगरिबांना मदत करत आपण दिवाळी साजरी करू शकत नाही का?

आताच आपण पाहतोय की, 'डीजेमुक्त सोलापूर' यासाठी किती उपक्रम राबविले जात आहेत! खरंच, हे गरजेचे झाले आहे... कारण प्रत्येक सणानिमित्त नंतर प्रदूषण हे आलेच. हे प्रदूषण कमी करायचे असेल तर.... गणेशोत्सवात इको फ्रेंडली गणपती वापरून आपल्याला जलप्रदूषण थांबवता येईल, प्रत्येक सणामागे राहिलेले निर्माल्य इतरत्र न टाकता त्यापासून जैविक खत कसे तयार करता येईल? हे आपल्याला शिकले पाहिजे. कर्कश्श आवाजाची अर्थहीन गाणी न लावता अर्थपूर्ण भजन लावल्यास मुलांवर संस्कार ही होतील. डेसिबलचा मर्यादित वापर केल्यास, घरातील रुग्णांना वयोवृद्धांना त्रासही होणार नाही. दसऱ्याला आपट्याची पानं तोडून पर्यावरणाचा ऱ्हास करण्यापेक्षा एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात. होळीला पाण्याची नासाडी न करता त्वचेचे नुकसान करणाऱ्या रंगापेक्षा कोरडे रंग वापरावेत. अशा विविध सणातून सामाजिक संदेश देत, समाजसेवी संस्थांना दीनदुबळ्यांना मदत करून आपण प्रत्येक सणातून एक नवा आदर्श निर्माण करू शकतो. पर्यावरण पूरक उत्सव साजरे करण्याची काळाची आता गरज बनली आहे हे आपण सर्व लोकांना समजेपर्यंत पटवून दिले पाहिजे. सोशल मीडियाच्या योग्य त्या वापराने पर्वा आलेल्या महापुरात युवा पिढीने केलेले श्रमदान अत्यंत आदर्शवत आहे त्यातून माणुसकीची एकच जात पाहायला मिळाली. याच सोशल मीडियाद्वारे पर्यावरणाचे महत्त्व सांगणारे महत्त्व असे संदेश आपल्याला देता आले पाहिजेत. मानवाने जर आपल्या स्वार्थासाठी, अज्ञानी, अविचारी वृत्तीने सण साजरे केल्यास पुढच्या पिढीला रक्तासोबत ऑक्सिजनही पिशवीत विकत घ्यावे लागेल. जल, वायू, भूमी, ध्वनी यांचे प्रदूषण न करता जेवढ्या सामंजस्य व आपुलकीने उत्सव साजरे करता येतील ते आपण करावेत. संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या मानवाने हे पर्यावरणाचे भक्षण थांबवलेच पाहिजे, नाहीतर...

हे मानवा वेळ जाण्याआधी एक वृक्षतरी तू लाव. प्रदूषणाच्या विळख्यातून पर्यावरण वाचव...

आधी कर तू निसर्गाशी मैत्री, मगच होईल पर्यावरण पूरक सणांची खात्री. आपल्याला जगायचं असेल तर पर्यावरणाला जगवावं लागेल, कारण पर्यावरण सुंदर असेल तरच आपले आयुष्य सुंदर असणार आहे. तोच आपला आजचा आणि भविष्यातही तारणारा मित्र असणार आहे. धन्यवाद!

**- नर्मदा कनकी, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मल्लिकार्जुन मंदिर पुनर्बांधणीसाठी पाच कोटींचा निधी

## आ. सचिन कल्याणशेट्टी : देणगी देण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

ग्रामदैवत मल्लिकार्जुन जगाचा मालक आहे. त्याना देण्यासारखे आपण मोठे नाही. मंदिर पुनर्बांधणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून पर्यटन क्षेत्र स्तरावरून पाच कोटी रुपये निधी आणला असून या मंदिर पुनर्बांधणीसाठी ज्यांना मदत द्यायची आहे त्यांनी यथाशक्ती देणगी द्यावी, असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

अक्कलकोट विरक्त मठाचे प.पू बसवलींग महास्वामी यांच्या प्रमुख उपस्थित ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवस्थानच्यावतीने संपूर्ण श्रावण महिन्यात श्री वीरभद्रेश्वर पुराण प.पू. ष. ब्र श्री शांतवीर शिवाचार्य चलगेरी यांच्या रसाळ वाणीतून चालू आहे. याप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. यावेळी श्री



वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी मल्लिकार्जुन मंदिर पुनर्बांधणीसाठी पाच लाख रुपये देणगी दिली. रत्नमाला खेडगी यांनी दोन लाख रुपये, विठ्ठल तेली यांनी एक लाख एक हजार रुपये, भीमजी पटेल ५१ हजार रुपये, नीलकंठ कापसे ५१ हजार रुपये, सुरेश यळमेली ५१ हजार रुपये विशाल राठोड ५१ हजार रुपये, विकास जकापुरे २५ हजार रुपये, शरणाप्पा अचलेर २५ हजार रुपये, सुनील आलदी २१ हजार रुपये, राजकुमार पुकाळे अकरा हजार रुपये असे ११ जणांनी मिळून १० लाख ८७ हजार रुपये देणगी दिली. याप्रसंगी देणगीदारांचा आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी या ऐतिहासिक मंदिराचे पुरातन पद्धतीने बांधकाम लवकरच पूर्णत्वास येत आहे. त्यामुळे सर्वांनी यथाशक्ती देणगी देण्याचे आवाहन वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी यावेळी केले.

यावेळी ग्रामदैवत मल्लिकार्जुन देवस्थानचे अध्यक्ष शिवलिंगया स्वामी, महेश हिंडोळे, प्रथमेश इंगळे, बसवराज माशाळे, कल्याणी पाटील, सुनील गोरे, राजकुमार नागुरे, शैलेश राठोड, शिवराज स्वामी, कांतु धनशेट्टी, प्रशांत लोकापुरे, स्वामीनाथ हिप्परगी, अंकुश केत, बाळासाहेब एकबोटे, शिवकुमार कापसे, विठ्ठल तेली, राजकुमार उमराणीकर, राजकुमार एकबोटे,रत्नाकर पुजारी, नीलकंठ कापसे, सुनील पवार,तात्या समाणे,श्रीकांत झिपरे आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## महत्वाचे...



### सांगोला महाविद्यालयात लर्निंग केमिस्ट्री विथ गेम्सवर कार्यशाळा

**सांगोला, दि. २० ऑगस्ट -**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विषयाच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता हमी कक्ष व रसायनशास्त्र विभाग यांच्यावतीने लर्निंग केमिस्ट्री विथ गेम्स या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील नेट/सेट तज्ञ प्रा.डॉ. गजानन राशीनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रशिक्षण दिले. सदर कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले होते. याप्रसंगी प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे यांच्या बौद्धिक संपदा कायदा व तंत्रज्ञान या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यशाळेत प्रा.राशिनकर यांनी विद्यार्थ्यांनी रसायनशास्त्र विषयाचे अध्ययन आनंदाने करावे हा या स्टार्टअप मागचा विचार आहे असे मत व्यक्त केले. तसेच डॉ.सुरेश भोसले यांनी विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांचा लाभ घेऊन स्वतःचे करिअर घडवावे असे मत व्यक्त केले. कार्यशाळेत घेतलेल्या प्रश्नमंजुषा मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना सुवर्णपदके व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचे माजी विद्यार्थी डॉ.विठ्ठल सप्ताळ यांना रामानुजन फेलोशिप प्राप्त झाल्याबद्दल तसेच माजी विद्यार्थी प्रा.रामदास नाईकनवरे यांचा कॅन्सर संशोधनाबाबतचा शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रकाशित झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यशाळेमुळे रसायनशास्त्रातील अवघड संकल्पना लक्षात ठेवण्यासाठी अत्यंत उपयोग झाला असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. प्रा.रामदास नाईकनवरे यांनी आभार मानले.



### सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये अँटी-रॅगिंग सप्ताह

**सांगोला, दि. २० ऑगस्ट-**


सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि. १२ ते १८ ऑगस्ट रोजी अँटी-रॅगिंग सप्ताह विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. सप्ताहाचे उदघाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले. या सप्ताहातर्गत महाविद्यालयात अँटी-रॅगिंग जनजागृती करण्यासाठी स्लोगन रायटिंग कॉम्पिटिशन, निबंध स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन कॉम्पिटिशन,आणि सोशल मीडिया कॅम्पेन यासारखे उपक्रम राबविण्यात आले. जनजागृती उपक्रमास विद्यार्थ्यांनी प्रतिसाद देऊन अ अँटी-रॅगिंग स्लोगन व लोगो दर्शविणारे फ्लेक्स सादर केले तसेच रेखीव असे पोस्टर व निबंध सादर करून विद्यार्थ्यांनी रॅगिंगचे दुष्परिणाम, कायदेशीर होणारी शिक्षा, रॅगिंग प्रतिबंधक उपाययोजना, अँटी-रॅगिंग जनजागृतीचे महत्व विशद केले. परीक्षकांनी वरील सर्व स्पर्धेत निवडलेल्या प्रथम तीन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. अँटी-रॅगिंग सप्ताह यशस्वी करण्यासाठी कॉलेज अँटी-रॅगिंग विभाप्रमुख प्रा.एम. आय.मुजावर यांचे योगदान लाभले.



### वखारिया विद्यालयात माजी विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

**बार्शी, दि.२० ऑगस्ट-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात माजी विद्यार्थी रणजित खपाले, गोरुबा कुंभार, गणेश माळी, तंटामुक्ती समिती अध्यक्ष रामेश्वर शिरगिरे यांचेकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच कै. संजय पासले मित्रमंडळाच्यावतीने सातपुते, मनोज जाधव यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्याकडे बिस्कीट बॉक्स सुपूर्द केले.



### मराठी पत्रकार संघातर्फे रेवणसिद्ध कलशेट्टी यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २० ऑगस्ट-**

रिद्धी सिद्धी टेडर्सचे मालक रेवणसिद्ध अशोक कलशेट्टी यांचा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने पत्रकार राजेश जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अक्कलकोट शाखा तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, प्राध्यापक शिवशरण अचलेर, अशोक कलशेट्टी, नागेश कोनापुरे, लांडगे, पत्रकार रमेश भंडारी, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य स्वामीराव गायकवाड उपस्थित होते. रेवणसिद्ध कलशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त प्रा. शिवशरण अचलेर, देशमुख, नागेश कोनापुरे, जगदाळे, धनंजय गायकवाड परिवार लांडगे यांच्याकडून विविध उपक्रम राबवून शुभेच्छा देण्यात आल्या.



## वेळापुरात संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २० ऑगस्ट-**

वेळापूर (ता. माळशिरस) श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वेळापूर येथील नागोबा मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात हभप तृप्ती जाधव यांच्या रसाळ कीर्तनाने झाली. त्यांच्या कीर्तनातून संत सेना महाराजांच्या जीवनातील आदर्श, समाजसेवा आणि अध्यात्मिक संदेश यांचा प्रभावी उलगडा करण्यात आला. यानंतर बारा वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच

आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते श्री संत सेना महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन व आरती करण्यात आली. आनंदमूर्ती भजनी मंडळ यांचाही भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला आमदार उत्तमराव जानकर, सरपंच रजनीश बनसोडे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, माजी उपसरपंच नितीन चौगुले, शिवाजी मोहिते, शंकर आडत, अजित साठे, प्रदीप सरवदे ,पिनू एडगे, ओंकार खराडे , स्वप्निल सरवदे उपस्थित होते. पुण्यतिथी सोहळा पार पडण्यासाठी राहुल सराटे, प्रमोद साळुंखे, श्रीराम जाधव, मंगेश जाधव, दीपक साळुंखे, विकी लोखंडे, किरण लोखंडे, अरुण लोखंडे, लोखंडे पिनू लोखंडे, किशोर लोखंडे, विकास लोखंडे, मोहन काशीद, दत्ता साळुंखे, सचिन साळुंखे, दशरथ वाघमारे, नामदेव गाडेकर, सौरभ जाधव, दादा जाधव, अमोल साळुंखे, अमोल यादव, अजय सराटे, भारत नाना जाधव, धनंजय जाधव, सतीश साळुंखे, गोटू साळुंखे, भारत साळुंखे, संदीप जाधव, राजू खंडागळे मेजर, देविदास जाधव, सोमनाथ सपकाळ, शिव भांगे नाभिक बांधव यांनी परिश्रम घेतले.

### कार अपघातात निलंगा तालुक्यातील ५ जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २० ऑगस्ट-**

सोलापूर ते पुणे महामार्गावरील कोंडी पुलाजवळ झालेल्या अपघातात निलंगा तालुक्यातील पाचजण जखमी अवस्थेत आढळले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा प्रकार बुधवारी मध्यरात्री एकच्या सुमारास उघडकीस आला. शिवाजी यादवराव बिराजदार (वय ४८), बालाजी वसंतराव गोमसाळे (वय४०), अनिता वसंतराव गोमसाळे (वय ७०), ज्ञानेश्वर पाडुरंग बिराजदार (वय ६५) व शोभा ज्ञानेश्वर बिराजदार (वय ६०, रा. तामलवाडी ता. निलंगा) अशी जखमींची नावे आहेत. वरील सर्वजण कारमध्ये बसून सोलापूर येथून पुणे महामार्गावरून मोहोळच्या दिशेने जात होते. कोंडी पुलाजवळ ते सर्वजण जखमी अवस्थेत आढळून आले. त्यांना रुग्णवाहिकेतून मध्यरात्री दोनच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रात जागतिक डास दिनानिमित्त जनजागृती

**वैराग, दि. २० ऑगस्ट-**

प्राथमिक आरोग्य केंद्र वैराग येथे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शुभांगी आधटराव, पंढरपूर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिता बांगर, तालुका आरोग्य विस्तार अधिकारी जगदीश ताकभाते आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती तीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्र वैराग यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक डास दिन साजरा करून जनजागृती करण्यात आली. यावेळी डासाबद्दल व डासापासून होणाऱ्या आजाराविषयी माहिती देण्यात आली. डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया, हत्तीरोग, आजाराची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याविषयी माहिती देण्यात आली. यावेळी तानाजी घुगे, बाबासाहेब सुरवसे, दादासाहेब फुंदे, सुरेश कुंभार, शिवाजी आवारे, आनंद गुंड, अतुल थोरात, माणको निचळ, काशिनाथ कलाल, बालिका घोरपडे, दत्तात्रय शिंदे, राहुल करंडे, श्रीमती. चौधरी सिस्टर, श्रीमती कराड उपस्थित होते.



### उत्कृष्ट कामगिरीबद्दल मोना नवगिरे यांचा सन्मान

**वेळापूर, दि. २० ऑगस्ट-**

महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर महाराष्ट्र शासन अंगीकृत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत तालुका अभियान कक्ष माळशिरस सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र यशवंतनगर यांची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा जयश्री एकतपुरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी मागील वर्षांमध्ये केलेल्या कामाचा आढावा व महिलांचा गुणगौरव करण्यात आला. याच्यामध्ये मोना नवगिरे यांना उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्वोत्कृष्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हा समन्वयक मन्सूर अली पटेल, अकलूज पोलीस स्टेशनचे सपोनि विक्रम साळुंखे, पाटील उपस्थित होते.

## दलित मित्र गौरव पुरस्कार जाहीर

### दैनिक तरुण भारत बार्शीचे प्रतिनिधी अरुण बळप यांना पत्रकारितेचा पुरस्कार

#### शनिवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

दलित महासंघ बार्शी शहर व तालुक्याच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा राज्यस्तरीय दलित मित्र गौरव पुरस्कार जाहीर झाला असून त्याचे वितरण शनिवार दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे, संस्थापक अध्यक्ष दलित महासंघ यांच्या हस्ते होणार आहे. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, खजिनदार जयकुमार शितोळे, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, तहसीलदार एफ. आर. शेख, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ. संजय अंधारे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दलित महासंघाच्या वतीने देण्यात येणारा या पुरस्काराचे हे सलग अठरावे वर्ष असून साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त हा पुरस्कार देण्यात येतो.



यावेळी या पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणे- १) जीवन गौरव सुनील भराडिया, ज्येष्ठ उद्योजक तथा समाजसेवक २) बाळासाहेब चव्हाण, मुख्याधिकारी तथा प्रशासक बार्शी नगरपालिका बार्शी यांना दलित मित्र विशेष गौरव पुरस्कार. डॉ. सारंगा बुरगुटे- आव्हाड, संचालिका, शिवशक्ती बँक यांना सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे . २०२५ चे दलित मित्र पुरस्काराचे मानकरी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, सचिन मांजरे पाटील, उमेश बारंगुळे, लोक व्याख्याते विशाल गरड, विस्तार अधिकारी नितीन वाघमारे, युवा उद्योजक राम डोंबे, दशरथ टेकाळे व जय शिवराय प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेला या वर्षीचा दलित मित्र पुरस्कार जाहीर झाला असून ज्येष्ठ गौरव म्हणून प्रा. श्रीधर कांबळे, फुले शाहू आंबेडकर प्रतिष्ठान अध्यक्ष व सूर्यकांत अण्णा लोंढे, जेष्ठ रिपब्लिकन नेते, पत्रकारितेतील पुरस्कार अरुण बळप आणि संजय बरबोले यांना जाहीर झाल्याची माहिती दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे व बार्शी शहर अध्यक्ष संदीप आलाट यांनी दिली.

### राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी अक्कलकोटमधून दोन सरपंच, दोन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० ऑगस्ट-**

पुणे येथे २१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी अक्कलकोट तालुक्यातून दोन सरपंच दोन ग्रामपंचायत अधिकारी यांची नियुक्ती गटविकास अधिकारी शंकर कवितके यांनी केली आहे.

कार्यशाळेसाठी हत्तीकणबसचे सरपंच श्रीशैल माळी व ग्रामपंचात अधिकारी शिवयोगी वंजारी, गोगावचे सरपंच वनिता सुरवसे आणि इब्राहिमपुर ग्रामपंचायत अधिकारी शिवानंद कलशेट्टी यांची नियुक्ती करण्यात आला आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानाला शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आले असून सदर अभियान राज्यात प्रभावीपण राबविण्यासाठी ग्राम विकासमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व ग्राम विकास राज्य मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत गणेश कला क्रिडा मंच, स्वारगेट, पुणे येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.



### मैत्री करावी तर बाळासाहेब चव्हाण यांच्या सारखी : कमलाकर नागटिळक

**सुस्ते, दि. २० ऑगस्ट-**

मैत्रीच नात हे रक्ताच्या नात्यापेक्षा मजबूत असते. माझ्या अडचणीच्या काळात बाळासाहेब चव्हाण यांनी माझ्या वजना एवढे पैसे खर्च केल असल्यामुळे मी आज या ठिकाणी उभा आहे. माझ्या चमड्याच्या चप्पल करून जर दिली तरी बाळासाहेब चव्हाण यांचे उपकार फिटणार नाही. निस्वार्थी मैत्री करावी तर बाळासाहेब चव्हाण यांच्या सारखी, असे प्रतिपादन पोलीस उप निरीक्षक कमलाकर नागटिळक यांनी केले आहे. उद्योगपती बाळासाहेब चव्हाण यांच्या परिवाच्या वतीने कमलाकर नागटिळक यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाल्याबद्दल सुस्ते (ता.पंढरपूर) येथे कमलाकर नागटिळक यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना पोलीस उपनिरीक्षक कमलाकर नागटिळक बोलत होते. कमलाकर नागटिळक यांचा सत्कार उद्योगपती बाळासाहेब चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उद्योगपती मयूर चव्हाण, जयंत चव्हाण, अक्षय चव्हाण, प्रकाश माने, रमेश आरकिले, डॉ. विजय सालविठ्ठल, संजय नागणे, गोरख पाटील, बाबा पाळेकर, चंद्रकांत परचंडे, सागर निर्मळ, आनंद निर्मळ, राजाभाऊ चव्हाण, अशोक चव्हाण, हनुमंत बोबडे, रवी पवार, अशोक नळे, मधुकर डोंगरे, प्रदीप कदम, आबा सपाटे, यशवंत चव्हाण, रामभाऊ बोबडे, समाधान माने, बापू चव्हाण उपस्थित होते.

## युवकांकडून केलेले कार्य गावाचा नावलौकिक वाढविणारे

### डीवायएसपी सायकर; धसपिंपळगावच्या उध्दारासाठी जन्मभूमी प्रतिष्ठानची शिव मंदिरात महारुद्र पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० ऑगस्ट-**

आपल्या गावच्या कल्याणासाठी जन्मभूमी प्रतिष्ठान व ग्रामस्थांनी केलेले विविध उपक्रम आणि महारुद्र पूजा हे गावाच्या नावलौकिकात भर घालणारे आहेत, असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांनी केले.

बार्शी तालुक्यातील धस पिंपळगाव येथे जन्मभूमी प्रतिष्ठानने गावातील पौराणिक स्वयंभू शिव मंदिरात आयोजित केलेल्या महारुद्र पूजा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सरपंच तुळशीराम वायकर, उपसरपंच अण्णासाहेब धस, माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर, कृषीभूषण बाबासाहेब पाटील, प्रतिष्ठानचे मार्गदर्शक दादासाहेब चिपडे, महाराष्ट्र कुस्ती चॅम्पियन सचिन धस, आदर्श शिक्षक अण्णासाहेब धस, प्रतिष्ठानचे अध्यक्ष नानासाहेब धस, ॲड. सुनील



कुलकर्णी, भाऊसाहेब कोळी, धनाजी वाघमोडे, हनुमंत जगदाळे, ग्रामविकास अधिकारी लोखंडे, डॉ. दत्ता पवार, उद्योजक राजाभाऊ पैकेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गावचे भूमिपुत्र व भगवंत ब्लड बँकेचे चेअरमन शशिकांत जगदाळे यांनी सपत्नीक, सहकुटुंब महारुद्र पूजा करत जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून गावाचा कायापालट होऊन व गावचा भाग्योदय होऊन गाव राज्यात आदर्श व्हावे व जगाच्या नकाशावर झळकावे, असा संकल्प व्यक्त केला. यावेळी गावातील विविध दांपत्यांनी महारुद्र पूजा केली. प्रतिष्ठानचे सचिव स्वप्निल धस यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरत चंदनशिवे, सोहेल शेख, वैभव जगदाळे, राम गरड, यांनी परिश्रम घेतले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## शनी अमावस्येनिमित्त घोळसगाव येथे विविध कार्यक्रम

**अक्कलकोट, दि.२० ऑगस्ट-**

तालुक्यातील घोळसगाव येथील स्वयं जागृत नवसाला पावणारा सर्वधर्मीय श्रद्धास्थान शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान शनी अमावस्या यात्रा महोत्सवनिमित्त शुक्रवार २२ व शनिवार २३ ऑगस्ट रोजी देशभक्तीसह विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम आयोजित केले असल्याची माहिती पंच कमिटी अध्यक्ष अप्पासाहेब किवडे यांनी दिली आहे.

प्रत्येक शनी अमावस्या यात्रेस तुळजापूर, उमरगा, आळंद व अक्कलकोट तालुक्यातील भक्त गर्दी करतात. यामुळे यंदा यात्रा कमिटीच्यावतीने शनी अमावास्या यात्रेची जय्यत तयारी करण्यात येत आहे. शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी देशभक्तीसह विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून रात्रभर देशभक्ती भजन, भारुड आदी कार्यक्रम आयोजित केले आहेत. शनिवार दि. २३ ऑगस्ट पहाटे श्रींची महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार असून सकाळी सात वाजता घोळसगाव ग्राम प्रदिक्षण करीत श्रीची पालखी मिरवणूक विविध वाद्या समवेत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यंत निघणार आहे. यानंतर सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज दर्शन सोहळा, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार असून भक्तांनी सदगुरूचा दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंच कमिटीच्या सचिव राजू काळे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### गार्डी ते मोरेवस्ती रस्त्यावरील पुलाच्या बांधकामास पालकमंत्री गोरे यांची मंजुरी

**सांगोला, दि.२० ऑगस्ट-**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आशियाई विकास बँकेमार्फत सांगोला विधानसभा मतदार संघातील पंढरपूर तालुक्यातील गार्डी ते मोरेवस्ती या रस्त्यावरील पुलाच्या बांधकामासाठी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांनी ५ कोटी ७० लाख रुपये मंजुर केले आहेत अशी माहिती माजी आ.अॅड. शहाजीबापू पाटील यांनी दिली. जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील गार्डी ते मोरेवस्ती या रस्त्यावर साखळी क्रमांक ३५० येथे १०८ मीटर लांबीच्या पुलाचे बांधकाम करण्यासाठी तत्कालीन आ. शहाजीबापू पाटील यांनी जानेवारी २०२४ मध्ये मागणी करीत त्यासाठी वारंवार पाठपुरावा केला होता. या मागणीची दखल घेत ना.जयकुमार गोरे यांनी मंजुरी देत या कामास ५ कोटी ७० लाख रुपये मंजूर केले आहेत. सदर काम ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत आशियाई विकास बँक अर्थसहीत गार्डी ते मोरेवस्ती पुलाचे काम मंजूर झाल्याने या भागातील नागरिकांचा गेल्या अनेक वर्षापासूनचा प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला आहे. त्यामुळे गार्डी गावच्या ग्रामस्थांनी पेढे वाटून आनंद व्यक्त करत माजी आ. शहाजीबापू पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.





### गणेश महोत्सव डॉल्बी मुक्त करण्यासाठी वैराग पोलिस स्टेशनकडून शांतता बैठक

**वैराग, दि.२० ऑगस्ट-**

यंदाचा सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे .या निर्णयाची अंमलबजावणी वैराग पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात येत असून या संदर्भातची बैठक वैराग पोलिस ठाण्यामध्ये घेण्यात आली. वैराग पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या ५४ गावांमध्ये गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरिता गणेश मंडळांसह पोलीस पाटलांची बैठक वैराग पोलिस ठाण्यामध्ये बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये गणेश उत्सव कसा साजरा करायचा याबाबतच्या सूचना देण्यात आल्या असून यावर्षीचा गणेशोत्सव पर्यावरण पूरक आणि सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबवून करण्यात यावा अशा सूचना पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी केले आहे. याशिवाय ज्या गावांमध्ये एक गाव एक गणपती हा उपक्रम राबवला जाईल त्या गावांचा सन्मान वैराग पोलिस ठाण्याच्या वतीने करण्यात येणार आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र भापकर विविध गावाचे पोलीस पाटील उपस्थित होते.

### अक्कलकोटमध्ये संत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त १६७ जणांचे रक्तदान

**अक्कलकोट, दि.२० ऑगस्ट-**

श्री संत सेना महाराज नाभिक समाज बहुउद्देशिय संस्था (रजि) अक्कलकोट शहर यांच्या वतीने श्री संत सेना महाराज पुण्यतिथी आज दि.२० ऑगस्ट रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त झालेल्या शिबिरात १६७ जणांनी रक्तदान केले. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते रक्तदान शिबीराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी चेअरमन सुदर्शन विभूते यांच्या हस्ते आमदार कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. वटवृक्ष देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे यांचा सत्कार अक्कलकोट शहर नाभिक समाज अध्यक्ष लक्ष्मण विभूते यांच्या हस्ते करण्यात आला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अध्यक्ष अमोलराजे भोसले यांचे चिरंजीव हर्षवर्धनराजे भोसले यांचा सत्कार शहर अध्यक्ष विभूते यांच्या हस्ते करण्यात आला. उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे यांचा सत्कार तालुका अध्यक्ष शिवशरण सुरवसे, भाजपा अल्पसंख्यांक सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष नन्नू कोरबु यांचा सत्कार उपाध्यक्ष भागवत विभूते, माजी नगरसेविका ज्योतिताई जरीपटके यांचा सत्कार महिला अध्यक्षा प्रमिला वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. महेश हिंडोळे, विक्रम बाळा शिंदे, खुशाल वाळुंजकर, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी जमदाडे, बेटी राठोड, इरफान कोवू, दिपक जरीपटके, फकीरा दलाचे अध्यक्ष जोतीबा पारखे, मंडप कंत्राटदार रमेश सोडगी, योगेश पवार, पत्रकार स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, रमेश भंडारी, शिवानंद फुलारी या मान्यवरांनी याप्रसंगी संतसेना महाराजांचे दर्शन घेतले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष सुदर्शन विभुते, उपाध्यक्ष भागवत विभुते, सचिव प्रभाकर सुरवसे, सहसचिव महेश घाटे, सोमलिंग सुरवसे, महेश सुरवसे, पद्माकर डिगे आदि उपस्थित होते. दरम्यान सोमवारी सकाळी संत सेना महाराजांच्या मुर्तीला अभिषेक करून विणापूजन करण्यात आले. मंगळवारी सकाळी अभिषेक व गोरज मुहुर्तावर श्री समर्थ विभूते व लखन चिखले या नवदाम्पत्याच्या हस्ते सायंकाळी सहा वाजता सेना महाराजांच्या मुर्तीचे पुजन करण्यात आले. जयभवानी भजनी मंडळ बावकरवाडी यांचा भजन, भारूड व जागर कार्यक्रम झाला. बुधवार रोजी सकाळी स्वामी समर्थ भजनी मंडळ समर्थ नगर अक्कलकोट यांचा भजनाचा कार्यक्रम झाला.




● ६५६ वी पुण्यतिथी उत्साहात

# जीवघेण्या कर्णकर्कश डॉल्बी अन् लेझरवर बंदी केव्हा?

## सर्वसामान्य नागरिकांचा सवाल | विधीमंडळात कायदा करण्याची मागणी





**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२० ऑगस्ट -**

दोनच दिवसापूर्वी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दहीहंडी कार्यक्रम पाहताना एका नागरिकाचा डॉल्बीच्या आवाजाने हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यु झाला. यापूर्वी देखील लग्नाच्या वरातीत येथील संतपेठ भागातील एकाचा डॉल्बीच्या दणदणाटामुळे मृत्यु झाला आहे.

मुंबई, पुणे, नाशिक यासारख्या मोठ्या शहरातून देखील अशा प्रकारच्या अनेक घटना घडल्या आहेत. गेल्यावर्षी कोल्हापूर येथे देखील मिरवणूकीतील लेझर लाईटमुळे नागरिकांवर आंधळे होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे कर्णकर्कश्य डिजे, डॉल्बी आणि मिरवणकीतील लेझर लाईट यावर कायमस्वरुपी बंदी आणावी अशी मागणी जोर धरीत आहे. या बरोबरच प्रसंगी वेळ पडली तर विधीमंडळात देखील यासाठी कायदा करण्याची देखील मागणी वाढत आहे. जेणेकरुन पोलिसांना देखील संबंधित कायद्याचा बडगा उगारुन या सर्व गोष्टींना आळा घालता येईल. लग्न असो की व्रतबंध, महापुरुषांच्या जयंत्या असो की वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम असोत किंवा सण असो की उत्सव असोत सगळ्या मिरवणूकांपुढे सर्रास असतोच तो छातीमध्ये धस्स करणाऱ्या मोठ्या आवाजांच्या डॉल्बी सिस्टिमचा धडकी भरवणारा तो आवाज. वास्तविक आवाज हा किती डेसिबल पर्यंत असावा यावर देखील आपल्याकडे कायद्याने मर्यादा घालून दिलेली आहे. मात्र कायद्याची अंमलबजावणी आणि रक्षण करणाऱ्या काही पोलिस आणि डॉल्बीचालक मालकांच्या असलेल्या (अर्थपुर्ण) मैत्रीमुळेच नागरिकांना नाहक डॉल्बीचा हा दणदणाट मात्र सहन करावा लागतो आहे. यामध्येच काही कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी या प्रकारांना रोखण्याचा प्रयत्न करतात मात्र राजकीय हस्तक्षेपामुळे त्यांचा देखील अनेकवेळा नाईलाज होतो. त्यामुळे कायद्याचे रक्षक असोत की विधीमंडळात कायदे करणारे राजकीय पुढारी त्यांच्याकडून एकत्रित निर्णय होवून या डॉल्बीवर कायमस्वरुपी बंदी केव्हा येणार ? असा सवालआता सर्वसामान्य नागरिकांमधूनच विचारला जात आहे.

### प्रचंड आवाजामुळे घडल्या मृत्युंच्या घटना

स्टेरिओच्या अक्षरश: भिंती उभारुन तयार करण्यात आलेल्या डॉल्बीच्या आवाजामुळे हार्टअँटकच्या घटना देखील वाढलेल्या आहेत. काहींचा या कर्णकर्कश्य आवाजामुळे मृत्यु देखील झाल्याच्या घटना ताज्या आहेत. तर काहींजणांना या भेसुर, प्रचंड आवाजामुळे कायमचा बहिरेपणा देखील आलेला आहे. मात्र तरी सुध्दा डॉल्बीचा दणदणाट रस्त्यांवर सर्रास सुरु असल्याचे दिसत आहे.

### सनई, बँण्डपथकांवर उपासमारीची वेळ

पूर्वी लग्नाच्या मिरवणूकी मध्ये सनई, बँण्डची पथके तसेच हलगीवाले दिसत असत. सनईचौघड्यांचे मंजुळ स्वर हे ऐकणाऱ्यांच्या कानांना देखील सुरेल सुरांचा आनंद देत असत. त्याच प्रमाणे बँण्ड पथकांतील वाद्यवृंद मंडळी देखील हिंदी, मराठी चित्रपटातील एकसे बढकर एक अशी सुंदर गीते वाजवुन ऐकणाऱ्यांची देखील वाहवा मिळवित असत. ऐकणाऱ्यांच्या कानांना देखील यामुळे खरोखरच सूरांचा आनंद देत मिळत असत. अशा प्रकारे वेगवेगळ्या कुटुंबातील लोकांना रोजगार उपलब्ध होवून त्यांचा उदरनिर्वाह सुध्दा चालत असत. मात्र डॉल्बी, डीजेमुळे अशा पारंपारिक कलाकार मंडळींवर सध्या उपासमारीची वेळ आलेली आहे.

### वाहतूकीचा खोळंबा आणि प्रदूषणात वाढ

सध्या जयंत्या पुण्यतिथी महोत्सव तसेच लग्नसराईंच्या काळात शहरातील प्रमुख रस्त्यांवर दिवसा तसेच संध्याकाळच्या वेळी मिरवणूका काढण्याचे फॅड वाढलेले दिसत आहे. प्रत्येक वरातींपुढे सर्रास डॉल्बी सिस्टीम लावलेल्या असून छातीमध्ये धस्स करणाऱ्या त्याच्या आवाजावर लग्नसराईच्या वेळी वधुवरांकडील मंडळी तसेच जयंत्या, पुण्यतिथीच्या मिरवणूकांच्या वेळी विशेषत: तरुण,तरुणींचे जथ्थे नाचताना दिसुन येतात. त्यामुळे वाहतूकीला अडथळा होतो. एकीकडे ध्वनीप्रदूषण तर दुसरींकडे वाहतूक खोळंबुन वाहनांच्या गर्दीमुळे थांबलेल्या वाहनांचे प्रदूषण याला सर्वसामान्य नागरिकांना मात्र सामोरे जावे लागते.

### दूकानदार मंडळी देखील त्रस्त

लग्नाच्या वराती असो किंवा इतर कोणत्याही मिरवणूका असोत या शहरातील स्टेशनरस्ता, चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर आणि प्रदक्षिणा मार्गावर काढल्या जात असतात. सततच्या गर्दीमुळे, वाहतूकीच्या अडथळ्यांमुळे या भागात नाहक गर्दी वाढते. त्यामुळे या भागातील दुकानदार मंडळी देखील त्रस्त झालेली आहेत.


### पुरातन मंदिरांना धोका

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र आहे. येथील नगरप्रदक्षिणा मार्गावर विविध प्रकारची जुनी आणि प्राचिन अशी परिवार देवतांची मंदिरे आहेत. लग्नसराई,सण,उत्सव आणि महापुरुषांच्या जयंतींच्या वेळी येथील प्रदक्षिणारस्ता, चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक आदी भागांतून डॉल्बी तसेच डिजे लावून मिरवणूका काढल्या जातात. या मिरवणूकांमध्ये उखळीबार, हवेतील बार तसेच मोठ्या आवाजांचे फटाके देखील फोडले जातात. त्यामुळे या भागातील पुरातन मंदिरांना डॉल्बी,डिजे आणि कांठाळ्या बसणाऱ्या फटाक्यांच्या आवाजामुळे नाहक धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी देखील या सर्व प्रकारांचे गांभिर्य लक्षात घेवून खबरदारी घेण्याची गरज आहे.

### विद्यार्थी, रुग्ण आणि वृध्द, लहनग्यांना देखील त्रास

शहरातील प्रमुख मार्गावर अनेक शाळा, महाविद्यालये तसेच खासगी क्लासेस आहेत. या बरोबरच रुग्णालये तसेच गावठाण भागात जुन्या घरांची संख्या देखील मोठी आहे. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी, रुग्णालयांतून उपचार घेणाऱ्या आजारी व्यक्ती तसेच अनेक घरांमधून असलेल्या वृध्दांना तसेच लहानमुलांना मिरवणूकांमधुन वाजणाऱ्या डॉल्बीच्या दणदणांटाचा विनाकारण त्रास सहन करावा लागतो आहे.





# शास्त्रीय गायनासह सतार अन् बासरी वादनाने रसिकश्रोते मंत्रमुग्ध

● **पंढरपुरात डॉ. प्रसाद कुलकर्णी यांच्या शिष्यांनी गाजवली मैफल**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. २० ऑगस्ट -**

येथील डॉ. प्रसाद कुलकर्णी यांच्या शिष्यांनी शास्त्रीय गायन, सोलो, हार्मोनियम वादन, बासरी वादन, सतारवादन यासारखे विविध प्रकार सादर करून पंढरपूरकरांना सांगीतिक मेजवानी दिली. या सांगितीक मेजवानीने रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

येथील पंढरपूर अर्बन बँकेच्या खवाबाजार शाखेमध्ये झालेल्या या संगीत मैफीलीस प्रमुख पाहुणे डॉ. मिलिंद परिचारक, मीरा परिचारक यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सुरूवात झाली. यावेळी डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रज्ञा कुलकर्णी, दिलीप टोमके, माधुरी जोशी , ज्ञानेश्वर दुधाणे उपस्थित होते. याप्रसंगी माजी आमदार (कै.) सुधाकरपंत परिचारक यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन करून प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीला डॉ. प्रसाद कुलकर्णी व प्रज्ञा कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुधीर बोरकर, प्रसाद खिस्ते, ओजस अंबिके, निलेश आराध्ये, विनीत शिंदे, पारुल परमार यांनी देस, वृंदावनी सारंग, जौनपुरी सरस्वती, शुद्ध कल्याण, गौड सारंग यासारख्या विविध रागात बडा ख्याल व छोटा ख्याल सादर करून रसिकांची दाद मिळवली. त्यानंतर श्रीरंग जाखी, मिहीर बडवे, गायत्री रणदिवे यांच्या हार्मोनियम वादनाने रसिकांची वाहवा मिळवली. त्यानंतर मिहीर देशपांडे याच्या बासरी वादनाने व सिद्धेय पूरवत याच्या सतार वादनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. या सर्व कलाकारांना उमेश केसकर, ऋषिकेश सुरवसे, अक्षय लऊळकर यांनी तबला साथ केली. आकांक्षा बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. गंधार क्लासच्या सर्व शिष्यांनी परिश्रम घेतले.

# अकलूज नगरपरिषदेच्यावतीने मुरुम टाकण्याचे काम सुरु

- शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी घातले लक्ष
- अकलूज-माळेवाडीकरांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२० ऑगस्ट-**

गेल्या काही दिवसांपासूनच्या पावसामुळे अकलूज-माळेवाडी परिसरात नागरिकांना चिखलामुळे वाहतुकीच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी स्वतः पुढाकार घेत अकलूज नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या सूचनेनुसार नगरपरिषद प्रशासनाने अकलूज माळेवाडी परिसरातील चिखलमय रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरूपात मुरुम टाकण्याचे काम हाती घेतले आहे. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरात वाहतूक पूर्ववत सुरू झाली आहे.

पाईपलाईन व अंडरग्राउंड गटारीच्या कामासाठी रस्ते खोदण्यात आले होते. मात्र, त्याच काळात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी चिखल साचून रस्ते चिखलमय व खडबडीत झाले होते. परिणामी शाळकरी मुलांपासून ते वृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांनाच या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. सध्या पावसामुळे निर्माण झालेली ही तात्पुरती अडचण आहे. पाइपलाईन व अंडरग्राउंड गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित रस्त्यांची पुनर्बांधणी करून नागरिकांना कायमस्वरूपी दर्जेदार रस्ते उपलब्ध करून दिले जातील. अशी माहिती यावेळी अकलूज नगरपरिषदेच्या वतीने देण्यात आली.




या उपक्रमामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त होत असून, वेळेवर दिलेल्या सूचनेमुळे समस्या तात्पुरत्या स्वरूपात कमी झाल्याचे सर्वत्र मान्य केले जात आहे.

# नियमबाह्य स्वग्राम काम करणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई होणार?

● **सीईओंच्या बदलीचे आदेश डावलून कारभार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० ऑगस्ट-**

दोन महिन्यांपूर्वी सीईओ कुलदीप जंगम यांनी ग्रामसेवकांची बदली प्रक्रीया पार पाडली. यावेळी एका गावात पाच किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे काम करणाऱ्या ग्रामसेवकांची नियमानुसार बदली करण्यात आली. यावेळी मंद्रुपचे प्रभारी स्वग्राम ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांचा पदभार काढून कुशाबा इंगळे यांची बदली करण्यात आली. मात्र दोन महिने झाले तरी मंद्रुपचा पदभार प्रक्रीया रखडला आहे.

प्रभारी ग्रामसेवक नागेश जोडमोटे पदभार देण्यास तयार नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे सीईओंचे आदेश डावलून कामकाज करणाऱ्या ग्रामसेवक जोडमोटे यांच्यावर कारवाई होणार का? याविषयी सवाल उपस्थित करण्यात येत आहे.





२०१८ मध्ये जोडमोटे यांनी होटगी येथील मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यावेळी पदभार घेतला. त्यानंतर मंद्रुपचे रहीवाशी असतानाही नियमबाह्य सहा वर्षे कामकाज केले. तत्कालीन बीडीओ बाळासाहेब वाघ यांनी गेल्या वर्षी त्यांचा प्रभारी पदभार काढून सोमण्णा पुजारी यांची बदली केली. सहा महिने पुजारी यांनी कामकाज केले. मात्र ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी डिसेंबर २०२४ मध्ये पदभार सोडला. त्यानंतर वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने पुन्हा जोडमोटे यांनी मंद्रुपचा अतिरिक्त पदभार घेतला. त्यामुळे नियमबाह्य स्वग्राम ग्रामसेवकांना वरीष्ठ अधिकारी वा लोकप्रतिनिधींचे अभय आहे का ? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

ग्रामसेवक बदलीप्रक्रीया पार पडल्यानंतर जिल्ह्यातील सर्वच ग्रामसेवक नेमणूकीच्या ठिकाणी हजर झाले आहेत. मात्र नियमानुसार झालेल्या बदली प्रक्रियेला मंद्रुपचे ग्रामसेवक पदभार न सोडण्यामुळे उलटसुलट चर्चा सुरू आहे. कुशाबा इंगळे पदभार घेण्यास तयार असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने चुकीची माहीती देऊन त्यांना पदभार घेण्यापासून रोखत असल्याची चर्चा सुरू आहे. स्वग्राम ग्रामसेवक असल्याने मंद्रुपची विकासकामे खुंटली असून गावात दलदलीचे साम्राज्य दिसून येत आहे. शिवाय दिवाबत्ती बंद असल्याने अंधारामुळे चोरीचे प्रमाण वाढले आहे. ग्रामपंचायत सदस्यांमधील गटबाजी वाढली आहे. त्यामुळे मंद्रुपच्या विकासासाठी स्वग्राम ग्रामसेवकांना पदभार सोडण्यासाठी अधिकाऱ्यांनी आदेश द्यावेत अशी मागणी होत आहे.

स्वग्राम ग्रामसेवक पदभार सोडण्यास तयार नसल्याने त्यांना वरीष्ठ अधिकाऱ्यांचे आशीर्वाद असल्याची चर्चा सुरू आहे. सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे गावच्या विकासावर परीणाम होत आहे. शिवाय सत्ताधाऱ्यांकडून स्वग्राम ग्रामसेवक असणारे जोडमोटे यांनाच अधिक पसंती असल्याचे सांगण्यात येत आहे.